# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // तहकुब विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ३६** **दि. ३१/०३/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३१/०३/२०२२ गुरूवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.१६ मार्च २०२२ अन्वये मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या तहकुब विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | महाजन सुनिल सुपडु |
| नेरकर सरीता अनंत | चौधरी मनोज सुरेश | नाईक प्रशांत सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे मयुर चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| शिंदे गायत्री उत्तम | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | बारी शोभा दिनकर | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | शेख हसीनाबी शरिफ | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | भिल पार्वताबाई दामु | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | पाटील उषा संतोष | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | कोल्हे ललीत विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| चौधरी चेतना किशोर | बरडे नितीन मनोहर | शेख सैईदा युसुफ |
| भंगाळे विष्णू रामदास | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहीम मुसा |
| सोनवणे राखी शामकांत | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे निता मंगलसिंग |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | मराठे जितेंद्र भगवान | **स्विकृत सदस्य** |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील रेखा चुडामण | कैलास नारायण सोनवणे |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत | राजेंद्र नारायण मराठे |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील राजेंद्र झिपरु | महेश रतन चौधरी |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरीक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त,श्री.शाम गोसावी, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार, नगररचनाकार, श्री.अशोक करवंदे, शहर अभियंता श्री.व्ही.ओ.सोनवणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य. श्री. काळे अमित पांडुरंग तसेच श्री.पाटील चंद्रशेखर शिवाजी यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत. सभा क्रं. ३६ मा. तहकुब विशेष महासभा

**नगरसचिव विषय क्रं. १ :-** मा.आयुक्त यांचे

**श्री.सुनिल महाजन :-** गोराणेसाहेब, मा.आमदार श्री.राजुमामा भोळे यांनी जळगांव शहर महानगरपालिकेला १० संगणक दिलेले आहेत आणि त्याची प्रशासकीय मान्यता सुध्दा दोनच दिवसात मिळाली त्यामुळे मी सभागृहाला विनंती करतो की त्यांचा अभिनंदनाचा ठराव मंजुर करावा. बाके वाजवुन मंजुर करण्यात यावा.

**नगरसचिव विषय क्रं. १:-** मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/ ११४२/२०२२ दि.०८/०३/२०२२ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणे.

**नगरसचिव :-** याबाबतीत मा.महापौर महोदया याठिकाणी आपले मनोगत सादर करतील.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सभागृह , मा.आयुक्त व सर्व सन्मा.अधिकारी व सन्मा. पत्रकार बंधुनो नमस्कार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये सन २०२१ -२२ चे सुधारीत व २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक मा.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर केलेले आहे. दरवर्षी स्थायी समितीकडे अंदाजपत्रक सादर करून तदनंतर त्यात आवश्यक ते बदल करून त्यानंतर महासभेपुढे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर केले जाते. परंतू सध्या स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे सदर अंदाजपत्रक महासभेकडे सादर करण्यात आलेले आहे. त्यामुळे आपली जबाबदारी वाढलेली आहे. दि.२३ मार्च २०२२ रोजी मा.आयुक्त यांनी अर्थसंकल्प हा सभेपुढे सादर केला . सदर अर्थसंकल्प जळगांवकरांच्या विकासासाठी केलेला आहे. सदर २०२१-२२ चे सुधारीत आणि सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रकाला आपल्याला आज मान्यता द्यावयाची आहे. मागील वर्षापासुन प्रशासनाने वास्तविक जमेवर भर दिलेला आहे. अर्थसंकल्पामध्ये घरपट्टी , खुला भुखंडकर , नगररचना किरकोळ वसुली वसुल होणाऱ्या जमेवर भर दिलेला आहे. सदर जमाबाजु प्रशासनाने कर वाढ न करता स्थानिक परिस्थिती लक्षात घेतलेली आहे असे अर्थसंकल्पात दिसुन येते . प्रशासनाने अर्थसंकल्पात दर्शविलेली वास्तविक जमा बाजु पुर्णपणे नियोजन करून जमा करण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ प्रशासनाने घरपट्टी ही १६० कोटींपैकी ९० कोटी ही जमा होईल असे येथे म्हंटलेले आहे. मला वाटते की, प्रशासनाने लवकरच ९० कोटी रूपये जमा करायचे आहे. ते त्यांनी जमाच करावे असे मी त्यांना सुचवित आहे. जळगांव महापालिकेची आर्थिक बाजु कर संकलन करणाऱ्या विभागावर अवलंबुन असते. मी सर्व कर संकलन करणाऱ्या विभागाला पुर्ण ताकदीने काम करण्याचे सुचित करते. यात हलगर्जी पणा होणार नाही याची दक्षता त्यांनी घ्यावी. या अर्थ संकल्पाच्या निमीत्ताने मी मा.आयुक्त यांनी ७ वा वेतन आयोग हा लागू करण्याची घोषणा केली. सर्व कर्मचारी वर्गाचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न होता. आपण याला मान्यता दिलेली आहे. मी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते. परंतू त्याबाबत कर्मचाऱ्यांना अवगत करते की त्यांनी वसुली ही वाढवावी. वसुली करण्यासाठी मी त्यांना पुन्हा आवाहन करते . सन २०२२-२३ चा हा अर्थसंकल्प म्हणजे जळगांव महापालिकेची वाटचाल कशी असेल याची दिशा ठरेल. सदर अर्थसंकल्पात राज्य शासनाकडील १०० कोटींच्या कामांची केलेली तरतूद मनपा हिस्स्यासह करण्यात आलेली आहे. महिला -बालकल्याण आणि दिव्यांग निधीसाठी प्रत्येकी दोन कोटींची तरतूद यात करण्यात आलेली आहे. परंतू हा निधी तरतूदीच्या तुलनेने खुप कमी प्रमाणात खर्च होतो . तरी या विभागातील कर्मचारी यांनी याकडे लक्ष देणं आवश्यक आहे. महापालिकेच्या प्रत्येक योजनांचा लाभ हा नागरीकांना होणं आवश्यक आहे. तरी सदर तरतूदीचे नियोजन संबंधित विभागाने तात्काळ करून सदर निधी खर्ची करावा. तसेच सदर विभागाला अजुन निधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात दवाखाने तसेच दवाखाने विभागासाठी अतिशय अशी मोजकी तरतूद आहे. मनपाचे दवाखाने हे सामान्य जळगांव करांसाठी दायित्व आहे. मागील कोरोना कालावधीत जळगांव शहरातील नागरीकांसाठी प्रसुति विभाग हा मागे आहे हे त्यात दिसुन आले. दवाखाने विभागासाठी प्रसुति विभागाकरीता ५० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात यावी. या संदर्भात नियोजन प्रशासनाने करावे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची वाट सर्वांना दाखवली . यात महापालिकेच्या सर्व शाळा सध्दयाच्या युगात स्पर्धेत टिकण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी भरीव तरतूद करणे सुध्दा गरजेचे आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शारीरीक , बौध्दीक , मानसिक व सामाजिक विकासाकरीता त्यांना योगाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी क्रीडा व मनोबल तसेच डिजीटल शाळा यासाठी आपण या अर्थसंकल्पात १ कोटींची तरतूद करण्यात यावी . हरित जळगांव , सुंदर जळगांव ही संकल्पना प्रत्यक्षात राबविण्याची वेळ आलेली आहे. यासाठी त्याला अनुकुल वृक्ष लागवड आणि संवर्धन आणि नविन बगीचा यासाठी ५० लाखांची तरतूद करावी. जळगांव मनपाची आर्थिक घडी बसविणे हा अर्थसंकल्पाचा खरा उद्देश आहे. ही आर्थिक घडी बसवितांना विकासाची गाडी रूळावर ठेवणे हे प्रशासनाचे काम आहे. यासाठी प्रशासनाने नविन रस्ते , नविन गटारी , नविन बगीचे यांच्यासाठी केलेली तरतूद पुर्ण वापरावी यात काटकसर व विकासाची सांगड घालत नविन गटारी याकरीता १ कोटी , नविन संडास व मुतारी यासाठी ५० लाखांची वाढीव तरतूद यामध्ये करावी. वरील सर्व खर्चांची वाढ बघता आपल्याला कर वसुल करणेसाठी मालमत्ता कराकडे लक्ष देण आवश्यक आहे. प्रत्येक विभागाकडील घरपट्टी विभागाकडील कर्मचारी यांनी जी ९० कोटींची वसुली स्विकारलेली आहे. ती त्यांनी ५ कोटींने वाढवुन ९५ कोटी एवढी वसुलीपोटी या वर्षात वसुली करावी.

म्हणजे या वर्षात वसुलीची गती वाढवावी. सदर अर्थसंकल्पाची अंमलबजावणी काटेकोरपणे पुर्ण झाल्यास निश्चितपणे या अर्थसंकल्पात सभागृहातील सदस्यांना यात काही सुचना मांडावयाच्या असतील तर मी त्याचे स्वागत करते आणि मी सन्मा.सदस्यांना विनंती करते की त्यांनी आपल्या सुचना आपण याठिकाणी मांडाव्या .

(मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, मनपा, जळगांव यांना दि.३१/०३/२०२२ रोजी सन्मा.सदस्या ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी महासभा क्र.३६ मधील सन २०२२-२०२३ चे बजेट संबधी दिलेले पत्र दिले व ते मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी स्विकारुन सदर पत्राची नोंद दि.३१/०३/२०२२ च्या कार्यवृत्तात घेणेबाबत निर्देश दिलेले असुन सदर पत्राची नोंद खालील प्रमाणे घेण्यात येत आहे.)

प्रति,
महापौर,
जळगांव शहर मनपा
जळगांव

विषय :- जळगांव शहर महानगरपालिका जळगांव चे २०२२-२०२३ चे बजेट संबंधी सुचना.

महोदय,

नुकताच प्रशासनाकडुन महासभेत सन २०२२-२०२३ चा बजेट सादर करण्यात आलेला आहे. खरंतर प्रशासनाने स्थायी समितीकडे बजेट सादर करायचा असतो आणि स्थायी समितीने त्यामध्ये योग्य ते बदल / दुरुस्त्या करुन महासभेसमोर स्थायी चा बजेट सादर करायचा असतो. मात्र महाराष्ट्रातील जळगांव मनपा ही एकमेव महानगरपालिका अशी असेल जेथे डायरेक्टली प्रशासनाचा बजेट महासभेत सादर झालेला आहे आणि आता महासभाच सदर बजेटला मंजुरी देणार आहे. स्थायी समितीचे गठनच न होणे ही बाब लोकशाहीला निश्चितच मारक अशी आहे. अर्थात याची कारणमीमांसा मला इथे करायची नाही. फक्त एवढेच म्हणेन की, स्थायी समितीच्या अधिकारांवर गदा आली आहे. असो.

सदरील बजेटमध्ये काही बाबी सुचविणे आवश्यक वाटते. त्याचा अंतर्भाव करुन घ्यावा ही विनंती.

१. मनपाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने डी.पी.डी.सी. नगरोत्थान, सुवर्ण जयंती इ.केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतुन निधी प्राप्त करुन घेऊन विकास कामे केली जातात. ही वस्तुस्थिती आहे. सदर निधी प्राप्त होऊन त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना काही वेळ खर्ची पडतो. तोपावेतो अनेक वस्तुंच्या किमतीत वाढ झालेली असते. ज्यामुळे बराच वेळा मंजुर झालेल्या निधीपेक्षा जास्त खर्च प्रत्यक्षात करावा लागणार असतो. प्रस्ताव पाठवुन त्याला मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरु होई पावेतो वाढलेल्या रेट मुळे निविदा रककमेत काम करणे शक्य होत नाही. त्यातच काम दिलेले आहे. वर्क ऑर्डर दिलेली आहे. पण आता मुदत संपत आलेली आहे आणि असलेल्या निधीमधुन काम पुर्णत्वास जाणे शक्य दिसत नाही अशी अवस्था आल्यामुळे अनेक विकास कामांमध्ये अडचणी निर्माण होतात. उपलब्ध निधी आणि प्रत्यक्ष लागणारा निधी यामध्ये जो गॅप निर्माण होतो त्या gap funding साठी १० कोटींची तरतुद या बजेटमध्ये करण्यात यावी.
२. सध्या महानगरपालिकेत दैनंदिन कामकाज करतांना मनुष्यबळ कमी असल्यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यासाठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी नेमता येऊ शकतात. मात्र आपल्याकडे कंत्राटी पध्दतीने आपण अद्याप अधिकारी नेमलेले नाही. तरी दैनंदिन कामकाजावर होणारा परिणाम लक्षात घेता कंत्राटी पध्दतीने अधिकाऱ्यांची नेमणुक करुन त्यांच्याकडुन काम करुन घेणे आता आपल्याला क्रमप्राप्त झालेले आहे. त्यासाठी त्यांचे मानधन अदायगी पोटी २ कोटींची तरतुद करावी.
३. तसेच मनपा जळगांव मध्ये सध्या मोठया प्रमाणावर अभियंते निवृत्त झालेले आहेत आणि नजीकच्या काळात अजुन होणार आहेतच. अर्थातच त्याचा परिणाम विकासकामांवर दिसुन येतोय. तज्ञ अभियंत्यांची कमतरता असल्याने काम वेळेत पार पडत नाही, गुणवत्ता मेंटेन होत नाही. त्यासाठी चा उपाय म्हणजे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणजेच पी.एम.सी. यांच्या नेमणुका करणे आवश्यक वाटते. प्रकल्पनिहाय त्यांची फी अदा करता येऊ शकते तर अशी पी.एम.सी.अपॉईंट करण्यासाठी व त्यांची फी अदायगी पोटी २ कोटींची तरतुद करावी.

४. हरित ऊर्जा संवर्धन या संकल्पनेस चालना मिळण्याच्या दृष्टीने मी स्थायी समिती सभापती असतांनाच असे सुचवले होते की, मनपा प्रशासकीय इमारत व मनपाच्या इतर इमारतींवर देखील सोलर पॅनल उभारणी केली पाहिजे. मात्र कोरोनामुळे याचे implementation होऊ शकले नाही. तरी page no.१५ वर मनपा प्रशासकीय इमारत व मनपा इमारतींवर सोलर पॅनल उभारणे कामी प्रशासकीय तरतुद २५ लक्ष दिसुन येत आहे. मात्र सदरची तरतुद ही पुरेसी नाही. त्यामुळे ती वाढवुन २ कोटींची तरतुद करण्यात यावी.

अर्थातच आता १६ कोटींचे जवळपास मनपाच्या बजेटमध्ये खर्चाच्या तरतुदीची जेव्हा मी मागणी करते आहे. त्यावेळेला जमा बाजु सुध्दा वाढवणं तितकच गरजेचे आहे. त्यासाठी सुध्दा एक महत्त्वपुर्ण सुचना मी देऊ इच्छिते ती म्हणजे महानगरपालिका मालकीच्या अनेक जागा मोक्याच्या जागा वर्षानुवर्ष पडुन आहेत. अगदी उदाहरणच द्यायचं झालं तर मी नगरसेविका असतांना शोधुन काढलेली आणि सभापती असतांना महानगरपालिकेच्या ताब्यात मिळवुन दिलेली रेड क्रॉस सोसायटी शेजारची जवळपास पंधरा हजार स्क्वेअर फुट जागा, इतरही काही जागा त्या वेळेला मनपाच्या निदर्शनास आणुन दिलेल्या होत्या तर अशा मोक्याच्या ठिकाणी असलेल्या मनपाच्या अनेक जागा निव्वळ पडुन आहेत. त्या जागा आपण बीओटी तत्त्वावर विकसित करुन मनपा उत्पन्नाचा कायमस्वरुपी स्त्रोत्र निर्माण करायला हवा. जेणेकरुन उत्पन्नात सुध्दा निश्चितच वाढ होईल आणि आपल्याला मी आत्ता सुचविलेल्या खर्चाची तरतुद करणेकामी हे सहाय्यभुत ठरु शकेल. या जागा विकसित करुन जवळपास २५ कोटींच्या आसपास किंबहुना त्यापेक्षा जास्तच उत्पन्न मनपास मिळु शकते.

तरी बजेटमध्ये उपरोक्त नमुद केलेल्या सर्व बाबींचा / सुचनांचा समावेश करावा ही विनंती.

सही /-
ॲड.शुचिता अतुल सिंह हाडा
नगरसेविका मनपा जळगांव

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला विशालभाऊ

**श्री. विशाल त्रिपाठी :-** आता या ठिकाणी आपल्या महानगरपालिकेचा अर्थसंकल्प महासभेत मंजुर करतांना प्रशासनाने दिलेला प्रस्ताव आणि काही तुमचे दिलेले जे काही या अर्थसंकल्पावर जी मांडणी केली ती एकदम सुंदर आणि सुव्यवस्थित आणि आपण केलेल्या सुचनेनुसार अजुन काही कुणाला सुचवायचे आहे का यासाठी मी याठिकाणी अर्थसंकल्पावर मी माझ या ठिकाणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने मत मांडतोय. अर्थसंकल्प करतांना सगळयात महत्वाचा जो भाग आहे आणि शहराचा विकास करतांना ती जमा बाजु या महापालिकेत उत्पन्न आले पैसे आले तर आपण या शहराचा विकास करू शकतो आणि जर सध्या परंतू जसे महापौरताई बोलल्या की वसुली हा जो विषय आहे महत्वाचा पार्ट तिन दिवसांपुर्वी पण आपली महापौर यांच्या दालनामध्ये या अर्थ संकल्पाच्या संबंधात चर्चा झाली होती. त्यावेळेस मी सुनिलभाऊंना हाच विषय सांगीतला की आपली महापालिकेची परिस्थिती कालची आणि आजची म्हणजे आपण जर विचार केला तर जळगांव शहर हे येणाऱ्या पुढील पाच वर्षामध्ये नेवु शकतो आणि शहराचा विकास अजुन चांगल्या पध्दतीने आपण करू शकतो. अशी आपली आजची महापालिकेची परिस्थिती आहे. थोडेफार विस तिस काही विषय होतील तर मी या ठिकाणी पान नंबर १ आपल्या बजेटचे जे आहे त्याच्यावर जे अ.क्रं. २ मालमत्ता कर व खुला भुखंड याच्यामध्ये मा.आयुक्त साहेब यांनी जे अपेक्षित उत्पन्न ८.५४ कोटींची तरतूद केलेली आहे. आपली महापालिकेची मागणी जी आहे. म्हणजे जे आपले पैसे खरे येणारे आहेत. तर याच्यामध्ये मी वसुलीला जे म्हणतो परत की महापालिकेने जर वसुलीला जर खरच न्याय दिला व प्रमाणिक पणे वसुली केली . कोणाला येता येत नसेलतरी आपण वसुली करू शकतो तर त्यांच्या दारावर आपला माणुस गेला पाहीजे. मी गेल्या १० वर्षांपासुन या महापालिकेची परिस्थिती बघतोय की घरपट्टी विभाग आकारणी करणे व बिल देण्याव्यतिरीक्त काहीही काम करत नाही. मी पाहीलेले आहे याच्यापुर्वी १० वर्षापुर्वी की मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत पुर्ण महानगरपालिका सर्व इंजिनियर सर्व कर्मचारी यांना एक टारगेट देवुन त्यांच्या टिम तयार करून आपण वसुली करत होतो. काही ठिकाणीच महापालिकेला फायदा होत होता. कारण लोकांना माहित नाहीये की एप्रिल महिन्यात १० टक्के रिबीट मिळत . मोजक्याच लोकांना माहिती आहे आणि लोकांना हेही माहिती नाहीये की, जर तुम्ही पैसे भरले नाही तर २ टक्के प्रतिमहिना व्याज म्हणजे वार्षिक २४ टक्के व्याज लागते हे सुध्दा माहित

नाहीये. आपण सभापती जितुभाऊ मराठे असतांना आपण २ मुली ज्यांना असतील त्यांना सुध्दा आपण त्यामध्ये सुट दिलेली आहे. ते ही लोकांना माहित नाहीये म्हणजे लोकांमध्ये जनजागृतीची एक जी भावना पाहीजे . जो मॅसेज जळगांव महापालिका देते ते होत नाही. तर मालमत्ता कर , खुला भुखंडाची आपली डिमांड म्हणजे येणारे पैसे आपले याच्यामध्ये आपण काही केले नाही किंवा निर्लेखित केले नाही आपण सुट दिलेली नाही किंवा त्याला वाळीत टाकलेले नाही. आपली डिमांड आहे १९ कोटी ४ लक्ष रूपयांची आणि आयुक्त साहेबांनी ८ कोटींची तरतूद याच्यामध्ये केलेली आहे. माझ म्हणणं आहे की १९ ची तरतूद ठेवा ना १९ कोटींची तरतूद ठेवुन आपण ८० टक्के वसुली करावी. होवु शकत आता जसे मागे मी प्रशांत पाटील साहेबांच्या मागे लागलेलो होतो आणि त्या पध्दतीने काम सुरू आहे की खुला भुखंड विभाग जो आहे हा घरपट्टीत वर्ग करा कारण बऱ्याचशा घरपट्टी आणि खुलाभुखंड यामध्ये तफावत आहे. एकदा त्याची ॲक्च्युल फिगर यायला पाहीजे. कारण बऱ्याच जागांवर घर बांधुन झालेले आहेत. त्या घराला घरपट्टी लागु आहे आणि आपल्या खुला भुखंड रजिष्टरला खुला भुखंडाचीपण आकारणी आहे. तर त्याच्यावर गतीने हे काम व्हायला पाहीजे. तर माझी या सभागृहाला विनंती आहे की यामध्ये आयुक्त साहेबांनी जी ८ कोटी ४ लक्षाची जी तरतूद केलेली आहे त्याच्यामध्ये ११ कोटींची वाढ करण्यात यावी . कारण ८ कोटी ही कमी आहे. आपले हे यायचे आहे ते आपल्याला करायला पाहीजे. यायचे आहे आपले हे काही द्यायचे नाहीये किंवा कर्ज नाहीये आपण तर ती तरतूद या ठिकणी वाढविण्यात यावी. त्याचप्रमाणे मालमत्ता कर विभाग वसुली मध्ये फार मोठी तफावत आहे. यामध्ये आपली एकुण मागणी जी आहे. ती १७१ कोटींची आहे. कमी नाहीये ही १७१ कोटी का झाली आपण आपला ॲक्च्युल घरपट्टीचा डाटा जर काढला तर ९० कोटी रूपयांच्या जवळपास आपला घरपट्टीचा डाटा नविन आकारणी ९० ते १०० कोटींच्या जवळपास येतो आणि आपली १७१ कोटी हे आपले बाकी आहे म्हणजे आपली थकबाकी पण निम्मी आहे. ती वसुली साठी काय करणार आपण ईकडे आपण लोकांना सुविधा देवु शकत नाही.तर माझ मत आहे की याच्यामध्ये सुध्दा ८० कोटी रूपये वाढ करण्यात यावी. यामध्ये जी साहेबांनी ९० कोटी ६९ लक्ष केलेली आहे . त्याच्यामध्ये आपण ८० कोटी रूपयांची वाढ करून माझ मत अस आहे सभागृहाला की ही वाढ करीत असतांना १ एप्रिल म्हणजे उद्यापासुन थकबाकीदारांची यादी करून थकबाकीदारांना नोटीस देवुन ती वसुल करा. पण आपण जी अन्यायकारक वसुली करतो असाही काही प्रकार नाहीये. जी आकारणी आहे जी रजिष्टरला थकबाकी आहे . जर आपण सगळ्यांच नियोजन जर आपण टिम उभ्या केल्या सर्वांना टारगेट जर दिलं. याच्यापुर्वी असंच होत . महापालिकेची परिस्थिती नव्हती . त्यावेळेस अधिकाऱ्यांना सांगीतले जायचे की वसुली केली तर तुमचा पगार निघेल. तर माझी सभागृहाला विनंती आहे ज्या वसुलीवर परिणाम होईल त्या वसुलीवर आपण भर दिला पाहीजे. याच्यासाठी आपण हा पाठपुराव केला पाहीजे. तर ८० कोटी रूपये ही वसुली आहे. याच्यामध्ये ८० कोटींची वाढ करण्यात यावी ही माझी सभागृहाला विनंती आहे. पान नं ३ नगररचना विभाग मी खरच अभिनंदन करेल नगररचना विभागच कारण की आपल्याला पुणवेळ सहाय्यक संचालक या ठिकाणी आपल्याला मिळाल्यामुळे काय फायदा होतो महापालिकेचा की आपण मागच्या बजेटमध्ये १५ कोटी रूपयांची तरतूद आपण या ठिकाणी ठेवली होती. त्यांनी १५ कोटींची तरतूद च्या वर जावुन साधारणत: आजच्या तारखे माझ्या माहितीप्रमाणे २० कोटी रूपये वसुल झालेले आहेत. तर मला वाटत की जर अजुन एक वर्ष चांगल काम केले याच्यावर चांगल्या पध्दतीने तर याच्यामध्ये आयुक्त साहेबांनी २४ कोटी १० लक्षची तरतूद केलेली आहे. यामध्ये ११ कोटी रूपयांची वाढ अजुन करण्यात यावी. यामधुन साधारणत: आता आपल्याला प्रमियम चे पैसे पुर्ण महापालिकेला वापरायला मिळतात. परवानग्या काही प्रमाणात होता आहेत या विभागात काही अडचणींमुळे काही परवानग्या अडकत असतील. तर ११ कोटी रूपयांची वाढ या नगररचना विभागात करण्यात यावी. त्यानंतर पान नं. ५ वर गाळेधारकांच्या शुल्काचा जो विषय आहे. गेल्या कईक वर्षांपासुन हा एक विषय आपला पेडींग आहे आणि बरेचशे गाळे हस्तांतरण झालेले नाहीयेत. त्याचा आपण महासभेने पण नविन ठराव केलेला आहे आणि मला वाटत मागचा ठराव आपण शासनाकडे विखंडनासाठी पाठवला होता. तर गाळे हस्तांतरण विभागात आयुक्त साहेबांनी १ कोटीची तरतूद केली आहे. पण माझ्या अंदाजाने जर गाळे हस्तांरणाची प्रक्रीया जर लवकर केली तर अजुन २ कोटी त्याच्यामध्ये वसुल होतील त्याप्रमाणे याच्यामध्ये १ कोटी ऐवजी २ कोटींची म्हणजे १ कोटीची वाढ करून २ कोटी करण्यात यावी. ही झाली महसुली जमा बाजु महसुली खर्चामध्ये बगीचे सुशोभीकरण करणे पान नं. २२ आता खर्चाची बाजु या ठिकाणी मी मांडतोय की आत्ताच मागच्या सभेला आपले विष्णूभाऊ भंगाळे यांनी पारीक उद्यानाचा विषय मांडला. तर ते सुशोभीकरण करणे हा महसुली खर्च आहे. हा आपला आजच्या तारखेला जे तयार झालेले बगीचे आहेत महापालिकेच्या कॉलन्यांमधील त्याच्यावर मा.आयुक्त साहेबांनी शुन्य तरतूद केलेली होती आणि तेथे मेंटेंनस समजा काही करायचे असले तर त्याच्यासाठी १ कोटी रूपयांची अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. जेणेकरून जे बगीचे आज अस्तित्वात आहेत. म्हणजे त्यांचे जे

काही सुशोभीकरण करायचे असेल किंवा दुरूस्ती करायची असेल. तर त्याच्यासाठी १ कोटी रूपयांची तरतूद ती याठिकाणी अंदाजपत्रकात करण्यात यावी. त्यानंतर पान नं. २३ वर स्मशानभुमी व इतर सार्वजनिक व्यवस्था व दुरूस्ती याची आयुक्त साहेबांनी या अंदाजपत्रकात ५० लक्ष रूपयांची तरतूद केलेली आहे. सदरील ५० लक्षची तरतूद फार कमी आहे. तर त्याच्यामध्ये ती १.५० कोटी ची वाढ करून ती २ कोटी रूपयांची करण्यात यावी. जेणेकरून आपल्या चारही स्मशानभुमीला ५०-५० लाख रूपये , कारण आपण ४२ कोटींच्या कामामध्ये १०० कोटी रूपये हे शासनाने मंजुर केलेले आहे. त्या ४२ कोटींच्या कामामध्ये आपण चारही स्मशानभुमींसाठी तरतूद केलेली होती. पण आता त्याच्यामध्ये आपण रस्ते घेतल्यामुळे मनपा निधीचा आपण त्याठिकाणी तरतूद करण्यात यावी. यानंतर पान नं. २३ आपल्या महापालिकेच्या ज्या शाळा आहेत. ताईंनी जसा आता विषय मांडला , प्राथमिक शिक्षण विभाग , क्रिडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम , तर शिक्षण मंडळाचे गेल्या दोन वर्षापासुन काही एक रूपया खर्च झालेला नाहीये आणि क्रिडा , युवा आणि काही सांस्कृतिक कार्यक्रम खाजगी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर होतात आणि त्या शाळांकडे आर्कषण वाढत . तर यातही आयुक्त साहेबांनी शुन्य रूपयाची तरतूद केलेली आहे. तर माझ मत आहे याच्यासाठी ५ लाख रूपयाची तरतूद या सभागृहाने करावी. ५ लाख रूपये त्या मुलांसाठी क्रिडा स्पर्धा , सांस्कृतिक कार्यक्रम , बक्षिस वितरण व इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी ५ लाख रूपये ठेवावे ती आयुक्त साहेबांनी शुन्य ठेवलेली आहे. त्यानंतर भांडवली खर्च जो आहे. आता महसुली उत्पन्न वाढल्यामुळे त्याच्यातील म्हणजे जो वाढलेला पैसा आहे. तो भांडवली खर्चात वर्ग करावा लागेल आपल्याला तर आपले कपील पवार साहेब तर तो निधी हा जो महसुली खर्च वजा जाता जो निधी आहे तो भांडवली खर्चामध्ये वर्ग करण्यात यावा. तर भांडवली खर्चामध्ये पान क्रं. ४३ नविन गटारी यामध्ये अंदाजपत्रकात १ काटी रूपयांची वाढ करून ५ कोटी रूपये करण्यात यावी. ४ कोटी रूपयांची आयुक्त साहेबांनी तरतूद केलेली आहे. तर ती ५ कोटी रूपये करण्यात यावी. कारण बऱ्याचश्या कॉलन्यांमध्ये आजही गटारी नाहीत. तसेच मागच्या ४२ कोटींचे रस्ते करतांना बऱ्याचशा नगरसेवकांनी विषय मांडला की रस्ते तुम्ही तयार करता आहेत पण तिथे गटार नाहीये. खेडी भाग असेल, पिंप्राळ्याचा काही भाग असेल नविन वाढलेला खेडीकडील काही भाग आहे. त्या ठिकाणी गटारींची आवश्यकता आहे. त्यांनतर नविन बगीचे जे आहे पान नं. ४३ वर नविन बगीच्यांचा विषय आहे. तर नविन बगीच्यांमध्ये आयुक्त साहेबांनी १ कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे तर ती १ कोटी रूपये ऐवजी २ कोटी रूपयांची तरतूद करण्यात यावी. कारण बऱ्याचश्या ओपन स्पेस आहेत आपल्याकडे , बऱ्याचश्या ठिकाणी नविन बगीचे आपल्याला डेव्हलप करावे लागतील कॉलन्यांमध्ये कारण शहरी भागामध्ये भाऊचे उद्यान आहे , गांधी उद्यान आहे , डॉ. शामा प्रसाद मुखर्जी उद्यान आहे. तरी हे आपल्याला नविन करावे लागणार आहे. तर याच्यासाठी आपल्याला २ कोटी रूपयांची तरतूद याठिकाणी करावी. त्यानंतर पेज क्रं. ४३ वरच नविन रस्ते याच्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी १० कोटींची तरतूद केलेली आहे. आपण ४२ कोटीमध्ये ही बरेच रस्ते घेतलेले आहेत. त्यानंतर ६१ कोटी पालकमंत्री साहेबांनी मंजुर केलेला निधी आहे. त्याच्यातही आपण बरेचशे रस्ते घेतले आहेत. पण बऱ्याचशा कॉलन्यांमध्ये आजही रस्ते नाहीयेत. आपण जे रस्ते घेतलेले आहेत त्यानंतर बऱ्याचशा कॉलन्यांमध्ये रस्त्यांचा अभाव आहे. हे ६ मीटरचे रस्ते असतील, काही WBM चे रस्ते असतील त्यठिकाणी तर १० कोटी ऐवजी अंदाजपत्रकात ५० कोटी रूपयांची तरतूद करण्यात यावी. पान नं. ४४ मनपा हद्दीत रेल्वे उड्डानपुल किंवा भुयारी मार्ग किंवा पादचारी मार्ग मागे पण आपला हा प्रस्ताव झाला होता. मा.खासदार उन्मेशदादा पाटील यांना मागच्या महिन्यातच त्यांना बोललो की तहसील कचेरी ते शिवाजी नगरला जो जोडणारा भाग आहे. तिथे पादचारी पुल उभारण्यात यावा. तर त्यांनी सांगीतले की ते महापालिकेचे काम आहे. तर मी त्यांना बोललो की रावसाहेब दानवे हे आपले रेल्वे मंत्री आहेत तर त्यांनी ते करण्याच तोंडी आश्वासन दिले आहे . तर ते म्हणाले की फक्त पायी चालणाऱ्या लोकांसाठी पुल मंजुर करणार आहेत. त्याच्यामध्ये हे सुरू आहे. परंतू जी ब्राम्हण सभा आहे त्याठिकाणी आपल्याला अंडरपास करावा लागणार आहे. त्याच्यासाठी आयुक्त साहेबांनी १ कोटींची तरतूद केली आहे ती फार कमी आहे. त्याठिकाणी ५ कोटींची तरतूद करण्यात यावी. तसेच पान नं. ४४ ज्या आपल्या माजी सभापती शुचिताताई हाडा यांनी रेडक्रॉस सोसायटीच्या मागे आपली जागा शोधुन काढली. ती जागा आपली आजच्या तारखेला कुठलेही आरक्षण नसतांना काही नसतांना ही जागा आपल्या ताब्यात आहे. तर ती विकसित करण्यासाठी किमान २ कोटी रूपयांची तरतूद करण्यात यावी. जेणेकरून आपण ते पुढे आपण त्याच्यावर बिओटी तत्वावर किंवा बीबीटी तत्वावर करू किंवा आपण महापालिका स्वत: डेव्हलप करू. तर त्याच्या प्राथमिक खर्चासाठी २ कोटी रूपयांची तरतूद याठिकाणी करण्यात यावी. पान नं. ४४ वर नविन विद्युत पोल उभारणे व नविन विज वाहीनी स्थलांतर करणे यासाठी मा.आयुक्त साहेब यांनी याच्याकरीता १ कोटी २५ लक्ष ची तरतूद केलेली आहे. तीपण कमीच आहे. कारण बऱ्याचशा कॉलन्यांमध्ये पोल नाहीयेत आणि आपल्या शहरातील पण बऱ्याचशा पोल

शिफ्टिंगचा विषय आहे. तर १.२५ कोटी वाढवुन ती २.५० कोटी करण्यात यावी. त्यांनतर पेज क्रं. ४४ विद्युत दहन वाहीनी बसविणे . आताच आपले जनता बँकेचे केशव स्मृती प्रतिष्ठान तर्फे गॅस दाहीनीचा प्रोजेक्ट आपल्या स्मशानभुमीत सुरू आहे आणि त्याच्यामुळे बऱ्याचशा लोकांना त्याचा लाभही घेताहेत काही लोक आणि याठिकाणी माझी मागणी अशी आहे की , आपल्या ज्या उरलेल्या तिन स्मशानभुमी आहेत. त्याठिकाणी पण ती विद्युत दाहीनी बसविण्यात यावी. जेणेकरून आपण पर्यावरणाचा जो त्रास होतोय, जस आता त्यांनी सांगतीले की आपल्याला नविन झाडे लावायची आहेत. वृक्षारोपण करायचे आहे. तर त्यासाठी आयुक्त साहेबांनी अंदाजपत्रकात २ कोटी ६० ते ७० लाखापर्यंत आपली ही विद्युत दाहीनी येते. तर २ कोटी ५० लक्षची तरतूद त्याठिकाणी करण्यात यावी. यानंतर अजुन पैसे शिल्लक राहतात. एवढी तरतूद केल्यावर पण तर मी सभागृहात मागच्या सभेमध्ये संमती घेवुन ठराव केलेला आहे सर्वानुमते की प्रत्येक नगरसेवकाला की नगरसेवक निधी ५० लाख रूपये त्यांच्या विकास कामांसाठी , त्यांचे थोडे थोडे कामांसाठी प्रत्येक नगरसेवकाला स्विकृतसह ८० नगरसेवक ५० लाख रूपये , मी म्हणजे त्यातला विषय नाहीये साहेब हा .

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सुनिलभाऊ मी खरच सांगतो की हा पायंडा कुठेतरी तुम्हाला सुरू करावा लागेल.

**श्री.सुनिल महाजन :-** विशालभाऊ तसे नाहीये. इतरांचही तेच म्हणण आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ पैसे द्यायचे नाहीये हो काम करायचे आहेत ५० लाखांचे अस म्हणण नाहीये की नगरसेकांना ५०/५० लाख द्या.

**श्री.सुनिल महाजन :-** ५० लाखात . . .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कशाला घालायचे सुनिलभाऊ तुम्ही पॉझेटीव विचार करा आतापण मी तुम्हीला सांगतो की ही महापालिका आज पण तुम्ही विचार केला तर आपल्यापासुन सुरूवात करावी लागेल की ही महापालिका चांगल्या रितीने पुढच्या ५ वर्षात आपल्या पायावर उभी राहून चांगल काम करेल. मी तुम्हाला शाश्वती देतो.

**श्री.सुनिल महाजन :-** विशालभाऊ मार्केटचे पैसे

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही जरी म्हंटल की मार्केटचे पैसे कमी होणार आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तरी ते कमी होणार नाही. तरी तो उत्पन्नाचा भार कमी होणार नाहीये. उत्पन्नाचा स्त्रोत आपला प्लसच आहे. त्याच्यामध्ये आपण त्याच्या व्यतिरीक्त आपल्याकडे इतर उत्पन्नाचे स्त्रोत आहेत.

**श्री.सुनिल महाजन :-** विशालभाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपण मागे वृत्तपत्रांमधुन आणि बऱ्याचशा व्हॉटसॲप ग्रुपच्या चर्चेवरून आपले जे गाळे , आपले जे घरकुलचे सांगाडे त्यांच्या जागा पडलेल्या आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ तुम्हाला माहिती आहे. तुम्ही काहीच बोलू शकत नाही. तुमची परिस्थती अशी झालेली आहे . तुम्ही कोर्टात पण जावु शकत नाही आता

**श्री.सुनिल महाजन :-** कोर्टाचा विषय नाहीये आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमच्याच सरकारने डिसीझन घेतले आहे लोकांचे , जाऊ द्या भाऊ तुम्ही कंन्टिन्यु करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** लक्षवेधी मांडली होती आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तेच सांगतो आहे. म्हणजे

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे हे आपल्या . .

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे हे चुकीचे झाले आहे. ६ लाख जळगांवकर नागरीकांसाठी , ६ लाख लोकांसाठी जे झाले आहे ना त्याच्यामध्ये व्यापारीपण आहेत ६ लाख लोकांमध्ये हे चुकीच झालेल आहे. म्हणजे सगळ्या लोकांना वेठीस धरल गेलेल आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ याच्यामध्ये तुमचे पण आहेत आमचेपण आहे जावु नाही शकत आहे कोर्टामध्ये

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी सांगतो की जर नगरसेवकांनी ज्याच्या त्याच्या याच्यामध्ये जर विकास कामे मंजुर होणे गरजेचे असले तर हे त्याच्यासंबंधासाठी आणि त्याच्या प्रभागासाठी महत्वाच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अडीचशे कोटींचे सगळ्या नगरसेवकांचे काम मंजुर केलेले आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो केले आहेत नितीनभाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** अहो विशालभाऊ तुम्ही विचार करा महिना महिना दोन दोन महिनाचा ५० लाखांचे कामापेक्षा जास्त आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ मनपा निधी म्हणताहेत ते.

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो विचार करायला पाहीजे दर महिन्याला किती होता तुम्ही हे वर्षाला ठरवताहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो मी काय म्हणतो विष्णूभाऊ हे मी तुम्हाला आजपण सांगतो. सत्ता ही उद्या कोणाची येईल. सत्ता येईल लाईल पण त्याला बोलायचा अधिकार नको का त्याने केले नको पाहीजे का त्याला त्याचा अधिकार मिळायला पाहीजे.

**सभागृहात सर्व सदस्यांच्या चर्चेमुळे आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रश्नच नाही. म्हणजे या वर्षी नाही पण पुढच्या वर्षापासुन तर आपल्याला ही सुरूवात करावी लागेल. लागल तर पुढच्या वर्षामध्ये २५ लाखांचे कामं मंजुर करा. पण ५० लाखांची तरतूद ठेवा . याप्रमाणे याविषयी कपील पवार साहेब माझ्याकडुन एक विषय सुटला आहे. नविन संडासी आणि मुताऱ्यांचा त्यात किती ठेवली आहे आपण तरतूद , नविन संडासी आणि मुताऱ्या

**श्री.कपील पवार, मुलेअ :-** ५५ लाखाची आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही तर ही तरतूद कमी आहे ताई ५० लक्ष, तरी कारण मी माझा अनुभव सांगतो , पिंप्राळ्यापासुन मी परवा आलो. तर तेथे लघवीची कुठेच जागा नाही. तर आपण माझी सभागृहात ही पण विनंती आहे अजुन की ज्या प्रमाणे आपण सुप्रिमच्या लेटरिन , बाथरूम प्रायोगिक तत्वावर आपण चालु केल्या आहेत. त्याचेच मॉडेल ठेवुन जर महापालिकेनेच सुध्दा ते तयार करून जर आपण चालवायला कुणाला दिल्या तर त्या मेंटेनही राहतील आणि तिथे सगळी सुविधाही लोकांना मिळेल. तर २ कोटी रूपयाची तरतूद ठेवावी. साधारणत: २० ते २५ लाखात ७ ते ८ तर होतील जळगांव शहरामध्ये प्रमुख स्पॉट सोडुन आणि याचा फार पाठपुरावा झाला म्हणुन आणि विषेश म्हणजे विषयासारखा विषयच नाहीये . महिलांसाठी फार अडचण आहे . विशेष म्हणजे ५० लाखच म्हणतोय आणि दोन वर्ष.

**मा.महापौर :-** नाही, नाही म्हणजे त्यात आपण ॲडीशनल ५० लाख म्हणताहेत .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो ना म्हणजे याच्याकरीता २ कोटी रूपये देण्यात यावे अशी माझी या सभागृहाला विनंती आहे.

**श्री. सचिन पाटील :-** महापौरताई,

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई

**श्री. सचिन पाटील :-** महापौरताई, मला बोलायचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझी सगळ्या सभागृहाला विनंती आहे की , हा जो बजेट मांडलेला आहे. सगळ्यांनी सर्वानुमते मंजुर करावा. गाळ्यांचा विषय जो आहे. तो गाळ्यांचा विषय आज शासनाचा कोणताही आदेश नसल्यामुळे आपल्याला जी तरतूद आहे. ती ठेवावीच लागणार आहे. ज्या दिवशी तरतूद ही दुसरी बजेट मध्ये त्याच्यामध्ये आपण चर्चा करू. अशी माझी सभागृहाला विनंती आहे. असे मी माझे मनोगत व्यक्त करतो.

**श्री. सचिन पाटील :-** महापौर महोदया, आपण आयुक्तांनी बजेट सादर केला २०२२-२३ चा त्याचा अभ्यास करून मा.महापौर महोदया आपले संमित्र स्विकृत नगरसेवक विशालभाऊ त्रिपाठी यांनी काही तरतूदी करण्याच्या ज्या सुचना दिलेल्या आहेत. परंतू हे सर्व होत असतांना नितीनभाऊ होत काय आहे की ९० कोटी रूपयापेक्षा दुप्पट घरपट्टीची ठेवा . असे विशालभाऊंचे म्हणणे आहे की जो काही आपल्याला खर्चायचा पैसा उपलब्ध होईल पण त्याबरोबर आपण महापौर महोदया, आयुक्त महोदय आपले ही हे कर्तव्य आहे की आपण या जळगांवकरांच्या ५ ते ५.५० लोकांकरीता काय बिल देत आहोत. नुसती घरपट्टी वाढवा आणि त्यातुन आपण काहीतरी तरतूद करू. कुठेतरी प्रक्टिकल बेस अप्रोच झाला पाहीजे. आताच उदाहरण आहे एक तासापुर्वीच लिफ्ट मध्ये मला संत ज्ञानेश्वर महाराज सभागृह चे महाराज भेटले भाऊ माझ्या सोबत शहर अभियंता सोनवणीसाहेब ते पण होते. ते ६ व्या मजल्यावर घरपट्टीला गेले होते जात होते. त्या वयस्कर काकांना मी थांबुन लिफ्ट मध्ये घेतले मग मी त्यांना म्हंटल की महाराज काय विषय आहे. म्हणाले मागच्या वेळेपर्यंत ४५४/- रूपये घरपट्टी यायची आता २८४५/- रूपये घरपट्टी आली आहे भाऊ असे ते म्हणाले मी सोनवणी साहेब होते त्यांना ते कागद दाखवले . त्यांनी सांगीतले की समाज मंदिरांना आपण घरपट्टी लावत नाहीयेत .

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता:-** भाऊ

**श्री. सचिन पाटील :-** एक मिनिटं साहेब मला बोलु द्या नंतर तुम्हाला तुमची बाजु मांडायचीच आहे. तर त्यावेळेला ते म्हणाले की समाज मंदिरांना आम्ही घरपट्टी लावत नाही म्हणे. मग ती ४५४/- रूपयांची घरपट्टी नितीनभाऊ याठिकाणी २८४५/- रूपये झालेली आहे. अस एकाचीच नाही तर आपल्या महापालिकेच्या , प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे ज्यांची माप कमी घेतली गेली असतील वास्तुची त्यांची नक्कीच वाढली पाहीजे.

अशी बेछुट पणे मापे दिली गेली नाही पाहीजे कुणालाही परंतू ही जी एजन्सी आहे अमरावतीची ही पहिल्यापासुन वादामध्ये चालतेय. तिच मोजमाप घेण्यापासुन तिच इंन्स्ट्रुमेंट फॉल्टी असल्यापासुन तर आज आपण प्रत्येक प्रभाग समितीच्या याच्यात सुनावण्या घेतलेल्या आहेत. सुनावण्यांमध्ये काय झालेले आहे. हे सर्वांना माहिती आहे. सुनावणी घेण्याकरीता घेतली गेली काही ठिकाणी माणस पाठविले गेले क्रॉस चेकींग करीता आणि त्यातुन काही निष्पन्न आले आणि काहीमधुन निष्पन्न आले नाही . ज्याच्या घरात भाडेकरू नाही त्याच्या घरात भाडेकरू दाखवला गेला आहे. येणारा कार्यकाळ मागील चार वर्षाचे बजेट बघितले भाऊ आपण या बजेट मध्ये जर ही घरपट्टी कार्यान्वित झाली आणि आमचे संमित्र विशालभाऊ व महापौरमहोदय यांच्या म्हणण्याप्रमाणे टारगेट अचिव्हमेंट झाल्यास तर येणाऱ्या पुढच्या बजेटपर्यंत हे अस घडत गेले तर जळगांवची जनता आपल्याला माफ करणार नाहीये. प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे भरपुर मोठ्या प्रमाणामध्ये चुका घडलेल्या आहेत आणि त्या चुकांमध्ये काही सुनावण्यांमध्ये सुधारणा केली आहे. हे फक्त आभासी दर्शविले आहे आपल्या सर्वांना , बिल सुध्दा आता जे  गेल्या दोन दिवसांपासुन वाटले जाताहेत. त्यांचे म्हणणे आहे की दोन दिवसांचे टारगेट आहे की आम्हाला हे वाटप करून मोकळे व्हायचे आहे. म्हणजे जे नागरीक अज्ञान आहे ज्यांना काही ज्ञान नसत काही नसत ते घरपट्टी भरून मोकळे होतील. जी कायमस्वरूपी घरपट्टी चुकीची आलेली आहे ती भरली गेली सुनिलभाऊ म्हणजे कायमस्वरूपी भुर्दंड त्याला भरणं आहे. जस आपण मागे केले की गाळेकरीता शास्ती माफ करा हे करा ते करा सुप्रिम कोर्टाचे सगळे आदेश दुर ठेवले. ते गाहेधारकही आपले जळगावचेच नागरीक आहेत. ते काही भाडेकरी नाहीयेत ते आपलेच नागरीक आहेत जळगांवचे, त्यांच्याकरीता जर शासन एवढ करू शकतय , तर ही गोरगरीब जनता आहे. यांना ज्या चुकीच्या घरपट्टया ज्या आलेल्या आहेत ईबाभाई त्या कुठेतरी दुरूस्त झाल्या पाहीजेत. तोपर्यंत माझ तरी एक मत आहे व्यक्तिगत की तोपर्यंत घरपट्टी विभागाने वसुली करू नये काही दिवस तरी , बिल वाटले गेले त्यावर काहीतरी तोडगा काढला पाहीजे. उपमहापौर महोदय , आयुक्त साहेब विषय हा गंभीर आहे हे लक्षात घ्या. एक वर्षानंतर सर्वांना ईलेक्शनला सामोरे जायचे आहे. लोक , जनता माफ करणार नाही कोणालाच , ३-३/४-४ हजार घरपट्टी वाढलेली आहे ईबाभाई , हि वाढलेली घरपट्टी याच्यावर योग्य तो सुयोग्य मार्ग काढायला पाहीजे. आता याच्यामध्ये जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री आदरणीय गुलाबभाऊ यांनी मोठ्याप्रमाणात निधी दिला आहे ६१ कोटींचा, मागच्या मार्च महिन्यामध्ये निधीच नियोजन करतांना प्रशासनाने ढिसाळ कारभार केलेला आहे पुर्ण , आत्ता आत्ता वर्कऑर्डर दिलेल्या आहेत. कालच्या मिटींगमध्येही भरपुर प्रमाणात आक्षेप हे याच्यावर ओढले गेलेले आहेत. पालकमंत्री साहेबांच्या , कलेक्टर साहेबांच्या आणि आयुक्त साहेब पण होते तिथे , तर असा ढिसाळ कारभार होता कामा नये. प्रत्येक वेळेस बजेटमध्ये कागदोपत्री रूपया कसा येतोय आणि रूपया कसा खर्च होतोय . याच एक कॅल्क्युलेट गणित मांडल जात. आपणा सर्वांना माहिती आहे की बजेट हे कोलमोडल्या जात . हाडा ताई बजेट जे मांडतो ते पुर्ण होतच नसत . बजेट कोलमोडल्याच जात आता याच्यामध्ये समजा आपण आपल्या घराचं बजेट जरी केल तरी कुठेतरी डिस्टप होतच. हेपण जावु द्या. परंतू हा जो आहे . पालकमंत्री महोदयांनी दिलेला निधी आणि या नगरविकास खात्याने दिलेला निधी तर याच नियोजन करतांना ज्या वाढीव लोकवस्त्यांच्या कॉलन्या आहेत. त्यांना यातील काहीतरी लाभ द्यायला पाहीजे . नुसता सिटीचा निधी घेण्यासाठी वारंवार लाभ घेवुन चालणार नाहीये. कारण जी जनता घरपट्टी भरत आहे आणि त्यात जर आपण चुकीची वाढीव गलथान कारभारामुळे घरपट्टी लागतेय. त्याच्यावर लवकरात लवकर तोडगा काढावा. ही माझी या सभागृहाकडे अपेक्षा आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई, नुकताच प्रशासनाकडून सादर केलेला २०२२-२३ चा हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. खरतर आता ताईंनी आपल्या मनोगतात सांगीतलं की , जी आपली नियमानुसार पध्दत आहे त्यानुसार आपण स्थायी समिती कडे आपण बजेट सादर करत असतो आणि स्थायी समिती यामध्ये योग्य ते बदल करून किंवा दुरूस्त्या करून नंतर ते महासभेसमोर आणत असतात. प्रथम जळगांव महापालिका ही महाराष्ट्रातील एकमेव महापालिका असेल की जिथे स्थायी समितीचे गठनच झालेल नाही. खर तर ही फार खेदाची बाब आहे. काय झाले आहे की हा आता डायरेक्ट बजेट महासभेमध्ये आला आणि महासभाच त्याला मंजुरी देणार आहे. स्थायी समितीचे गठन न होण ही खरतर लोकशाहीला मारक अशी घटना आहे. ठिक आहे मला त्याच्यामध्ये कारणमिमांसेत फारस जायच नाही. एवढच म्हणेण मी ताई की स्थायीच्या अधिकारांवर गदा आणली गेलेली आहे. आपण आजच्या बजेट बद्दल बोलतांना एका महत्वाच्या विषयाबद्दल सुध्दा आज येथे अभिनंदन व्यक्त करावस वाटत की महापालिका प्रशासनासोबत जेव्हा आपण काम करतो आहे. लोकप्रतिनिधी म्हणुन त्यावेळेला चांगल्या अधिकाऱ्यांसोबत काम करण्याची सुध्दा आम्हाला संधी मिळालेली आहे आणि त्यातलेच एक नांव जाहीर करावस वाटते. ते म्हणजे आपले कपिल पवार साहेब, जे खरोखर अशा अधिकाऱ्यांसोबत काम करतांना आम्हाला अनेक गोष्टी शिकायलाही मिळाल्या. अनेक चांगल्या गोष्टींचे ईम्प्लीमेंटेशन प्रशासन कस करू शकत हे सुध्दा आम्ही

यांच्याकडून शिकलो. प्रामाणिकपणे आणि अत्यंत कर्तव्यबुध्दिने काम पार पाडणारे अधिकारी हे यांच्याकडे बघितल की खरोखरच एक आशादायी चित्र सुध्दा निर्माण होत. जे सध्या फार लोक पावतं आहे. आमच जळगांव महापालिकेच हे सौभाग्य की आता या कपिल पवार साहेबांसारखे अधिकारी लाभले. पवार साहेबांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये खुप महत्वाचे निर्णय जे महापालिकेच्या हिताचे त्यांच्या हुशार बुध्दीने आणि प्रामाणिक पणा मुळे त्यांनी महापालिकेच हित कायमच जोपासल आणि अनेक आव्हान प्रसंगातुन आणि कठीण प्रसंगातुन महापालिकेला यशस्वीरित्या बाहेर सुध्दा काढल. त्यासाठी मी पवार साहेबांचे विशेष अभिनंदन करते आणि आपल्या सगळयांच्याच वतीने मी पवार साहेबांचे आभार सुध्दा मानते आणि मला वाटत पवार साहेबांच्या कार्यकाळातील हे जळगांव महापालिकेच हे तिसर बजेट आहे. कदाचित पुढच्या बजेटच्या वेळेला नियमानुसार साहेब जळगांव महापालिकेत सेवेत असतीलच अस नाही आणि निश्चितच पणे जाणार याची आपल्या सगळयांनाच जाणीव आहे. अर्थातच अर्थ विभागातील सगळे अधिकारी कर्मचारी त्यांचे सुध्दा मी अभिनंदन करते की एक चांगल बजेट प्रशासनाने महासभेत सादर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अगोदर पासुन नियोजन करून प्रशासनाने सादर केल त्यामुळे सगळयाच प्रशासनातील या बजेट संदर्भात ज्यांनीही काम केलेल आहे त्या सगळयांचच अभिनंदन करते. आजच्या बजेट बद्दल ताई विशालभाऊंनी भारतीय जनता पार्टी तर्फे काही महत्वाचे मुद्दे आता अवगत केलेलेच आहेत. त्या सगळयाच मुद्दयांना माझ अनुमोदन देते . या सगळयांचा अंर्तभाव आपण आता या बजेट मध्ये करून घ्यावा आणि काही महत्वपुर्ण आणि नविन गोष्टी मला प्रशासनाला आणि आपल्याला सुचवायच्या आहेत. ताई काय आहे की जळगांव मनपाची आर्थिक परिस्थिती आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे. विकास काम करतांना आपण सगळेच विकास काम आपण सुवर्ण जयंती , नगरोत्थान योजना अशा केंद्राच्या किंवा राज्याच्या किंवा इतर योजना अशा वेगवेगळ्या योजनांमधुनच निधी प्राप्त करून घेवुन घेतो आहे. त्या शिवाय वेगळे विकास काम करण्यासाठी सध्या तरी आपली परिस्थिती दिसुन येत नाही. मग अशावेळेला होत काय ताई की एखाद काम आपण दखाद्या निधीतुन आणल त्याची निविदा निघते काम दिल्या जात. हे होत व त्याला वर्कऑर्डर पण दिली जाते आणि या सगळयांमध्ये जो कालावधी जातो. जसे वर्कऑर्डर दिल्यानंतर काम सुरू होईपावेतो अनेक गोष्टींच्या किंमतींमध्येही वाढ झालेली असते. याच्यामुळे होत काय त्या कामासाठी अवेलेबल असलेला फंड आणि आता आम्हाला प्रत्यक्षात लागणारा फंड यामध्ये तफावत निर्माण होते. तर यामुळे अनेक कामं म्हणजे वर्कऑर्डर दिलेली आहे. काम दिले गेले निविदा निघाली, वर्कऑर्डर दिल्या गेली आणि आता काम पण दिले गेलेले आहे पण प्रत्यक्ष काम करतांना गॅप फंडींगमुळे प्रत्यक्षात अडचणी निर्माण होतात आणि त्या विकासकामांमध्ये अडथळे निमाण होतात. तर मला वाटत की आपण या गॅप फंडींगसाठी या निधीमध्ये एक विशेष तरतूद करावी. १० कोटींच्या तरतूदीची मी मागणी करते आहे हा एक मुद्दा होता माझा, दुसरा मुद्दा येथे ताई सद्या आपण सगळयांनाच ज्ञात आहे की जळगांव मनपामध्ये मनुष्यबळ खुप कमी झालेल आहे. रिटायर्डमेंट खुप जास्त होताहेत. बरेच अधिकारी कर्मचारी रिटायर्ड झालेले आहेत. तर हे मनुष्यबळ कमी असल्यामुळे काय होतय की दैंनदिन कामकाजामध्ये आपल्याला काम करतांना प्रशासकीय अडचणी येतात. मनुष्यबळाअभावी आपण प्रत्यक्ष कामाला न्याय देवु शकत नाही. त्यामुळे कंत्राटी पध्दतीने कामगार भरती करून घेण. कंत्राटी पध्दतीने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची भरती करून घेण हे आपल्याला आता शक्य आहे. तर आपल्याला आता ते कराव लागेल. तर तस करण्यासाठी त्यांच शेवटी मानधन अदा कराव लागणार आहे. तर त्या मानधन अदायगी पोटी आपण २ कोटींची नॉमीनल तरतूद करावी अस मला वाटत. तिसरा महत्वाचा मुद्दा आहे जसे अधिकारी आणि कर्मचारी आहेत तसे अनेक अभियंते नजीकच्या काळात रिटायर्ड झालेले आहेत आणि अजुन काही होणार आहेत. तर तज्ञ अभियंते असणे कारण तज्ञ अभियंते नसल्यामुळे होत का आहे काय अनेक कामांमध्ये आपल्याला खुप अडचणी येतात. अडचणी फेस कराव्या लागता आहेत. तज्ञ अभियंते नसल्यामुळे क्वॉलीटी सुध्दा मेंन्टेंन करायला सुध्दा अडचणी येताहेत आणि जे प्रशासकीय अधिकारी आहेत. त्याच्यावर याचा अतिरीक्त ताण येतो आहे. तर त्यासाठी सुध्दा मी आपल्याला येथे सुचवु ईच्छिते, कामाची गुणवत्ता मेंन्टेंन होत नाही, कामासाठी जो वेळ लागतोय ते काम वेळेवर होत नाहीयेत. तर आपल्याला आता हे क्रमप्राप्तच आहे. हे कधी आपण काळाची गरज ओळखुन बदल आणि मनपामध्ये आज जे लुपहोल्स आहेत की आपल्याकडची कमतरता आहे. हे ओळखुन आपल्याला या गोष्टी कराव्या लागणार आहे. तर या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंस्लंटन्सी नेमणुकी साठी आपल्याला तरतूद करावी लागेल. आपण प्रोजेक्ट निहाय त्यांच मानधन देवु शकतो. तर त्यासाठीही २ कोटींची मी येथे तरतूदीची मागणी करते आहे. त्यानंतर ताई मी स्थायी समिती सभापती असतांना हरित ऊर्जा संवर्धन या योजनेला चालना देण्याच्या दृष्टीने मनपा प्रशासकीय इमारत आणि मनपाच्या मालकीच्या असलेल्या सगळयाच इमारतींवर सोलर पॅनल बसिवण्यासाठीची तरतुद माझ्या अर्थसंकल्पाच्या वेळेला केलेली होती. दुर्देवाने कोरोनामुळे त्यावेळेला या सगळ्या गोष्टींवर वर्कआऊट करू शकलो नाही. गेल्या दोन वर्षामध्ये

कोरोनाच सावटच असल्यामुळे ती तरतूद राजुभाऊ सभापती असल्यावर पण कॅरीफॉरवर्ड केल्या गेली नाही ते होवू शकलं नाही. मात्र आपण आता येथे पुन्हा एकदा आता मी हे केल होत पान नं १५ वर आहे. त्याच्यामध्ये प्रशासनाने फक्त २५ लक्षाची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये फारस काही होवु शकणार नाही. आज जरी आपल्याला हा सोलर पॅनल उभारण्याचा जो खर्च दिसत असला तरी याचे बेनिफीटस जे आहेत. सगळ्याच प्रशासकीय अधिकाऱ्यांना याचे बेनिफीटस माहिती आहे. कारण एकदाच आपल्याला हा खर्च करावा लागणार आणि त्यानंतर ईलेक्ट्रिसिटी बिलामध्ये खुप मोठ्या प्रमाणावर सेविंग होणार आहे आणि त्यामुळे मला वाटत की हा खर्च करायला आपण काहीच हरकत नाही. तर जी २५ लाखाची तरतूद आहे. तर ती वाढवुन २ कोटींची करण्यात यावी. हरित ऊर्जा संवर्धनाच्या संकल्पनेला आपली चालना मिळणार आहे आणि भविष्यात हा खर्च आपला वाचणार आहे. आता येथे मी जवळपास १६ कोटींचे वाढीव मुद्दे मांडलेले आहेत. अर्थातच माझी जबाबदारी आहे की मी जमाबाजु सुध्दा काहीतरी वाढीव सुचवायला हवी ताई खुप महत्वाच्या मुद्दयाकडे मी प्रशासनाच आणि सगळ्या सभागृहाच लक्ष वेधु ईच्छिते जळगांव महापालिकेच्या अनेक मोक्याच्या ठिकाणच्या जागा वर्षानुवर्षे पडुन आहेत. आता जस विशालभाऊंनी सांगीतल की मी सभापती असतांनाच्या काळात रेडक्रॉस सोसायटीची जागा मनपाच्या ताब्यात घेतली. तरी जागा मी सभापती असण्याच्या पुर्वी फक्त नगरसेविका असतांनाच शोधुन काढली होती. त्यानंतर अनेक म्हणजे कलेक्टर ऑफीस पर्यंत जावुन त्याचा पाठपुराव करून जळगांव मनपाच नांव पुन्हा त्या उताऱ्यावर लावलेल आहे. सभापती असतांना मी ही जागा मनपाच्या ताब्यात मिळवुन दिलेली आहे. अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेली ही जवळपास १५ हजार स्के. फुट जागा आहे आणि मी सभापती असतांनाच्या कार्यकाळ असतांनाच नाही तर अशा अनेक इतर मोक्याच्या मनपाच्या जागा ज्या एकमेव धुळखात पडलेल्या आहेत किंवा त्याचा बेकायदेशीर वापर होतो आहे. या सगळ्या प्रशासनाच्या निदर्शनास आणुन दिल्या होत्या. तरी खुप दुख: वाटत हे सांगतांना की अजुनही ज्या जागांचा बेकायदेशीर पणे वापर होतो आहे. त्या जागा प्रशासनाने ताब्यात घेतलेल्या नाहीत. मनपाचा उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्त्रोत आपण तयार करू शकतो आहे ताई तर या सगळ्या जागा आपण बीओटी पध्दतीने किंवा विकास काम करण्याचा विचार केला तर आपला कायमस्वरूपी स्त्रोत तयार करण्यासाठी आपण काय करू शकतो. आपण याच्यामध्ये सुचविण्यासाठी काही प्रस्ताव मागवु शकतो आणि योग्य तो प्रस्ताव आपण महासभेसमोर ठेवुन त्याला मंजुरी देवु हे ठरवुन घेवु शकतो आणि तो एक स्त्रोत निर्माण होईल आणि मला वाटत २५ कोटींच्या आसपास किंवा त्यापेक्षाही जास्त उत्पन्न या धुळखात पडलेल्या जागा आपण योग्य पध्दतीने त्याचा विनियोग केला तर ते उत्पन्न मिळू शकत तर या सगळ्या ज्या आपल्याकडून अपेक्षा आहेत आणि या सगळ्या बाबींचा अंर्तभाव आजच्या बजेटमध्ये करून घ्यावा. जे काही नविन सुचविलेले आहे ते आपण बजेटमध्ये घ्यावे आणि उत्पन्न वाढीच्या दृष्टीने जो प्रस्ताव मी मांडलेला आहे. त्याच्यावर सुध्दा सकारात्मक दृष्टीने विचार करावा. धन्यवाद.

**सौ.ज्योति चव्हाण :-** मा.महापौरताई , मा.उपमहापौरसाहेब आयुक्त साहेबांनी मागील मिटींगमध्ये जो बजेट सादर केला. मनपा अधिकारी कर्मचाऱ्यांना जो ७ वा वेतन आयोग लागू केला त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे आणि त्यांच मी अभिनंदन करते. तसेच आयुक्त , उपायुक्त, कपिल पवार यांच विशेष असे अभिनंदन करते. त्यांनी कर्मचाऱ्यांची बाजु नेहमी समजुन घेतली आणि कर्मचाऱ्यांच्या हिताचे जे निर्णय त्यांनी घेतले कपिल पवार यांचेपण मी अभिनंदन करते, प्रशांत पाटील साहेब यांचे अभिनंदन करते. त्यांनी जी मालमत्ता करामध्ये वाढ करण्यामध्ये जे प्रयत्न केले आणि उत्पन्न वाढीसाठी व सर्व प्रभाग समितींमध्ये त्यांच जस पुर्ण लक्ष असत आणि त्यांनी उत्पन्न वाढीसाठी जे प्रयत्न केले त्यासाठी मी प्रशांत पाटील साहेबांचेही मी अभिनंदन करते आणि आयुक्त साहेबांचा मी येथे सत्कार करते आणि या बजेटमध्ये आयुक्त साहेबांनी जो उत्कृष्ट बजेट मांडलेला आहे. फुगवण्याचा बजेट नाही त्यामुळे तो मला आवडलेला आहे आणि नंतर महापौरताईंनी आता सांगीलेलेच आहे की काही त्रुटी आहेत की शिक्षण विभागाकडे आपलं लक्ष दिल गेलेल नाही तस महापौरताईंनी सांगीतल तस आपण शिक्षण विभागाकडे पुढे अद्यावत शाळा ही महापालिकेची सुरू करावी आणि आपल्या ज्या बजेट चे नियोजन होते जो आपल्या हुडकोचा आपला ३ कोटींचा हप्ता आता लवकरच बंद होणार आहे. तर या हप्त्यामधुन आपण जो पैसा उरेल त्याच्यातुन एखादी चांगली इमारत डेव्हलप करावी व जळगांव शहरातील सर्व नागरीकांना कमी पैश्यात चांगल शिक्षण मिळाव अशी एक इमारत उभी करून त्यावर डिजीटल असे सोईचे करावे. त्यासाठी तो खर्च तिथे करावा व तो निधी तिथे वापरावा अस मी या अंदाजपत्रकामध्ये करावे आणि परत एकदा मी ७ वा वेतन आयोग लागू केला त्याबद्दल पुन्हा परत एकदा सर्व अधिकारी , कर्मचारी यांच्या वतीने आस्थापना सभापती या नात्याने धन्यवाद देते आणि दुसरी एक आनंदाची गोष्ट की आज माझ्या मुलीच लग्न ठरले आहे आणि मी सर्व सभागृह आणि माझे सर्व मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांना हा आनंद शेअर करते धन्यवाद.

**सन्मा.सदस्या यांनी व्यासपिठावर येवुन मा.आयुक्त व श्री. कपिल पवार (मुलेअ) यांचा सत्कार केला.**

**श्री. महेश चौधरी :-** प्रसुतिगृहाच्या संदर्भात ताईंनी ५० लाखांची तरतूद केली. त्याबद्दल या सभागृहामध्ये ताई मी आपले अभिनंदन करतो आणि जळगांव शहरामध्ये ५० लाखांची तरतूद जी आपली प्रसुतिगृहाच्या संदर्भात आहे. मला अस वाटत की कमी आहे. कारण ओटी साठी जो खर्च आहे. ऑपरेशन थिएटर साठी खुप खर्च लागतो आणि जळगांव शहरामध्ये कमीत कमी दोन प्रसुतिगृह असावे. १ शिवाजी नगरच्या दवाखान्यात आणि एक नानीबाई हॉस्पीटल किंवा चेतनदास हॉस्पीटलमध्ये तर याच्यासाठी आपल्याला कमीत कमी १ कोटी निधी ची तरतूद करावी अशी मी विनंती करतो आणि दवाखाने विभागामध्ये कंन्सल्ट विभाग असावा अशी मी एक विनंती करतो. कंन्सल्ट विभागामध्ये जर काही तरतूद करता आली तर ती जसे इमारत दुरुस्ती खर्च जो आहे तो इमारत दुरूस्ती खर्चामध्ये करता येईल. त्याच्यामध्ये वाढ करून , दवाखान्यांची परिस्थती खुप खराब आहे. आपण डि . बी जैन हॉस्पीटल ला जावुन भेट द्या किंवा चेतनदास हॉस्पीटल असेल की नानीबाई हॉस्पीटल असेल. पांझरापोळ चौकामध्ये एक हेल्थ पोस्ट सेंटर आहे. तिथे अशी परिस्थिती आहे की तिथे की जीर्ण आहे. अशी परिस्थिती तिथे आहे. आपल्या एएनएम. जिएनएम तिथे बसतात. तर काही दुर्घटना घडु नये. म्हणुन आपली जी इमारत आहे ती पडु नये. आता इमारत दुरुस्तीसाठी जी तरतदू केली आहे. त्या तरतूदीमध्ये काही वाढ करून दवाखान्यांच्या दुरूस्तीसाठी सुध्दा आपण तरतूद करावी.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आयुक्त साहेबांनी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे. आणि महापौर महोदयांनी जी आकडेवारी दिलेली आहे. चांगला अर्थसंकल्प आहे कर वाढलेला नाही. परंतु जेव्हा लोकं आमच्याकडे येतात.आणि महापालिकेचे आमचे प्रभाग अधिकारी आहे कोणीही असो.आपला आदेश आहे. तर लोकांना वाढीव बिले आलेली आहे. आयुक्त साहेब, लोकांना डबल डबल टिबल टिबल वाढीव बिले आलेले आहे. विशाल भाऊंनी ही मांडले की, वसुली वरती भर द्यायला पाहिजे. नक्कीच द्यायला पाहिजे. परंतु जळगांवकर तु फक्त कर भर. आम्ही कर भरुन का भरायच. जर आम्हाला सोयी सुविधाच मिळत नसतील. जळगांवकरांना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मिळत नाही का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** गेल्या अनेक वर्षापासुन मिळत नव्हती आता मिळायला सुरुवात झाली.

**श्री.कैलास सोनवणे :-** भेटत नाही का ,सोई सुविधा भेटत नाहीयेत का

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा साहेब आता ही जी कामे होत आहे. पालकमंत्री याच्या पहिले जे ही असतील त्यांनी केलेले आहे. पण आपण नगरपालिकेला फक्त करच भरायचे का ? का म्हणुन भरायचे.सचिन पाटीलांनी हे मांडले की, फक्त लोकांनी करच भरायच. आपण पेपरात देतो. कोण कोण थकबाकीदार आहे त्यांच्या पाट्या लावा. मग आधी का त्यांचे पाट्या लावत नाही जर लोकांना तुम्ही सोयी सुविधा देत नाही तर. सर्वप्रथम सोयीसुविधा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. आपण जर त्यांना सोयीसुविधा देणार नाही तर लोकं करच भरणार नाही ना.आज लोकं कामे चालु असतांना सुध्दा शिवीगाळ करतात. ठेकेदारांना एवढे मातुन ठेवलेले आहे.म्हणजे आज ३१ तारीख आहे. आज कामाचं डेड लाईन खलास होत आहे. तुम्ही मंजुरी द्याल ही वेगळी गोष्ट आहे. परंतु महिना महिना दोन दोन महिने झाले खडी रस्त्यावर पडलेली आहे. लोकं आमच्यावर कमेंट करत आहे की, खडी सुखविण्यासाठी टाकलेली आहे का ? बरोबर आहे. म्हणजे एवढे मातुन ठेवलेले आहे तुम्ही ठेकेदारांना ठेका घेतो कोण, काम करतो कोण, याच्यावरती वचक ठेवणार कोण. म्हणजे आम्ही येथे महिन्या दोन महिन्यात यायच, फक्त बोमा मारायच्या आणि निघुन जायचे. लोकांचे सुविधांकडे कोण पाहणार आहे. आमची जी बोमाबोम होत आहे. ते कोण बघणार आहे. सगळयाच वार्डाचे सगळे नगरसेवक, बोलायला सगळेच म्हणतात, म्हणजे सगळयांची मनोस्थिती तिच आहे. सगळयाच बोलण सारखच आहे. परंतु कोणी बोलत नाही . माझ्याकडे आला म्हणजे असे झालेले आहे. सगळेच दबलेले आहे. कोण कोणाचे काय? मनस्थिती अशी आहे समजु शकतो मी. परंतु माझी गोष्ट वेगळी आहे. कमीत कमी एक एकाला तुम्ही वचन द्या. एखादी तुम्ही व्हिजीट द्यायला लावा. काम सुरु होवुन जातो तेव्हा पासुन कोणी बघायला तयार नाही. लोकांचे शिव्या आम्ही खायच्या का ? कशाला आम्ही कर भरायचे, पाण्याच्या बाबतीत पण तसेच आहे. लाईट फुटलेल्या आहे साहेब. दोन महिन्यापासुन बाजार रस्त्याचे काम चालु आहे. दोन महिन्यापासुन सांगितले आहे की, तो रस्ता रिपेअर करुन टाका. किशोर चौधरी सुट्टीवर गेलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बजेटची मिटींग आहे ही. आजची मिटींग फक्त बुध्दीजीवी नगरसेवकांची मिटींग आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अप्पा, बजेटची आहे. परंतु जी तरतुद आहे ती तर दाखवावी लागेल ना. लोकांची जी स्थिती आहे ती सांगावी लागेल ना. फक्त बजेटची तरतुद करुन फायदा नाही. ठिक आहे महापौरांनी चांगला बजेट मांडलेला आहे. मा.आयुक्त साहेब, मला असे वाटते की, जळगांव शहराचे शाळा तुम्ही बंद करण्याच्या पलीकडे येवुन गेलेल्या आहे. शैक्षणिक बाबतीत काही तरतुद केलेली नाही. दवाखान्यांबाबतीत ५१ लाख तरतुद केलेली आहे. कुठुन पुरणार ५१ लाख रुपये तुम्हाला. गरीब लोकांचा झोपडपट्टीचा एरिया आहे. त्याच्याकडे पण तुम्ही लक्ष दिले पाहिजे. ५१ लाख रुपये खर्च तुम्ही १०-२० लाख रुपये करतात. गरिबांवर तुम्ही लक्ष द्या. दवाखान्यांवरती ५१ लाख तरतुद दाखविलेली आहे. रस्त्यांवर जी आहे वृक्षरोपण, तुम्ही ५००० रोपे म्हणत आहे. कधी झाडे लावले गेले नाही. ट्रीगार्ड तुम्ही देतात. जे ही केलेले आहे. ट्रीगार्ड घेतांना त्याच्यावर कलर लावा त्याच्यावर महापालिकेचे सिमबॉल लावा. कमीतकमी त्याच्या माध्यमातुन तरी आपल्याला हिरवेगार शहर दिसेल. त्या ट्रीगार्डावर जर आपले हे लावले सिमबॉल बघा. स्वच्छ शहर सुंदर शहर आपले जळगांव शहर, सद्या तर धुळगांव शहर आहे. परंतु आम्ही प्रयत्न करतो आहे पुढच्या माध्यमातुन सुधारण्याची आणि खरोखर पालकमत्र्यांचे अभिनंदन, जेवढे केले, तरी जळगांवकरांची त्यांच्या बाबतीत कार्य किती आहे, आमचे आम्ही पण त्यांच्या मतदानातुन सुध्दा आमच्यावरती त्यांनी ऐवढ हे केलेले आहे आणि एवढी निधी आणुन दिलेली आहे. जो निधी परत गेलेली होती ४२ कोटी, ती ही आम्हाला परत केलेली आहे. आणि पुढच्या याच्यात ही कामे लवकरात लवकर सुरु करण्यात यावी. आयुक्त साहेब आपण जाता जाता जळगांवकरांसाठी चांगल काम करुन जाव ही आपल्याकडुन अपेक्षा करतो, धन्यवाद.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता सचिनभाऊ ही बोलले ते ही बोलले, माझा एक प्रश्न आहे. मागे चार दिवसापुर्वी प्रशांत पाटील साहेबांचे एक स्टेटमेंट होते पेपरामध्ये, घरपट्टया २१००-२२०० रुपयाने वाढल्या, तुम्ही इकडे का बोलले की, घरपट्टया वाढल्या, स्टेटमेंट आहे तिन दिवस पहिले पेपराला, मग आम्ही नगरसेवक चुकीच बोलतो आहे की, पेपरवाले बरोबर बोलत आहे. याच उत्तर प्रशासनाने द्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पाच्या तरतुदी आणि त्याच्यामध्ये आपण जी वाढ सुचविलेल्या आहे. आणि सभागृहातील मा.सदस्यांनी बऱ्याचपैकी काही सुधारणा सुचविलेल्या आहे. खऱ्या अर्थाने बघीतलं महापौर महोदया, अर्थसंकल्पाला खऱ्या अर्थाने अर्थ तेव्हाच होईल की, ज्या प्रमाणे आपण अनेक वर्षापासुन महानगरपालिकेचा आणि तत्कालीन नगरपालिकेपासुन अर्थसंकल्प पाहतो आहे. अर्थसंकल्प आपण राज्याचा ही पाहतो आणि देशाचा ही पाहतो. परंतु काही आकडेवारी आपण बऱ्याच वेळेला आपण बघतो. राजकीय वित्त व्यवस्थेचा काही फायदा व्हावा. या दृष्टीकोणाचा अर्थसंकल्प केलेला असतो. परंतु यापुर्वी सुध्दा या महानगरपालिकेचे अर्थसंकल्प ज्या ज्या पध्दतीने प्रशासनाने सादर केले. ते जसेच्या तसे सुध्दा मान्य करण्यात आलेले आहे. परंतु जसाचा तसा अर्थसंकल्प मान्य केल्यानंतरही त्या अर्थसंकल्पाची पुर्तता होत नाही. असेही निदर्शनास आले होते. खऱ्या अर्थाने अर्थसंकल्पाचा गांभिर्य प्रशासनाच्याच खालतीवरती तसा बघितल, तर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मोठया प्रमाणावरती आहे. कारण आपण महानगरपालिकेचा जे काही कामकाज चालवितो. ते महानगरपालिकेच्या अधिनियमानेच चालवितो. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन लोकनियुक्त प्रतिनिधी कुठलाही निर्णय घेतात. ते अर्थसंकल्पाच्या अधिन राहुन निर्णय घेतात.एखादा अवास्तव विषय या सभागृहाने जरी घेतला, तो नियमाच्या चौकटीत बसत नसेल तर प्रशासन त्या ठरावावरती अंमलबजावणी करत नाही. ज्या तरतुदी अर्थसंकल्पात असतील त्या तरतुदीच्या अधिन राहुनच महानगरपालिकेचे कामकाज चालत असते. परंतु आपण बघतो. आताच सन्मा.सदस्य श्री.विशालजी त्रिपाठींनी, सन्मा.सदस्या सौ.शुचिताताईंनी बऱ्याच याच्यामध्ये वाढ सुचविलेली आहे. परंतु त्या वाढींचा खऱ्या अर्थाने फायदा किती होतो. निव्वळ आपण काही तरी अर्थसंकल्पात कुठल्यातरी हेडवरती काही तरी तरतुद वाढवितो.परंतु ती परिपुर्ण होते की नाही. याचे मागे जावुन आपण कधीच अभ्यास करत नाही. मी जर उदहारण द्यायचे म्हटले तर सन २०१९-२० चा अर्थसंकल्प सन्मा.सदस्य आणि तत्कालीन सभापती नितीनभाऊ बरडे यांनी मांडलेला होता.आणि त्यावेळेला सुध्दा ज्या पध्दतीने आता अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक विभागामध्ये वेगवेगळया पध्दतीने वाढ सुचविण्यात आली. त्याच पध्दतीने सन २०१९-२० चा कुठल्याही व्यवस्था व दुरुस्तीसाठी प्रशासनाने १ लाख रुपयांची तरतुद केलेली होती. स्थायी समितीने

त्याच्यामध्ये वाढ करुन ती तरतुद ५ कोटी रुपयापर्यंत नेली. कुठल्याही व्यवस्था व दुरुस्तीसाठी प्रशासनाची १ लक्षची तरतुद तत्कालीन स्थायी समिती सभापतींनी स्थायी समितीने ५ कोटीवर वाढविली. परंतु सन २०१९-२० मध्ये प्रत्यक्षात त्याच्यावरती खर्च रु.७४ हजार झालेला आहे. मला सांगा असे सुचविलेल्या वाढ निव्वळ आम्ही काही तरी वेगळपण करत आहे. आम्ही काही तरी दरवाढ सुचवितो आहे किंवा आम्ही कुठल्यातरी याच्यावरती तरतुद सुचवितो आहे. सुचवा, सदस्यांचा अधिकार आहे. निश्चितपणे सुचवायला पाहिजे. परंतु आपल्याला त्यासाठी निधी उपलब्ध होतो का ? आणि याच्याने ती सुचविलेली वाढ त्या कामासाठी खर्चीही पडते का ? याचे मात्र कोणीच अभ्यास करत नाही.त्याच पध्दतीने स्मशामभुमी व्यवस्था व दुरुस्ती सन २०१९-२० च आहे. प्रशासनाने ५० हजार रुपयाची तरतुद सुचविलेली होती. ती १ कोटी तरतुद करण्यात आली आणि त्याच्यावरती खर्च झाला फक्त ८ लक्ष रुपये, त्याच पध्दतीने इमारत व्यवस्था व दुरुस्ती २० लक्षची तरतुद सुचविलेली होती. ती ५० लक्ष केली. ती खर्ची पडली. त्या पध्दतीने व्यापारी संकुल व्यवस्था व दुरुस्ती १.५ कोटीची तरतुद प्रशासनाने सुचविलेली होती ती वाढुन ३ कोटी केली. आणि ३ कोटीच्या आगेन्स फक्त १४ लक्ष रुपये खर्ची पडले. महापौर चषकच्या संदर्भाला ३० हजार रुपयाची प्रशासनाने तरतुद सुचवलेली होती. ती वाढुन २५ लक्ष केली आणि मात्र त्याच्यातुन ३ लक्ष रुपये खर्च झाले. आता सगळयात महत्वाचा हे हेड बघा, जो मॅनडेटरी आहे आपल्यावरती, दिव्यांग कल्याण समिती, २.२५ कोटीची तरतुद प्रशासनाने सुचविलेली होती. ती वाढुन ३ कोटी केली. आणि खर्च मात्र झाला फक्त २१ हजार रुपये. महिला व बालकल्याण समिती प्रशासनाने ३.७५ कोटीची तरतुद सुचवलेली होती. स्थायी समितीने त्याच्यामध्ये वाढ करुन ४ कोटी पर्यंत नेले, आणि खर्च झाला मात्र १८ लक्ष रुपये नविन इमारती करीता तरतुद १.५ कोटी वरुन ५ कोटीपर्यंत नेली. आणि त्याच्यामध्ये खर्च झाला मात्र ६ लक्ष रुपये. अश्या पध्दतीने सन २०१९-२० चा अर्थसंकल्प त्या वेळेला मांडला गेला, आणि त्याच्यामध्ये कश्या पध्दतीने वाढ सुचवली गेली. आणि कश्यापध्दतीने खर्च झाला. त्याच पध्दतीने सन्मा.सदस्या शुचिताताई हाडा ह्या जेव्हा स्थायी समिती सभापती होत्या. सन २०२०-२१ मध्ये. त्या वेळेला सुध्दा यांनी ते सभापती असतांना सोलार पॅनल उभारणेसाठी प्रशासनाने कुठलीच तरतुद दर्शवलेली नव्हती. परंतु सन्मा.स्थायी समितीने त्या वेळेला त्याच्यावरती २ कोटी रुपयांची तरतुद केलेली होती. आणि खर्च मात्र ३ लाख ८३ हजार रुपये त्याच्यावरती केलेले आहे. त्याच पध्दतीने स्मशानभुमीचा तोच हेड कनटीनीव्ह चालत आला. १ लक्षची तरतुद प्रशासनाने ठरविलेली होती. १ लक्ष वरुन प्रशासनाने त्याला १ कोटीवरती नेले. आणि खर्च मात्र ५९ हजार रुपये झाला आहे. इमारत व्यवस्था व दुरुस्ती मध्ये परत तरतुद १० लक्ष वरुन १ कोटीवर नेली. खर्च मात्र ३० लक्ष झाला. रस्ते व्यवस्था व दुरुस्ती वरती ५० लक्षची तरतुद होती. ती १५ कोटी रुपये पर्यंत वाढविण्यात आली. आणि खर्च मात्र ८६ लक्ष रुपये झाला. गटार व्यवस्था व दुरुस्ती वरती प्रशासनाने २० लक्षची तरतुद ठेवलेली होती. स्थायी समितीने तिला ६ कोटीवरती नेले. आणि ६ वरुन खर्च फक्त ६ लक्ष झाला. व्यापारी संकुल व्यवस्था व दुरुस्ती ती सुध्दा १ कोटीची तत्कालीन प्रशासनाने आपल्या अर्थसंकल्पात तरतुद केलेली होती. मा.स्थायी समितीने ती तरतुद ५ कोटी वरती नेली. आणि खर्च झाला मात्र २ लक्ष रुपये. नविन गटारींसाठी २ कोटी तरतुद तत्कालीन प्रशासनाने सुचवलेली होती. ती मा.स्थायी समितीने ५ कोटी पर्यंत नेली. आणि खर्च झाला फक्त ३८ लक्ष रुपये. म्हणजे १४ कोटींची तरतुद आपण करतो आणि खर्च मात्र ३८ लक्ष होतो. पाणी पुरवठयावरती झालेली तरतुद १ कोटी रुपयाची होती.ती ३ कोटीवर नेले खर्च झाले ९९ लक्ष.मला सांगा अश्या पध्दतीने फक्त या हेडवरती इतके ठेवा त्या हेडवरती तितके ठेवा. सन्मा.सदस्य श्री.विशालभाऊंनी सांगितले की, नगरसेवक निधी द्यायला पाहिजे. अडीच वर्ष ते ही सत्ताधारी पक्षात होते. त्यावेळेला अश्या पध्दतीची तरतुद म्हणजे १०० कोटीचे ज्या वेळेला अनुदान मिळाले, आणि ४२ कोटीची कामे प्रस्तावीत केली.आमचा प्रभाग क्र.५ त्याच्यामध्ये तरतुद केली होती फक्त ५ लक्ष रुपयाची. आज तरी आम्ही उदार मनाने सत्ताधाऱ्यांसोबत विरोधकांनाही न्याय देण्याचा प्रयत्न करतो आहे. परंतु कुठे सुरुवात व्हावी. जसे आपण म्हणतो की, साप मारावा पण पाहुण्यांच्या हाताने. मार्केटच्या संदर्भातला विषय, त्या दिवशी झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सांगतो. जसे विशालभाऊंनी सांगितले की, मार्केट वसुलीच्या संदर्भातला निर्णय जो पर्यंत अनिर्णीत आहे. तो पर्यंत जसाच तसा

आपले उत्पन्न धरणे अपेक्षित आहे. जे आपले हक्काचे उत्पन्न आहे ते आपल्याला मिळायला पाहिजे ही त्यांची मागणी आहे. मागणी चुकीची नाही मागणी रास्त आहे. प्रशासनातर्फे आपण किती तरतुद केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** ८१ कोटी

**श्री.नितीन लद्ढा :-** ८१ कोटी परंतु जर कधी मी जी माहिती घेतली, मिळकत व्यवस्थापन आणि मार्केट वसुली विभागाकडुन तर साधारणता २२५,६०,९४,९५६/- ही आजची आपली डिमांड आहे. मात्र विशालजी २२५,६०,९४,९५६/-धरायला पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** धरायलाच पाहिजे. जी आपली डिमांड आहे ती भरलीच पाहिजे. जी ॲक्चुवल डिमांड आहे ती घ्यायला पाहिजे.

**श्री.नितीन लद्ढा :-** बरोबर आहे तुमचे म्हणणे, जी ॲक्चुवल डिमांड आहे ती धरायला पाहिजे. त्याच्यामध्ये दुमत नाही. परंतु ही डिमांड धरुन जर कधी या डिमांडच्या आधारावरती हे कामे सुचवत असतील. ज्यावेळेला ही वसुलच होणार नाही ही रक्कम. कारण परवाचा निर्णय एका अर्थाने गाळेधारक यांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोणाने झालेला आहे. या निर्णयाशी आमच दुमत नाही. गाळेधारकांना न्याय मिळायला पाहिजे या बद्दलही दुमत नाही. परंतु तो निर्णय घेतांना किंवा त्या निर्णयाची आता पर्यंत झालेली चर्चा जी आपण ऐकली की, त्याच्यामध्ये गधे घोडे सब एक समान हो गए. सुरुवाती पासुन या सभागृहामध्ये गाळेधारकांच्या बाबतीत अनेक वेळा चर्चा झालेल्या आहे. सन २०१२ पासुन तर सन २०२२ आलेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सन २०११ पासुन

**श्री.नितीन लद्ढा :-** सन २०११ पासुन  साधारणता मला सांगा ११ वर्षामध्ये अनेक वेळा चर्चा झाल्या. अनेक वेळा न्यायालयामध्ये विषय गेले. राज्य शासनाकडे विषय गेले.परंतु एका निर्णायक परिस्थिती पर्यंत ज्या वेळेला कुठलातरी विषय येतो. आमची सुरुवाती पासुनची जी भुमिका होती. ज्या शहरातील जे काही अव्यवसायीक मार्केट ज्यांना म्हटल जात. तो शब्दशः त्याचा अर्थ चुकीचा आहे. कारण कुठलेही मार्केट म्हटले तर तो अव्यवसायीक होवु शकत नाही. तेथे व्यवसाय चालत. तो व्यवसायीकच असतो. परंतु काही मार्केटची परिस्थिती जी आहे ती तेवढी सक्षम नाही किंवा तेथे त्या पध्दतीचा व्यापार होत नाही. उदहारणार्थ म्हटल तर भोईटे मार्केट असेल. शाहु महाराज मार्केट असेल, भास्कर मार्केट असेल, आंबेडकर मार्केट असेल की, तिथल्या व्यवसायीकांची परिस्थिती तितकी सक्षम नाही किंवा ते तितके व्हॅल्युएबल मार्केट नाही. तर त्यांच्या बाबतीत निर्णय घेतांना कुठेतरी सहानुभुतीपुर्वक विचार व्हायला पाहिजे. ही सुरुवातीपासुन या सभागृहाची भुमिका राहिलेली आहे. आणि तश्या पध्दतीचे धोरणात्मक निर्णय सुध्दा या सभागृहाने घेतलेले आहे. परंतु ज्या गोष्टी नाही व्हायला पाहिजे त्या गोष्टी होतात. म्हणजे मा.माजी मुख्यमंत्री महोदय, श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, ते मुख्यमंत्री असतांना या गाळयांच्या संदर्भात एक निर्णय त्यांनी घेतला, आता सत्ता बदलली आहे नंतर तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय म्हणतात की, आमची चुक झाली त्या वेळेला आणि तो निर्णय तसा घ्यायला नको पाहिजे होता. ठिक आहे तो त्या सभागृहाचा अधिकार आहे त्यांनी काय निर्णय प्रक्रिया घ्यायला पाहजे. त्या बद्दल वाद नाही. परंतु महानगरपालिकेच्या मालकीचे मार्केटस, याच्या संदर्भात निर्णय घेतांना कमीतकमी त्या महानगरपालिकेची भुमिका काय आहे. याचा विचार करणे गरजेचे आहे. एकीकडे घरपट्टीची वाढ होत आहे. सन्मा.सदस्य सचिनभाऊ म्हणतात की, ती अवाजवी आहे किंवा नागरीकांमध्ये रोष आहे. आहे रोष, ते ही आम्ही मान्य करतो. घोडा घास से दोस्ती कर लेंगा तो खाऐंगा क्या, शेवटी या महानगरपालिकेचा ७ लाख लोकसंखेचे हे शहर, येथील दैनंदिन गरजा, या सगळयांचा विचार करता, महानगरपालिकेच उत्पन्न याच्या बाबतीत मात्र कोणीच विचार करत नाही. म्हणजे ही नगरपालिका कायमस्वरुपी शासनाच्या देणे वरतीच अवलंबुन राहिली पाहिजे का? महानगरपालिकेच्या घरपट्टी मध्ये वाढ आली. स्थानिक नागरीक लोकप्रतिनिधींना जबाबदार म्हणतात.लोकप्रतिनिधींना आपली भुमिका नाईलाजस्तव येथे मांडावी लागते. हक्काचे उत्पन्न मार्केटचा आज स्थगित होऊन पडलेला आहे. मग ही महानगरपालिका चालवायची कोणाच्या भरोश्यावरती. कशी चालवायची. आता आपण परवाच्या दिवशी ज्योतीताईंनी आपला सत्कार केला की, आपण कर्मचाऱ्यांकरीता ७ वा वेतन लागु केला, आनंदाची गोष्ट आहे. तो त्यांचा हक्काचा पैसा आहे तो त्यांना मिळायला पाहिजे. परंतु पैसा येणार कुठुन.

नुस्ते घोषणा करुन हे शहर चालणार नाही. हे सभागृह चालेल घोषणा करुन पण शहर चालणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थितीला आपण जो पर्यंत सामोरे जाणार नाही. आणि या वस्तुस्थितीला समजुन घेणार नाही. तोपर्यंत मी म्हणतो असे कितीही अर्थसंकल्प दरवर्षी मांडले जातील. आणि सगळया ज्या काही तरतुदी आपण इतक्या मोठया डिमांडाने या सभागृहात म्हणतो. उद्या वृत्तपत्रामध्ये तरतुद येते की, याच्यावरती इतकी तरतुद याच्यावरती इतकी तरतुद, याच्यावरती इतकी तरतुद, परंतु त्या तरतुदीचा पलित निघणार कुठुन. निघुच शकत नाही.ही वस्तुस्थिती आहे. यासाठी कुठेतरी प्रशासनाला सुध्दा कडक धोरण राबविणे गरजेचे आहे. या पदाधिकाऱ्यांना सुध्दा फक्त लोकाभिमुक निर्णय घेण्याचे संदर्भातली जी मानसिकता आहे. ती कुठेतरी बदलणेची गरज आहे. आज आपण बघतो आहे. शहरामध्ये लोकांना चालायला रस्ते नाही. मा.पालकमंत्री महोदयांनी डी.पी.डी.सी.च्या माध्यमातुन निधी दिला, त्या निधीच्या भरोश्यावर काही छोटे मोठे कामे सुरु दिसत आहे. त्याच्यातुन कुठेतरी नागरीकांच्या आशा उंचावले दिसत आहे. आज डी.पी.डी.सी.चा वास्तविक काळ संपला, काही अपेक्षा होत्या की, काही निधी मिळेल. पण ते ही मिळण्याचे काही चिन्ह दिसत नाही. मग मला सांगा, आपल्या हक्काच्या उत्पन्नामध्ये अश्या पध्दतीने गळचेपी होत असेल.आणि मात्र शहरातील नागरीक आपल्याले मोठया अपेक्षेने पाहत असतील की, आज तिकडचा रस्ता झाला उद्या आमच्याकडच होईल. परंतु मात्र आपण त्या अपेक्षा पुर्ण करु शकणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात कुठेतरी धोरणात्मक निर्णय डिसइनवेस्टमेंटने घ्यावे लागतील. आज आपण बघतो की, केंद्र शासनाचे अनेक उपक्रम, बरेचशे उपक्रम जे होते ते नफ्या मध्ये चाललेले उपक्रम होते. तरी सुध्दा गव्हर्नमेंटने ते डिसइनवेस्टमेंट केले. अनेक बंद पडलेले उपक्रम डिसइनवेस्टमेंट करुन त्याच्यातुन काही आपण उभी केली. शेवटी कुठेतरी तुम्हाला व्यवहारीक तत्वाने या गोष्टींची सांगळ घालणे गरजेचे आहे. नुस्ते फक्त घरपट्टीच्या उत्पन्नावर अवलंबुन किंवा गाळे भाडयावर मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबुन आपण हे शहर चालु शकणार नाही. कारण आपले इनकम सोर्स जे आहे ते खुप मर्यादीत आहे. आणि त्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये अनेक अडचणी आहे.आज मला सांगा जसे शुचितातार्इंनी सांगितले की, आपल्या मौक्याच्या जागा आहे, निश्चितपणे आहे. परंतु मला सांगा की, याच्याबाबतीत, आज मला सांगा मेहरुणची जागा, आज आयुक्त साहेब आपल्याला ही साधारणता २ ते २.५ वर्षाचा कालावधी या महानगरपालिकेत झाला आहे. अनेक सभांमध्ये आपल्या समक्ष त्या विषयावर मी आपल्याशी चर्चा केलेली आहे. आज गेल्या ५-६ वर्षापासुन त्या गोष्टींचा पाठपुरावा करता करता,आता मागच्या आठवडयात कुठेतरी एका भागाचा कब्जा आपल्या अधिकाऱ्यांनी जावुन घेतला, परंतु कोट्यावधीच्या किमतीची जागा ती आहे, त्याच्यासमोरच एक घरकुल आहे ते कोट्यावधी रुपयांची जागा आहे. पिंप्राळा हुडको मध्ये आपल्या कोट्यावधी रुपयांचे जागा आहे. त्या कोट्यावधींच्या जागावरती अनेक लोकांनी बेकायदेशीर रित्या कब्जा करुन ठेवलेला आहे. कालांतराने तुम्हाला त्या नागरीकांना तेथुन काढणे सुध्दा जिगरीच होईल अशी परिस्थिती आहे. याच्या बाबतीत सुध्दा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. आज मला सांगा, हुडकोचे घरकुले, ४.५ कोटीच्या जवळपास त्याची थकबाकी आहे. प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये, याच्यामध्ये त्या तरतुदी तश्याच्या तश्या कॅरीफॅरवर्ड होत जातात. परंतु त्याच्या भाडयाच्या वसुल करण्याच्या संदर्भातला, मनुष्यबळ नसेल, किंवा प्रशासनाची मानसिकता नसेल. मला सांगा साहेब, २०१८ ला, शेवटचा अर्थसंकल्प ज्या वेळेला आमची सत्ता होती. त्या वेळेला येथे ज्योतीताई सभापती होत्या. आणि त्यांनी त्या अर्थसंकल्पामध्ये, कदाचीत त्या वेळेच्या आयुक्तांनी किंवा उपायुक्तांनी सुचविलेला पर्याय दिसत आहे की, घरकुलची वसुली फारच असमाधानकारक असुन म्हणजे त्याच वेळेला अंदाजे १३ कोटी ६४ लक्ष थकबाकी आहे. सदर थकबाकी वसुली संदर्भात आयुक्त यांनी सुचवलेली योजना उपयुक्त व प्रभावी असुन त्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेनुसार घरकुलात मुळ घरकुलधारक रहिवास करीत असल्यास थकबाकी भरणे कामी एक महिन्याची मुदत द्यावी.मुदतीत थकबाकी न भरल्यास पंचनामा करुन घरकुल मनपाच्या ताब्यात घ्यावे. घरकुलात मुळ मालका वैतिरिक्त इतरांचा रहिवास असल्यास त्यांच्याकडुन १ महिन्याची नोटीस देवुन थकबाकी वसुली करावी व त्यावर रु.२५०००/- प्रिमयम भरुन घरकुल त्यांच्या नावे करुन घ्यावे. या धरतीवर अनाधिकृत ताबा घेतल्याबाबत गुन्हा नोंदवुन घरकुल ताब्यात घ्यावे.

आयुक्त यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे अतिक्रमण विभागांतर्गत जप्त सामान, साहित्य साठविणे वगैरे, म्हणजे आज सकाळी महानगरपालिकेमध्ये येणेच्या पुर्वी आमच्याच प्रभागातील एक मतदार त्यांनी घरकुल मध्ये घर घेतलेले आहे. किंमत ऐकुन माझ्या सारख्याच डोक चकरवलं, आपल ही डोके चकरावेल. पौनेपाच लाख रुपयात घर घेतलं घरकुल मध्ये, एका घरकुलाची किंमत किती आहे. पौनेपाच लाख रुपये,

**श्री.कैलास सोनवणे :-** वाल्मीक नगरमध्ये याच्यापेक्षा जास्ती आहे. वाल्मीक नगरमध्ये एकाने अकरा लाखात घेतले घरकुल नितीनभाऊ, चौकात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग अश्या पध्दतीने घरकुल योजनेचे जे मुळ होत, आज मला अस वाटत की, ही योजना कार्यान्वीत झाल्यापासुन ते आज पर्यंत, माझ्या मते तेथे १०% च मुळ लाभार्थी असतील. आणि ९०% लाभार्थी त्या घरकुलांमध्ये वास्तव्य करत नाही. आपण असे म्हणत नाही की, ज्यांनी आज ४ लाख रुपये, ५ लाख रुपये, १२ लाख रुपये, २ लाख रुपये, १० लाख रुपये जे काही खर्च करुन ती घरकुले घेतली असेल त्यांच्यावर ही अन्याय व्हायला नाही पाहिजे. कारण त्यांनी त्याची कॉस्ट बेअर केलेली आहे. परंतु या अश्या पध्दतीने की, याचा सेवाशुल्क रु.५/- आहे. जे नगरपालिकेचा हक्काचा आहे. त्याच्या अगेन्स आपण सोयीसुविधा पुरविता तेथे, ते सुध्दा आपल्याला मिळत नाही. तर याच्या संदर्भात कोट्यावधी रुपयांच उत्पन्न महानगरपालिकेला मिळु शकेल. एखादा अश्या पध्दतीच धोरण तयार करायला पाहिजे की, ज्याच्यामुळे ज्या घरकुल धारकांने आता घर घेतलेला आहे, ३ लाखात घेतल असेल, ५ लाखात घेतल असेल,मी ५ लाखाचा रिकॉर्डींग सभा संपल्यानंतर दाखुन देईल आपल्याला की, ५-५ लाख रुपयात आपल्या मिळकतीचे परस्पर व्यवहार होतात. आणि आपण रु.५/- ला महाग झालेलो आहे.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ, फुले मार्केटचे गाळे १ कोटीला जात आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तिच परिस्थिती मार्केटची आहे ना. म्हणजे २०१२ पासुन गाळयांच्या मुदती संपल्यानंतरही अनेक व्यवहार असे झाले आहेत की, जे कोट्यावधी रुपयांना गाळे विकले गेलेले आहे. अप्पा साहेब मार्केटच्या संदर्भातला निर्णय, ठिक आहे आता राज्य शासनाने समिती गठीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे परंतु आज त्याला स्थगती दिल्यामुळे काय झाल, आपल्या हक्काच्या उत्पन्नाला सुध्दा हात पाय बांधले गेले, मार्केटचा ८% ने भाडा ठरविलेल होत. आता गेल्या १५ दिवसापुर्वी फुले मार्केटचे व्यापारींच शिष्ट मंडळ माझ्याकडे आले होते. आणि ते मला म्हणे की, भाऊ हा जो निर्णय झालेला आहे हा सर्व अर्थाने चांगला आहे. सर्व अर्थाने चांगला आहे, ८% ने भाडे आकारणी केलेली आहे. ज्या काही प्रशासनाने त्याच्यामध्ये डेपरीसिएशन वगैरे सगळया कपात करुन जे भाडे निश्चिती केलेली आहे. अत्यंत माफक अशी भाडे निश्चिती आहे. ती सहर्ष स्विकार केलेली आहे त्यांनी,त्यांची याचना एवढीच होती की, फक्त आपल्याला नुतनीकरण करुन देण्यात यावे म्हणजे जे, मी तेच म्हटले ना की, या देशामधला सगळयात मोठा ड्रॉबॅक काय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ, तुम्हाला फक्त एक मिनीट थांबवितो, तुम्ही काय करा, ज्यांनी आपला विचार नाही केला, आपण त्यांचा विचार नाही करायचा कोर्टामध्ये जायला पाहिजे आपण, कोर्टामध्ये जा कोणाला तरी पाठवा तुम्ही, तुम्हालाच करावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक मिनीट अप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरांचा विचार केला का? की आपल्या पक्षाचे महापौर आहे तेथे, केला का विचार, जळगांवकरांचा ६-७ लोकांचा विचार केला का त्यांनी.विचारल का महापालिकेला,

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला त्या दिवसाचा व्हिडीओ पाहुन आश्चर्य वाटल की, मा.तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, हे सुध्दा एका ठिकाणी महापौर राहिलेले आहे. महानगरपालिकांची परिस्थिती काय आहे हे त्यांनी ही अनुभवलेले आहे. आणि तो निर्णय घेतांना शिंदे साहेबांनी जी काही २ टक्के किंवा ३ टक्के आणि त्यापेक्षा ही कमीची देवेंद्रजी फडणवीस साहेब अपेक्षा करत होते. म्हणजे मला सांगा, तश्यापध्दतीने जर कधी, तो निर्णय झाला असता, त्या सभागृहातच झाला असता, तर मला वाटत, तो किरकोळ वसुली विभाग सुध्दा आपल्याला बंद करावा

लागला असता, आणि ते बंद करुन त्या कर्मचाऱ्यांचा पगार सुध्दा आपण काढु शकलो नसतो. ही परिस्थिती आलेली असती किंवा भविष्यात ती येवु शकते. त्या बद्दल वाद नाही. आपण गाळेधारकांच्या विरोधात नाही आप्पा. परंतु न्याय करतांना आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्या मार्केटचा पोटेन्शीयल काय आहे. त्या सगळया गोष्टींचा विचार केला पाहिजे. सबसिडी मिळते तर पार्वताताईंना तेवढीच सबसिडी मिळते, नितीन लढ्ढाला सुध्दा तेवढीच सबसिडी मिळते, नितीन लढ्ढा प्रामाणिकपणे हे दाखविणार नाही की, नाही माझी आर्थिक स्थिती चांगली आहे. मी ही सबसिडी नाकारतो आहे. मला यापेक्षा कमी दिली तरीही चालेल.माझ्या पेक्षा त्यांना जास्त गरजेची आहे. त्यांना वाढुन द्या. काही मार्केटच्या बाबतीत सहानभुतीपुर्वक निर्णय व्हायला पाहिजे होता. त्याबद्दल दुमत नाही. परंतु जे गाळे धारक ज्या निर्णयाला राजीखुशी स्विकार करत आहे. त्यांना सुध्दा आपण खैरात वाटायची. ही भुमिका जी आहे या महानगरपालिकेच्या हिताला धुर लावण्याची आहे माहागात आहे. केवळ फक्त मतांचा राजकारण करुन चालणार नाही. नुसते मतांचे राजकारण केले.  तर मी म्हणतो या जळगांव शहराला आज काय आणि पुढचे १० वर्ष काय ? अर्थसंकल्पाला काहीच अर्थ नाही. हे सगळ कागदावरचा खेळ आहे. अर्थसंकल्पाला अर्थ तेव्हाच येईल. ज्या वेळेला अर्थ आपल्याकडे असेल,अर्थ नसेल तर शुचिताताईंनी कितीही दुरुस्त्या सुचविल्या, विशालजींनी कितीही दुरुस्त्या सुचविल्या. नगरसेवकांना ५० लाख काय ५ लाख सुध्दा मिळणार नाही. नुस्ते कागदावरती काय मोठायक्या मारायच्या, काही साध्दय होणार नाही. या सगळया बाबतींचा प्रशासनाने कुठेतरी गंभीरपणे विचार करायला पाहिजे. हुडकोच्या जागा असतील, घरकुलच्या मिळकती असतील, ज्या व्यवसायीक मिळकती असतील. ज्यांचे ३७ चे प्रस्ताव करुन ज्या जागांचे व्यवहार करायचे असतील. आज मला सांगा कोट्यावधीची जागा आहे आपली ख्वाजामियाची, आज आपण त्या कोट्यावधीच्या जागेवरती कोरोना काळात भाजीवाल्यांच भाजी बाजार बसविले. मी परवा गुजरांच्या दवाखान्यात गेलो होतो टेस्टींगसाठी, आणि तेथे बघितल्यानंतर सर्व बाजार रस्त्यावरती भरलेला आहे. त्याच्यामध्ये दुभाजक टाकलेले आहे रस्त्यामध्ये. दुभाजकाची एक बाजु डाव्याबाजुची त्याच्यावरती संध्याकाळ पासुन ते रात्रीपर्यंत बाजार भरतो. एक फोरव्हिलर दुसऱ्या फोरव्हिलरला क्रॉस करु शकत नाही. एक मोटर साईकल दुसऱ्या मोटरसाईकलला क्रॉस करु शकत नाही. अश्या कोटयावधी रुपयांचे मालमत्ता त्याच विनीयोग आपण योग्य वेळेमध्ये करणार नाही. त्या जागेचे संदर्भातल आयुक्त साहेब, ती जागा आपण एक खाजगी विकासासाठी दिलेली होती. त्यानंतर त्याच्यामध्ये राज्य शासनाचे एक वेगळे निर्देश आले. तो प्रकल्प रद्द झाला,मक्तेदार कोर्टात गेला, स्पष्टपणे तरतुद होती की, त्याच्यामध्ये आर्बीट्रेटर नेमता येत नाही. तरी सुध्दा उच्च न्यायालयामध्ये त्यांच्या पध्दतीने निवाळा देण्यात आला. आर्बीट्रेटरची नेमणुक झाली, आर्बीट्रेटरची नेमणुक झाल्यानंतर, त्या विषयाला आपल्याला उच्च न्यायालयामध्ये जुडप्रीटशन मध्ये अवाहन देणेच्याबाबती मध्ये आपले चर्चा ही झाल्या. परंतु वेळे अभावी प्रशासनाकडुन त्याला उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन फाईल करता आला नाही. आर्बीट्रेटरने आपल्या अपोजिट काम सुरु  करुन टाकले आहे. उद्या जावुन आर्बीट्रेटरने काही निवाळा दिला, त्याची लायबीलीटीजला परवानगी आली, कोण जबाबदार राहणार. माझे सांगायचे तात्पर्या याच्या मागचे ऐवढेच आहे. की आपण एकीकडे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर पर्यायाने महानगरपालिकेच्या उत्पन्नाला लागलेल्या गळत्या.या गळत्या थांबविणे सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. आणि या गळत्या थांबविण्यासाठी आपला विधी विभाग जो आहे अत्यंत कमकुव्वत आहे. आज ही महानगरपालिका आर्थिक रित्या डेव्हलप होण्यासाठी सगळयात महत्वाचा कारण म्हणजे आपला विधी विभाग हा अक्षम्य आहे. किंवा त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. किंवा जो कोणी आपण विधी सल्लागार नेमतो. ते त्या क्यालिबरचे नाही. आणि याच्यामुळे आपले मनपाच्या विरुध्दचे बरेच निवाळे मनपाच्या विरोधात जातात.आणि कोट्यावधी रुपयाच्या लायबेलीटीज या मनपावर येत असतात.आणि एकीकडे सन्मा.सदस्य श्री.विशालजी त्रिपाठी म्हणता आहे की ५० लाख रुपयाची तरतुद व्हायला पाहिजे मान्य. एक उदहारण आपण स्वत: अनुभवलेले आहे. अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हूडकोच्या जमीनीच्या संदर्भातल, आपण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलो अप्पा. सर्वोच्च न्यायालयामध्ये हारल्यानंतर सुध्दा आपण त्या गोष्टीचा पिछा सोडला नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही सोडला, त्याचे पैसे थांबविले आपण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पांनी पाठपुरावा केला, आयुक्त साहेबांना सुध्दा थोडीशी भिती वाटत होती ती कन्टेम्पटची भिती वाटत होती आणि ती योग्य होती. शेवटी म्हणा, तुमच्या आमच्या सारख्यावर कन्टेम्पही झाल तर तुम्हाला आम्हाला काही फरक पडणार नाही. पण एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्यावरती कन्टेम्पटची नामुस्की आली. तर त्यांच्या सी.आर.च्या संदर्भात प्रॉब्लेम येतो. किंवा त्याच्या सेवेच्या संदर्भात प्रॉब्लेम येऊ शकतो. परंतु मा.आयुक्तांना त्या बाबतीत आपण सपोर्ट करत राहिलो की, नाही जास्तीत जास्त काय होईल आपल्याला ७ कोटी रुपये त्या व्यक्तीला, आणि प्रशासनाने तयारी करुन ठेवलेली होती. म्हणजे हे समजुन घ्या चार दिवसानंतर हायकोर्टात जावुन हे सांगायचे की, आपले ७ कोटी रुपये भुसंपादन विभागाकडे वर्ग केले. म्हणुन आपण आपल्या पध्दतीने कसोटीने प्रयत्न केले. आणि त्या मॅटरमध्ये सुध्दा आपण स्थगती मिळवली. ते पैसा घेणे मुळात बेकायदेशीर होते. परंतु उच्च न्यायालयामध्ये त्या त्या वेळेला ज्या ज्या वेळेला जी जी परिस्थिती आली असेल. त्या त्या वेळेला मनपाकडुन,

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट थांबवितो, मी माझ्या आयुष्यातला पहिला प्रकरण पाहिले की, ज्याचे पैसे आपल्याला डबल द्यावे लागत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** डबल नाही.

**श्री.सचिन पाटील :-** टिबल.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही, पहिले जे पैसे दिले, आपला फक्त ताबा घ्यायचा बाकी होता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, ताबा घेतला,

**श्री.कैलास सोनवणे :-** खरेदी बाकी होती काही. विहीरचे पैसे फक्त, विहीरीचे ६७ हजार रुपये द्यायचे होते फक्त मला माहिती आहे. मी ते पुर्ण वाचलेले आहे. ३७ की काही तरी हजार द्यायचे आहे. ते आपल्याकडुन राहुन गेल्यामुळे ऐवढा भुर्दंड आहे. निकाल आपल्या विरोधात लागतो कसा, आता निकालाविरुध्द बोलणे योग्य नाही. पण लागतो कसा निकाल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा, असे कोट्यावधी रुपये, अजुन तुम्हाला एक एकझ्याम्पल सांगतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** डबल म्हणजे एकाच गोष्टीचे दोन वेळा पैसे द्यावे लागत आहे. हि तर नळपट्टीच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता एक गोष्ट सांगतो तुम्हाला, जैन सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस पुरवठादार असेल मागच्या १०-१२ वर्षापुर्वी, त्या पुरवठादाराने मनपाला ७५ लाख रुपयाचे पाईप सप्लाय केलेले होते. ७५ लाख रुपयाचे पाईप सप्लाय केल्यानंतर त्याच्या सगळया पेमेंन्टची अदायगी झालेली आहे. परंतु अदायगीला विलंब झाला, आदायगीला विलंब झाल्यानंतर सदरहु मक्तेदार हा कोर्टात गेला, कोर्टात गेल्यानंतर तेथे सुध्दा आपली बाजु व्यवस्थीत रित्या मांडली गेली नाही. कोर्टाने साधारणता मला वाटत त्याची डिकरी ऑर्डर केली महानगरपालिकेच्या विरुध्द, ७० लाख रुपयाचा त्याचा सप्लाय होता, ७० लाख रुपयाची अदायगी त्याला वेळोवेळी दिली गेली, पण त्याला विलंब झाला. त्यानी त्याच्यावरती व्याजाची आकारणी करुन ९० लाख रुपये कोर्टाकडुन डिकरी पण लावली. कोर्टाकडुन ९० लाख रुपयाची डिकरी मिळवली तितपर्यंत सुध्दा मान्य आहे. परंतु त्याच्यावरती सुध्दा व्याजाची परिगणणा करुन आज त्याचा दावा कितीचा आहे १७ कोटी रुपयांचा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय सामान पुरविले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाईप, आणि १७ कोटीची मागणी करुन १७ कोटी रुपयाचा दावा आज उभा आहे. मला सांगा १७ कोटीच्या दाव्यासाठी.

**श्री.कैलास सोनवणे :-** नगरपालिकेच्या इलेक्शनला उभे राहिला लावा त्याला तुम्ही, नगरसेवक होण्याला पात्र, कॉलिफीकेशनमध्ये पात्र आहे तो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा, अश्या पध्दतीने मनपाच्या विरुध्द अश्या दाव्यांचे निकाल जाऊच कसे काय शकतात. म्हणजे हा निवळ आणि निवळ निष्काळजीपणा आहे. उद्या जाऊन १७ कोटीची डिकरी झाली, आणि आणेल ही, अश्या भुसंपादनाच्या केसेस मध्ये आपण अनेक उदहारण बघतात.

**श्री.कैलास सोनवणे :-** जैनच नाव काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आहे कोणीतरी धुळयाला राहतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे जळगांवचा नाही, जळगांवचे जैन असे नाही पण, ते सर्व कष्ठाने कमवुन खातात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा आप्पा किती गंभिर विषय आहे की, याचे ७० लाख रुपये अदा केले गेलेले आहे. परंतु या सगळया बाबी योग्य वेळी न्यायालयाच्या निदर्शनाला आणुन दिल्या जात नाही. भुसंपादनाच्या बाबतीत सुध्दा ह्याच गोष्टी घडतात. एका प्रकरणाला विरोध केल्यानंतर माझ्या विरुध्द ५० तक्रारी झालेल्या आहे. आणि अजुन पर्यंत त्या जमिन मालकाने माझा पिछा सोडलेला नाही. अजुन सुध्दा त्यानी जिल्हा न्यायालयामध्ये माझ्या विरुध्द एफ.आय.आर.दाखल करण्याच्या संदर्भातली महापौर असतांना पिंप्राळयाच्या भुसंपादनाचा विषय आहे. म्हणजे लोकप्रतिनिधींनी वाईटपणा काय घ्यायला पाहिजे. तो माझा नातेवाईक आहे तो माझ्या समाजाचा आहे तरी सुध्दा आपण महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोणातुन ते प्रकरण शेवटपर्यंत नेले, पण त्याचा त्याला इतक दुख: झाल की, त्या दुख:पोटी त्यानी अॅन्टी-करप्शन पासुन पोलिस स्टेशन पासुन सगळया ठिकाणी त्यांनी तक्रारी केलेल्या आहे. खालच्या कोर्टाने तक्रार फेटाळल्यानंतर त्यांनी अपील दाखल केलेली आहे डिस्ट्रीक्ट कोर्टामध्ये. तर अश्या पध्दतीने जोपर्यंत या सगळया गोष्टींना प्रशासन म्हणुन जर गांभिर्याने पाहिले जात नसेल. तर अर्थसंकल्पाच्या कुठल्याही चर्चेला, कुठल्याही तरतुदींना काहीही अर्थ राहणार नाही. जसे चाललेले आहे तसेच चालत राहाल.आपण फक्त येथे पोटतिळकीने चर्चा करतो, आपण या शहराच्या दृष्टीकोणातुन, या शहराच्या हिताच्या दृष्टीकोणातुन आपण वारंवार चांगले चांगले प्रस्ताव देण्याचा प्रयत्न करतो, परंतु या संदर्भात जर काही लेखी अंमलबजावण्या होत नसतील. तर अर्थसंकल्पाला अर्थ उरणार नाही. मा.महापौरताई आता सचिनभाऊंनी जे सांगितले, मी आपली परवा आयुक्त साहेबांशी सुध्दा पाणीपुरवठेच्या वेळेला चर्चा केली, या विषयावरती चर्चा केलेली आहे की, निश्चितपणे नागरिकांमध्ये ते रोष आहे त्या बद्दल वाद नाही. परंतु महानगरपालिकेच्या उत्पन्नाची बाजु आहे. परंतु फक्त उत्पन्न वाढीच्या संदर्भात विचार करत असतांना, सामान्य नागरीकांवर त्याचा अन्याय होऊ नये त्यांच्यावरती याची दक्षता घेणे सुध्दा प्रशासनावर तेवढच बंधनकारक आहे. काय होत साहेब, आज आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. आम्ही हक्काने तुमच्याकडे चर्चा करतो, तुम्ही आमचा आदर करुन आमच्याशी संवाद करतात. परंतु एखादा सामान्य नागरीक जो घरपट्टीने बेजार झालेला आहे. तो बिचारा ५० चकरा मारतो, आणि त्याला मिळणारी वागणुक जी असते की, त्याचे समाधान होत नाही.परंतु त्याला या प्रशासना विरुध्द म्हणा किंवा पदाधिकाऱ्यांविरुध्द मनामध्ये एक वेगळी चिळ निर्माण होते. शेवटी आपण डॉक्टरांकडे जातो. एका डॉक्टरांकडे उपचार मिळत नाही तर आपण दुसऱ्या तिसऱ्या डॉक्टरांचे ओपिनियन घेतो. ज्या वेळेला आपल्याला समाधानकारक उत्तर मिळेल, त्यावेळेलाच मनाचे समाधान होतो. जर कधी घरपट्टी नियमानुसार लागलेली आहे. आणि त्या व्यक्तीला बोलविल्यानंतर शांततेने त्याला खात्री त्याची पटवुन दिली की, हा नियम आहे या नियमानुसार ही तत्कालीन चुकीची आकारणी झालेली होती. तीला दुरुस्त केल्यानंतर ही आकारणी येते. त्याला हे कळायला पाहिजे. त्याचे समाधान व्हायला पाहिजे की, हो माझी मागणी बेकायदेशीर होती. शेवटी प्रशासन जे म्हणत आहे ते योग्य आहे. परंतु तश्या पध्दतीची वागणुक मिळत नसल्याकारणाने तो नागरीकांच्या मनामध्ये रोषही असतो आणि महानगरपालिकेच्या कारभाराविरुध्द चिडही निर्माण होते. या संदर्भात आपण आम्हाला अश्वस्त केलेले होते त्या दिवशी की, अश्या पध्दतीने बिले जरी वाटप झालेली असतील. आणि नागरीकांना घरपट्टीच्या बाबतीत जो पर्यंत समाधानकारक निवाळा मिळत नाही तो पर्यंत त्याला सुनावणीची संधी ही उपलब्ध राहील. कारण त्या सामान्य माणसाला आपल्या आलेल्या बिलानंतर त्याच्यामध्ये बारीक अक्षरांमध्ये लिहलेले असते की, आपल्या ही नोटीस मिळाल्यानंतर आपण २१ दिवसाच्या आत मध्ये आपली काही अडचण असल्यास कळवावे. म्हणजे आमच्या सारखे माणसाने सुध्दा खुप बारकाईने वाचले तर

त्यावेळेला लक्षात येते की, कायदेशीर रित्या आपण कश्या पध्दतीने हरकत घ्यायला पाहिजे. ते येतात बिचारे हे असे आहे, हे असे आहे बरोबर आहे. तो निघुन जातो बिचारा, पण जी खरे अर्थातने मी परवा आपल्यासमोर ही बोललो की, एम.आय.डी.सी.चा किस्सा जो आपल्याला सांगितल, तर अश्या अनेक अडचणी याच्या बाबतीतल्या आहे. घरपट्टी दरामध्ये आपण कुठेही वाढ केलेली नाही. हे जरी आपण लोकांना जिव तोडुन सांगत असलो. लोकांना त्या बिलाच्या संदर्भातल्या आकडेवारी पाहता, त्याचा जो मनस्ताप होतो. परंतु त्याच योग्यरितीने समाधान करणे गरजेचे आहे. दुसरे आपण बेसमेंटच्या बाबतीतल्या आणि पार्कींगच्या बाबतीतल्या जे धोरण ठरविण्याच्या संदर्भातला, धोरण कुठलाही असा असावे किंवा व्यवहारीक मिळकतींच्या बाबतीतला, तसे मी बोललो, इतर महापालिकांनी ज्या पध्दतीने धोरण अवलंबलेले आहे. औरंगाबादने अवलंबलेले आहे, नागपुरने अवलंबलेले आहे, पुणेने अवलंबलेले आहे, तश्या पध्दतीचे, बघा टॅक्सेशन टप्या टप्याने तुम्ही लोकांची मानसीकता, काय झालेले आहे, ठिक आहे. त्याच्यामध्ये नागरिकांचा दोष होता. तितकेच लोकप्रतिनिधीही दोषी होते. आणि त्याच बरोबरीने आपला कर्मचारी वर्ग सुध्दा दोषी होता. परंतु ती दोष पुर्तता आज करत असतांना त्याच्यामध्ये ४ पट ५ पट, १० पट वाढ जी झाली, ती लोकांना आता सहन होत नाही. धिरे धिरे मानसीकता, पेट्रोलचे दर रोज वाढतात. पण ते लागत नाही. रोज एक रुपया वाढतो, आठ दिवसाने दोन रुपये वाढतात.पण तुम्ही एकदम १०० चे २०० करुन टाका तर लोकं रस्त्यावर उतरतील, तर त्या पध्दतीने मानसीकता तयार होण्याच्या दृष्टीकोणातुन दरवाढ ही टप्या टप्याने अपेक्षीत असते. या बाबतीत जे आहे कुठेतरी एक धोरण, छोटे छोटे लोकं असतात ज्यांच्या उपजिवीका रिटायरमेंटनंतर त्यांच्या घराच्या भाडयाचेही उत्पन्नच मिळतात. त्या भाडयावरतीच असतात. त्याचे कुठलेच ॲग्रीमेंट नसतात, काही नसतात. आपल्याला हे पण माहित आहे की, त्यानी भाडेकरी ठेवलेले आहे आणि त्यातुन मनपालाही काही हिस्सा मिळायला पाहिजे. पण कुठेतरी आपण एक काही माफक अपेक्षा ठेवायला पाहिजे. त्याचे उत्पन्नाचा जो स्त्रोत आहे तो सुध्दा मेनटेन असायला पाहिजे. रिटायरमेंटनंतर पेन्शनवरती भागत नाही. रोजची वाढती महागाई आहे. याच्यातला मार्ग काढण्याच्या संदर्भातला, रोजचा जिवानाचा मार्ग चालणे खुप कठीन होत. म्हणुन कोणी काय करतो, आपल्या पार्कींग स्पेसमध्ये छोटासे दुकान करुन घेता,याच्या बाबतीत एक कुठेतरी अश्या पध्दतीचे धोरण आपण ठरवायला पाहिजे. जेणे करुन सामान्य माणसाला दिलासा ही मिळेल. आणि महानगरपालिकेच्या काही उत्पन्नामध्ये प्रपोरशनेटली आपल्याला फायदा ही होईल. तर ते सुध्दा तेवढ करणे गरजेचे आहे. महानगरपालिकेच्या मालमत्तांचा डिसइन्वेस्टमेंट करण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासनाने आता कसे आहे, आता आपल्या समोर मी बोलतो आहे साहेब, परंतु आपल्याकडुन अपेक्षा ठेवु किती दिवसाची, कारण एकामहिन्यात जर आपण आपला पदभार सोडुन जाल, आणि पुन्हा येणारे नविन आयुक्त कोण येतील, कसे येतील, त्यांची मानसिकता काय असेल, या शहराबद्दल त्यांच काय असेल. उत्पन्नाच्या बाबतीत त्यांच धोरण काय असेल, वसुलीच्या बद्दल धोरण काय असेल, त्या पुन्हा, आपण म्हटल ना, या चर्चा या सभागृहामध्ये होतात, तसे ते हवेमध्ये बोलले सारख्या, कागदावरच्या चर्चा कागदावरच असतात, मला कमीत कमी आपणास एवढीच विनंती आहे, या जी आपण आज चर्चा करत आहे, या महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाजुने कुठेतरी आपण तुमचा एक महिन्याचा शिल्लक राहिलेला कार्यकाळ आहे, या एक महिन्याच्या कार्यकाळामध्ये जाता जाता का होईना, एक ब्ल्युप्रिंट तयार करायला पाहिजे. बाकी कामे जे चालतील ते चालतील,जे कामे चालु आहे ते होत राहतील, परंतु कुठेतरी एक ब्ल्युप्रिंट तयार झाली तर या सभागृहातील सदस्यांना सुध्दा त्या ब्ल्युप्रिंटवरती अभ्यास करुन या महानगरपालिकेला कश्या पध्दतीने आर्थिक शिस्त लावणे, महानगरपालिकेच्या या गळत्या बंद करणे, आणि महानगरपालिका आर्थिक दृष्टया सक्षम कशी होईल, त्याची ब्ल्युप्रिंट तयार करुन दिली, तर निश्चितपणे म्हणतो या सभागृहाला येणाऱ्या आयुक्तांसमोर चर्चा करायला काहीतरी एक माध्यम तयार होईल. मा.महापौरताई आज आपण चांगला अर्थसंकल्प मांडलेला आहे, कोणत्याही प्रकारची कर वाढ दर वाढ केलेली नाही.सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या सुचना जरी व्यवहारीक आहे, परंतु प्रत्येक्षात तरतुदींमध्ये कितीही घट आणि वाढ केली तर ती फक्त एक औपचारीकता ठरते, आणि मला वाटते नुसत्या गोष्टी कागदावरती औपचारीकता ठरु नये, जो वास्तविक चित्र आता अर्थसंकल्पाच्या माध्यमातुन

प्रशासनाने दिलेला आहे. जरी आपण त्याला वास्तविक अर्थसंकल्प म्हणतो आहे, परंतु ते वास्तव्य आपल्या हातात नाही की, ज्याच्यातुन ८१ कोटी रुपयांचा उत्पन्न गाळेधारकांच्या माध्यमातुन किंवा विशालजींनी सुचविल्या प्रमाणे जर जसेच्या तसे घडणेच्या दृष्टीकोणातुन केले, तर जवळपास २२५ कोटी रुपये त्या अर्थसंकल्पामध्ये त्या उत्पन्नाचा समावेश करावा लागेल, आणि एखादा खुप मोठ फुगलेला अर्थसंकल्प मान्य केला याचा समाधान जरूर मिळेल, परंतु त्याचे निर्णय जे आहे. ते निर्णय मिळु शकणार नाही. म्हणुन मला वाटते, प्रशासनाने वास्तववादी अर्थसंकल्प म्हणजे त्याला मी पार्टली वास्तववादी समजेल, कारण ते वास्तविक जे आहे. ते अर्धसत्य आहे. जो पर्यंत आपण त्याच्यामध्ये उत्पन्नाच्या बाजुने घरपट्टीच्या माध्यमातुन म्हणा, किंवा गाळेधारकांच्या माध्यमातुन म्हणा, जो काही अंदाज ठरलेला आहे. ते अंदाजही जर कधी प्रशासनाने दर्शविलेले आहे तितक ही पुरेसा झाला, तरी आपण समजुन घ्या आपण काही  तरी अचिव्ह केलेल आहे. त्याची सुध्दा मला पुर्णपणे खात्री वाटत नाही. परंतु शेवटी अर्थसंकल्प आहे, त्याला मान्यता देणे गरजेचे आहे. अर्थसंकल्पाला मान्यता नाही दिली तर दैनंदिन कामकाज महानगरपालिकेच चालु शकत नाही. म्हणुन आपण दिलेला अर्थसंकल्प जसाचा तसा मान्य करावा अशी माझी या पुर्ण सभागृहाला विनंती आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आयुक्त साहेब, महापौरताई.

**मा.महापौर :-** एक मिनीट, मला बोलु द्या.खरं तर जळगांव शहराची आणि मनपाची वास्तविकता या ठिकाणी मांडलेली आहे. आणि मला वाटते, सगळे आपण खळबळुन जागे झालेले आहोत. आपल्या डोळयांमध्ये अंजन घालणारा, अशी वास्तविकता भाऊंनी या ठिकाणी मांडली, भाऊंचा मी सर्व प्रथम अभिनंदन करते, खरं तर कमाई अठन्नी आणि खर्चा रुपया या पध्दतीचा आपला अर्थ संकल्प होऊ नये. अर्थसंकल्पाला काही तरी अर्थ प्राप्त व्हावा,त्यासाठी हा अर्थसंकल्प जसाचा तसा मान्य करण्यात यावा अशी भाऊंनी या ठिकाणी विनंती केलेली आहे. मला ही अस वाटत की, हा जो अर्थसंकल्प आहे. तो कुठल्याही प्रकारची फुगवयाचा नाही. बऱ्याच सन्मा.सदस्यांनी ते मान्य सुध्दा केलेल आहे. यावर कोणाला बोलायचे असेल तर

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा जो अर्थसंकल्प आहे. आपण मंजुर केलेले आहे. सगळे सदस्यांचा शिवसेनेकडुन, आयुक्तांना, महापौरांना सर्वांना अभिनंदन, हा ठराव पास झालेला आहे समजा, चांगला आहे परंतु हा वाचत असतांना, मला एक माहिती मिळालेली आहे. ते विचारु  ईच्छितो पुढच्या भविष्यात जी गॅस पाईपलाईन आहे ते प्रस्तावीत आहे का ? गॅस पाईपलाईन भविष्यामध्ये पुढच्या वर्षी होणार आहे असे मला माहित पडलेले आहे. म्हणजे पुढे अजुन आपल्याला रस्ते खोदावे लागतील का? मला माहित पडले ते विचारत आहे मी.

त्यांना तशी माहिती मिळाली आणि त्याची चर्चा व्हावी, तर पुन्हा रस्ते खोदले जातील का तसे प्रस्तावीत आहे का?

**मा.आयुक्त :-** आता हे जर बघितल तर पुर्ण देशभरामध्ये आणि आपल्या राज्याचा विचार केला तर स्वत:साठी लागणारा जो एल.पी.जी आहे. तो हा महानगर गॅस लिमीटेड हा एल.पी.जी सगळीकडे पुरविला जातो. आता मोठ्या शहरांमध्ये ही गॅस पाईपलाईन पुरविण्याचं काम हे महानगर गॅस लिमीटेड यांच्यामार्फत पुरविण्याच काम चालु आहे बहुतांशी मोठ्या शहरांमध्ये त्यामुळे नजीकच्या काळामध्ये घरगुती कामासाठी जे गॅस सिलेंडर पुरविणारे जे आहेत. हे टप्प्याटप्प्याने बंद होणार ही वस्तुस्थिती आहे. परंतू आपण आपल्या शहराचा जर विचार केला. तर अद्यापपर्यंत MSGL  कडून आपल्याला तशा प्रकारचा प्रस्ताव आलेला नाही. परंतू जर प्रस्ताव आला तर शहर वासियांच्या सोईसाठी आणि राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे आपण त्याचा विचार करून हा त्यावेळेचा विषय आहे. अस पुर्ण शहराचा असल्यामुळे विचार करून तो धोरणात्मक निर्णय आपण महासभेसमोर घेवु . पण हे करत असतांना आपल्याला जे काही आपण रस्त्यांच्या बाजुला साईड पट्टया म्हणजे जे महत्वाचे रस्ते आहेत. तिथे आपल्याला टाकता येतील. काही ठिकाणी आपण जे सर्विस रोड प्राव्हाईड करतोय त्याठिकाणीही टाकता येतील. अगदी अपवादात्मक परिस्थिती मध्ये काही बदल किंवा दुरूस्ती आपल्याला करावी लागली. ती सुध्दा त्याचा खर्च आपण आपल्या संस्थेकडुन घेणार आहोत आणि ज्यावेळेला हा प्रस्ताव येईल त्यावेळेला आपण हा प्रस्ताव महासभेसमोर ठेवु. पण आजच्या तारखेला जर म्हणत असाल आपण तर अजुन आपल्यापर्यंत असा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

**सौ.सरिता नेरकर :-** आयुक्त साहेब मी आता माझ्या भुतकाळात जाते. महात्मा गांधी मार्केट येथे विजय कलेक्शन च्या मागील बाजुस माझा गाळा होता. माझे मिस्टर २००४ साली वारले . २००४ -०५ ला महापालिकेने त्याला सिल लावले त्याचे बिल भरले नसेल म्हणुन आणि ते सिल लावेलेले त्यावेळी कोतकर म्हणुन कोणीतरी वसुलीला होते. वारले ते आता त्यांनी मला इतक मेंटल केल होत की नुकतेच माझे पती वारलेले होते. मी असा निर्णय घेतला की कधीतरी माझी वेळ येईल आणि मी नक्कीच महापालिकेत जाईल आणि माझी व्यथा मांडेल आणि ती मांडण्याची मला संधी मिळाली आहे. मला हे वाईट वाटत की त्यावेळेला माझ्याकडे माझ्या ऑफीसला लॉक नव्हते. . नंतर त्यांच्याकडे येथे जेव्हाही यायची. मनपात हक्क मागायला कधी कोणी नसायचे हे २००४ -०५ साली होते. मनपात १२ दुपार नंतर टेबलावर कोणीच नसायचे. ही २००४-०५ ची गोष्ट आहे.त्यांनी मला व्यवस्थित माहीती दिली नाही. या सगळ्यांना माहिती आहे. मी फक्त ५० हजारांमध्ये तो गाळा अरिहंत ज्वेलर्स यांना विकलेला आहे. म्हणजे फक्त या महापालिकेला कंटाळुन पण त्या दिवशी मी निर्णय घेतला होता की कधीतरी एक दिवशी वेळ येईल आणि मी महापालिकेला मी हे नक्की सांगेल आणि मी देवाने मला नक्कीच संधी दिली आणि असेही मनपामध्ये पदाधिकारी , असेही कामगार आहेत की ते टेबलावर नसतात ही खंत आहे. खरच मोठी खंत आहे. कारण दुपार नंतर टेबलावर

**श्री.कैलास सोनवणे :-** सर्वच तसे नसतात ताई काही जण फिल्ड वर असतात. काम करतात ताई ते वॉर्डात असतात.

**सौ.सरिता नेरकर :-** आणि अक्षरश: घरी येवुन येवुन या लोकांनी जर माझे मिस्टर जर वारले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सर्वच तसे नसतात ताई चांगलेपण लोक आहे आणि काही वाईटपण आहेत ताई

**सौ.सरिता नेरकर :-** अशा भरपुर साऱ्या लोकांचे , नाही आजही भरपुर टेबलवर लोक नाहीयेत टेबलवर

**श्री.कैलास सोनवणे :-** ॲटोमेटीक चालत आहे हे बॅटरी लावली की चाबी भरायची आणि चालवयाची.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितिनभाऊंनी अर्थसंकल्पावर बरीच तोंड उघडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यांनी मागील दोन वर्ष काळातील आकडेवारी सांगीतली की , खर्चाची बाजु तर मी या ठिकाणी नितिनभाऊ यांच्या निदर्शनास आणुन देतो की मागील दोन वर्षापासुन कोरोना कालावधीमध्ये बरेचशे काम झाले नाहीत. कारण कोरोनामुळे बराचसा विकास आपला थांबला हा एक मुद्दा , त्यानंतर ज्या पध्दतीने आपला जसे नितीनभाऊंनी आता सांगतीले की आता जळगांव मध्ये त्यांच म्हणण एकदम बरोबर आहे. आपल्या पायावर उभे राहण्यासाठी आपल्याला काहीतरी कराव लागेल. मी नितिनभाऊंना अजुन एक याच्यामध्ये एक विषय सांगणार आहे की ही महापालिका फार भाग्यवान आहे. म्हणजे मी पुन्हा सांगतो की मी जळगांव शहराचा नागरीक म्हणुन , नगरसेवक म्हणुन मी पहिल्यांदा पॉझिटिव्ह विचार करतो आहे. आपण पण पॉझिटिव्ह विचार करायला पाहीजे की माझ जळगांव बदलत आहे आणि याच्यामध्ये माझा हातभार लागणार आहे आणि ज्या बदलासाठी आपल्याला जे करायचे आहे. ते कराव लागणार आहे . ही महापालिका खरच भाग्यवान आहे की शासनाने ईतिहासामध्ये १८५ कोटी रूपये शासनाने दिले. देवेंद्र फडणविस साहेब असतील, गुलाबभाऊ असतील त्यावेळेस असेल, किंवा १२५ कोटी असतील . तर १८५ कोटी रूपये या शहराच्या विकासासाठी शासन आपल्याला मदत करते. आपण हुडकोच कर्ज आता पुढच्य मार्चपर्यंत ३६ कोटी रूपये शिल्लक आहेत. ते कर्ज पण म्हणता येणार नाही साहेब तो जि.एस.टी पोटी ॲडव्हांस आहे . विनाव्याजाच तेही आपले टप्याटप्प्याने फिटणार आहे. म्हणजे एका वर्षात पुढच्या मार्चपर्यंत आपण पुर्ण आपल्या पायावर उभे राहाण्याची आपली तयारी सुरू आहे. बजेट हा फुगीर नाही. मी आतापण सांगतो आहे या सभागृहाला बजेट हा वस्तुस्थितीचाच आहे. तुम्ही बजेट मांडा आणि पॉझिटिव्ह विचार करा की माझे १७८ काटी रूपये घेणे घरपट्टीचे आहेत. तुम्ही जर १७१ कोटी रूपये या बजेटवर ठेवणार नाहीत. तर महापालिका वसुलीच करणार नाही. प्रशासन वसुलीच करणार नाही. ७० ते ८० टक्के हा आता आयुक्त साहेबांनीच सांगीतले . उदाहरणार्थ मी तुम्हाला सांगतो की नितीनभाऊ बोलले की वस्तुस्थिती आहे की ९० कोटींचा बजेट आयुक्त साहेबांनी केलेला आहे वसुली किती झाली मागच्या वर्षाची २०२०-२१ ची वसुली किती आहे. फक्त ५५ कोटी आहे. या वर्षामध्ये ५५ ते ६० कोटी रूपये येईल मग ही धरायची की आपला येणारा पैसा वस्तुस्थिती धरायचा. उधारी मागणी आहे ती आपल्याला वसुल करावी लागेल. हे कुठे भरले जाईल किंवा कोण भरेल आता किंवा हे निर्लेखित करा किंवा हे माफ करा असे म्हणता येणार नाही. आपल्याला जी वस्तुस्थिती आहे जे घेणे आहेत ते घ्यावे लागतील. कारण ज्या पैश्यांवर प्रशासनाला जर शहराचा विकास करायचा आहे. मला सांगा घरपट्टीची इतक्या विषयी चर्चा झाली. कोणत्या नगरसेवकाने या विषयावर प्रशासनाच्या विरोधात हे केले आहे. याच्यासंदर्भात सगळया नागरीकांना सगळया

नगरसेवकांनी मदतच केली आहे. ती त्यांना माहिती समजवुन दिली आहे की ही घरपट्टी या पध्दतीने आहे असे कर वाढलेले आहे. कोणी नगरसेवक असेल की त्याने सांगावे. प्रशासनाने वसुलीसाठी सुध्दा मदत करतात बऱ्याचश्या ठिकाणी मग वसुली नसेल तर विकास कसा होईल.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ चुकीची लावली आहे ना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ही चुकीची लावली त्याच्याविषयी आपण बोलतोच आहे ना , त्या लोकांना

**श्री. कैलास सोनवणे :-** काही ठिकाणी झाले असेल फक्त , किरकोळ ठिकाणी बाकीच्याठिकाणी सगळ्या ठिकाणी नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला एक सांगा गाळयांचा विषय आहे. नितीनभाऊ गाळयांचा विषय जो आहे तो आपण पाहीला तर गाळयांचा विषय पडीत आहे.

**सभागृहात बरेच सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे आवाज स्पष्ट येत नाही.**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनिंट सचिनभाऊ घरपट्टी चुकीची लावली ते नाही म्हणत आहे.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ मी पण तेच म्हणतोय ना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी वसुलीच्या बद्दलच म्हणतोय ना, हि आता झाली समजा या महिन्यात पाच सहा महिन्यात समजा उद्या परवा बिल दिले गेले. एक मिनिंट मागचं मी ते म्हणतोय.

**श्री. कैलास सोनवणे :-** विषय काय आहे माहिती आहे का लोक हे रस्त्यांना बेजार झालेले आहे म्हणुन त्यांना ते नकोसे वाटतय हा एक विषय आहे . जे रस्ते खोदुन पडले आहेत ना त्याच्यामुळे लोक हैराण झालेले आहेत. म्हणुन ते म्हणता की काही काम करत नाही आणि ऐवढे पैसे काढता आमच्या कडे आणि या आकरण्या ज्या आहेत ना त्या अगोदर चुकीच्या होत्या.

**श्री.सचिन पाटील :-** आप्पासाहेब याच्यामध्ये बराच मोठया

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ नाही नाही मी हा विषय नाही म्हणत आहे. आता चे जे चालुची जी घरपट्टीची बिल आहेत. आता ही मागची बाकी सांगतोय मी १७१ कोटी मागची बाकी सांगतोय मी म्हणतोय. हे तर पुढचे येतील. जी वाढीव आहे ती , आता आपण सुधारीतच बिल दिले आहेत फक्त तरी लोकांनी भरले आहे. परंतू गाळयांचा जो विषय आहे. गाळयांचा जो विषय आहे नितीनभाऊ मी परत सांगतो की, आताच शासनाने स्थगिती दिलेली आहे. जरी देवेंद्रभाऊंनी चुक मान्य केली कबुल केली देवेंद्रभाऊंनी की त्यांनी सांगीतल की त्यावेळेस निवडणुकीची आचारसंहिता लागणार होती आणि त्या गडबडीत हा आदेश निघाला आणि त्याला दुरूस्त करावा अशी मी लक्षवेधी मांडुण त्यांनी पण पॉझिटिव्ह दृष्टीनेच मदत केली . आज तो विषय स्थगित केलेला आहे. पण आपल्याला संधी आहे ना, आपल्याला संधी आहे कि शिवसेनेची सत्ता आहे. मा.एकनाथ शिंदे , नगरविकास मंत्री आहेत, आपले पालकमंत्री आहेत आणि आपण सर्व आहोत त्याठिकाणी माझ्यासकट भारतीय जनता पार्टी तुमच्या सोबत या विषयासाठी सोबत आहे. कारण मागे याबाबत आपली समिती गठीत झालेली आहे आणि निर्णय कुठे झालेला आहे. समितीपुढे आपण मांडु शकतो. की जसे नितीनभाऊ बोलले आपण शासनाला सांगू शकतो की ३ ते ८ टक्के प्रमाणे जस मागे आयुक्त साहेबांनी हा विषय शासनापुढे मांडलेला आहे. ३ ते ८ टक्के मध्ये त्याच्यामध्ये महापालिकेला देण्यात यावे की जेणेकरून तिथली भौगोलिक परिस्थिती, मार्केटची परिस्थिती, तिथल सगळ ऐरियाचे सगळ लोकेशन या सगळ्या गोष्टी ठरवुन ते अधिकार महापालिकेला द्यावे. आपण मी तेच सांगतो की, माझ जळगांव बदलत आहे. पॉझिटिव्ह विचार जर आपण केला. तर खरच आपण बदल करू शकतो. म्हणुन माझी विनंती आहे. की हा जो बजेट मांडलेला आहे नितीनभाऊ तो काही फार वाढवलेला नाहीये. १० कोटी रूपये साहेबांनी रस्त्यांची तरतूद ठेवलेली आहे. मला एक सांगा एक रस्ता जर घेतला ना कमीत कमी ५० लाख रूपये लागतात. १० कोटीत किती रस्ते होणार आहेत. उद्या आपण ईस्टिमेट बनवल आणि उद्या ऊठुन शासनाने किंवा अजनु कोणी एजन्सी आली आणि त्यांनी म्हंटल की आम्ही तुमच्या कडुन दहा वर्ष पैसे घेणार नाही. मी हे काम करायला तयार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालभाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनिंट नितीनभाऊ ही रक्कम कमी नाहीये ५० कोटी रूपये आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालभाऊ मला सांगा आपल सभागृह घोषणासाठी कशा पध्दतीने चालत

**श्री.विशाल त्रिपाठी :-** घोषणा नाहीये नितीनभाऊ , घोषणा नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त साहेब

**श्री.विशाल त्रिपाठी :-** घोषणा नाहीये नितीनभाऊ वस्तुस्थिती मांडतोय मी

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे तुमचं म्हणण आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी काही घोषणा करीत नाहीये

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता आपण १० कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे आणि हे सभागृह इतक ग्रेट आहे की २४० कोटी रूपयाची ज्यावेळेला ठराव करतांना बजेटात तरतूद आहे. बजेटला तरतूद अहे की नाही तो पैसा आहे की नाही. परंतू ती तरतूद आहे की नाही हे सुध्दा पाहील जात. काय होत की

**श्री.विशाल त्रिपाठी :-** साहेबांनी जर दोन वर्ष झाले कोणतच काम दिले नाहीये

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजींच म्हणण आहे की , १० कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे.

**सभागृहात बरेच सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे आवाज स्पष्ट येत नाही.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे सभागृह इतक काही गैर नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** घोषणा नाहीये आणि साहेबांनी दोन वर्षात एक रूपयांच काम केलेल नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पैसा शिल्लक पडलेला आहे आणि आयुक्त आपले प्रस्ताव मान्य करत नाहीयेत किंवा आपल्या अंदाजपत्रकांना मंजुरी अशातला भाग नाहीये. मी तेच म्हणतोय की मी काम करायचे म्हणतोय पण माझ्या खिश्यात अनुदान नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कस काय होईल ते नितीनभाऊ कारण प्रशासन आपल्याला म्हणते तरतूद संपली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो विशालजी

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यांची जर ईच्छा असली तर मनपा निधीतुन काम करायची.

**मा.आयुक्त :-** विशालभाऊ काही मुद्दयांवर खुलासा करतो. जे काही मुद्दे आहेत.

**श्री.सचिन पाटील :-** काही. .

**मा.आयुक्त :-** सर एक दोन मिनिंट मा.महापौरांनी काही मुद्दे जे आहेत तसेच सर्व सन्मा.सदस्यांनी विचारात घेणे गरजेचे आहे. सन्मा.सदस्य विशालभाऊ त्रिपाठी असतील किंवा नितीनभाऊ आहेत. यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत ते दोन्ही बाजुला अतिशय योग्य आहेत. पण मुळ मुद्दा जो आहे आपण जो मुद्दा उपस्थित केला त्यातील तांत्रिक बाजु विशालभाऊ आपण समजुन घ्यायला पाहीजे याच्यामध्ये महानगरपालिकेचे जे येणे बाकी आहे. जी मागणी आहे ती मागणी जी आहे ती महानगरपालिकेला वसुल करायचीच आहे. पंरतू बजेट करतांना जर तुम्ही कायद्यामध्ये जर तरतूद बघितली तर जे आपलं बजेट आहे त्याला आपण अर्थसंकल्प म्हणतो. त्याला कायद्यामध्ये अंदाजपत्रकामध्ये जमा आणि खर्चाचा अंदाज आहे मागणी नाही आणि आता आपणही याच्याशी सहमत व्हाल की मागणी आपण अनेक वर्ष महापालिकेमध्ये काम करत आहेत . की ज्यावेळेला शासकीय १०० रूपयांची मागणी असेल तर अशी कुठलीही महानगरपालिका नाही की ज्याची १०० रूपयाची मागणी आणि वसुली १०० रूपये आहे. जर आपण १०० रूपयाच्या मागणीमध्ये १०० रूपयाची वसुली जर धरली. तर जमा बाजु फुगेल , खर्च बाजु फुगेल आणि याचा जो परिणाम होतो तो आपण गेल्या अनेक वर्षापासुन या आपल्या महापालिकेमध्ये बघतो आहोत की आपण जर मनपा निधीमधुन आपण काम मंजुर केली आणि एखाद्याने महानगरपालिकेच्या वर्कऑर्डर वर विश्वास करून जर काम केल ती त्यालाही खात्री नाही आणि आपल्यालाही खात्री नाहीये की त्याचे पैसे आपण कधी देवु शकतो. परंतू याच जर दुसर उदाहरण आपण बघितल तर कुठल्याही राज्य शासनाच्या निधीमधुन मंजुर झालेल्या कामांच्याबाबतीमध्ये काम झाले आहे आणि निधी नाही म्हणुन पैसे मिळाले नाही. असे कधी होत का उलटपक्ष आपण म्हणतो की निधी असल्यावर काम का होत नाही. काल आपल्या मा. पालकमंत्री महोदयांनी त्याबद्दलची बैठक घेतली आपण वर्तमानपत्रात वाचल की आणि की उपलब्ध केलेल्या निधीचा वापर आपण लवकरात लवकर खर्च करण्याच नियोजन कराव. तर ही विसंगती कशामुळे आहे की आपण आपला अर्थसंकल्प केवळ आपल्या डिमांडवर केला तर निश्चितपणे अनावश्यक फुगणार आहे. जमा बाजु फुगणार आहे. याच प्रत्येक वेळेला आपण समजा २२५ कोटी रूपये बाकी आहे. तर आपण जर २२५ कोटी म्हंटले तर सभागृहातील एकही सदस्य याला संमती दर्शविणार नाही. पुढच्या आर्थिक वर्षामध्ये म्हणजे बरोबर ३१ मार्च २०२३ पर्यंत हे २२५ कोटी रूपये वसुल होतील का , म्हणजे आपण दोन दिवसांपुर्वी अगदी मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भामध्ये ऐकले असेल तिथे सेवा आहेत. तेथे ५०००/- कोटी रूपयाची ही वसुलीचे बाकी आहेत आणि ते पुढच्या वर्षामध्ये महानगरपलिकेला वसुल करायचे आहे. त्यामुळे डिमांड जी आहे ती बजेट मध्ये धरण हे कायद्याला धरून नाही. अशा पध्दतीने बजेटमध्ये धरण हे फुगीरभरती होईल आणि केवळ तरतूदी आहेत . प्रत्यक्ष तरतूदी राहतील कागदावर जर पासबुक मध्ये पैसे असतील तर देवु शकतो. त्यामुळे आपण जमेची बाजु वाढवायच काही कारण नाही आणि दुसरा मुद्दा जो आपण उपस्थित

केला की ९० कोटी का घ्यायचे नव्वद पेक्षा आपण करणार नाही का  तर आपण मागच्या वर्षीच उदाहरण बघितल तर २०२१-२२ च तर २०२१-२२ चा बजेट आपण मार्च २०२० मध्ये जो मंजुर केला होता. त्याच्यामध्ये जर आपण बघितल तर जमे बाजुमध्ये सुचविलेली घरपट्टीची जमा हि फक्त आपण ४२ कोटी अपेक्षित धरली होती. त्यात आपण २१-२२ मध्ये वसुल कीती केले होते प्रक्टीकलमध्ये ५२ कोटी वसुली केली होती. तर आपण आता हे जर बघितल तर रिव्हाईस बजेट मध्ये आपण ५५ कोटी जे अपेक्षित धरलेले आहे. तर ५५ कोटींच्या अबाऊ आपण जावु. म्हणजे प्रशासनाचा वसुली १०० टक्के असण्याच्या संदर्भात प्रयत्न असतो या बद्दल काही दुमत नाही. आपण सभागृहामध्ये जे बजेट मंजुर देतो हे सभागृहाने प्रशासनाला दिलेले उद्दीष्ट आहे. हे उद्दीष्ट पुर्ण होईल किंवा वसुल होईल अस गणित करून जर आपण जमा बाजु केली . तर होत काय की अनावश्यक फुगवटा होतो आणि मग होत काय आपण जर दोन वर्षापुर्वीच बजेट जर बघितल तर त्या मध्ये १०४ कोटींची तरतूद होती. आपण प्रत्यक्षात आपल्या हिश्याचे ४ कोटी सुध्दा करू शकलो नाही. त्यामुळे आपण आपली दिशाभुल करण्यामध्ये अर्थ नाही. त्यामुळे आपण वास्तववादी बजेट करतोय आणि मी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो आणि अश्वासित करतो की जे काही व्यवहारीक आपण जे वसुल करण्याच जे उद्दीष्ट आहे ते पुढच्या वर्षामध्ये गाठण्याच प्रशासन प्रमाणिकपणे प्रयत्न करेल आणि मला खात्री आहे. आपल्या सगळयांच्या सहकार्याने जसे आपण आता म्हंटले की बहुतांश नगरसेवक हे वसुलीकरीता सहकार्य करतात ही वस्तुस्थिती आहे . विरोध नाही सगळे सदस्य सहकार्य करतात. तसेच वाढीव घरपट्टींच्या तक्रारींना आमच्या अगोदर आपण उत्तर देतात. त्यांनतर सगळे प्रशासन आणि पदाधिकारी यांच्या एकत्रित प्रयत्नातुन पुढच्या वर्षी मला खात्री आहे की पुढच्या वर्षामध्ये म्हणजे जे उत्पन्न आता आपल्याकडे प्रत्यक्षात जमा होतय त्यापेक्षा आपण दुप्पट उत्पन्न वसुल करण्याच ठेवलय . आपले सन्मा. महापौरांनी सुरूवातीला त्यांच्या प्रस्ताविकता मध्ये सांगीतले की त्यात ५ कोटी रूपयांची वाढ सुचवावी मा.महापौरांच्या सुचना या प्रशासनाच्या दृष्टीने आदेश आहे आणि प्रशासन त्याच सदैव पालन करेल.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई याच्याबद्दल आपली चर्चा झालेली आहे. विशालभाऊंनी जी वाढ म्हणजे खर्च बाजु जी होती आणि आम्ही जमा बाजुमध्ये सुध्दा कस उत्पन्न वाढणार आहे हे सुध्दा सांगीतले. मला वाटत नितीनभाऊ  जमा बाजु कशी वाढवायची हे सुध्दा झाल. मनपाच्या मालकीच्या जागा त्या विकसित करणे आणि मनपाचा उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे तर हाच उद्देश होता. अर्थसंकल्प फुगीर नाही किंवा तो किंबहुना असु नये आणि तेव्हाच त्याच खरोखरच इंम्प्लिमेंटेशन होवु शकत आणि त्याच सगळयांच्या ज्या हे आहेत त्या अगदी १०० टक्के बरोबर आहेत. आपण आता ज्या ज्या गोष्टी सांगीतल्या त्या वस्तुस्थितीला धरून आहेत. मात्र पुन्हा एकदा महापौर ताईंना सांगावस वाटत की जस आता आयुक्त साहेब म्हणाले की त्यांना हे प्रक्टीकली पॉसीबल करून दाखवायच आहे. मला वाटत ज्या ज्या गोष्टी मी सुचविलेल्या होत्या. त्यात मुद्दा क्रं.१ त्यात गॅप फंडीगची एक तरतूद असावी. गॅप फंडीगची तरतूद आपण का मागतो आहे. कारण आपल्याला प्रक्टीकली जी अडचण येते विकास काम करतांना गॅप फंडीगची तरतूद त्यासाठी दुसरा मुद्दा होता. कंत्राटी कामगार , कंत्राटी अधिकारी नेमणे. आजची आपली जी परिस्थिती आहे. त्यामध्ये कामांचा जो ताण वाढलेला आहे तो आपल्या मनुष्यबळावर किंवा मनुष्यबळ कमी असल्यामुळे जे काम होवु शकत नाहीये. त्यासाठी आपल्याला आता ही नविन पध्दती अंवलंबवावी लागेल आणि मग त्यासाठीच्या खर्चाची तरतूद आपण एक नविन हेड घेवुन करून घ्यावी व याला हरकत नसावी. यात आम्ही सुचविलेल्या छोट्या छोट्या गोष्टी आहेत. तर त्या सभागृहाने सर्वानुमते मान्य कराव्यात अशी आमची अपेक्षा आहे. ती प्रोजेक्ट मॅनेजमेंट एजन्सी असेल तर आपल्याकडे आता तज्ञ अभियंते नाहीत. नजीकच्या काळामध्ये त्याचा कामाच्या गुणवत्तेवर सुध्दा परिणाम होतो आहे. तर त्या कामात फार मोठी तरतूद मागणी केलेली आहे अस नाही. येथे फक्त २/२ कोटींच्या तरतूदींची मागणी केलेली आहे आणि ती कशासाठी केलेली आहे की जे आपल्याला अचिव्ह करायचे आहे. त्यासाठीचीच मदत म्हणुनच के ली आहे. नितीनभाऊ मी सभापती असतांना सोलर पॅनल बाबतची मी २ कोटींची तरतूद केली होती. तर त्याची पार्श्वभुमिच मी हे दिलेले आहे की कोरोना काळामध्ये ते काम प्रत्यक्षात होवू शकले नाही. तर मला वाटत की प्रशासनाने याची तरतूद २५ लाखांची म्हणजे २ कोटींची कमी करून २५ लाखांची केलेली आहे. मला वाटत की प्रशासनसुध्दा माझ्या या मताशी सहमत होईल की हरित उर्जा संवर्धन या संकल्पनेच्या बाबतीतच नाही तर शासनाच्या अनेक योजना या संदर्भामध्ये आहेत. शासकीय इमारतींवर सोलर पॅनलची निर्मीती करण ही काळाची गरजच होणार आहे. आता सुध्दा वैयक्तिक घरांवर सोलर पॅनलचा जो वापर करीत आहेत. तर आपण शासकीय योजनांमध्ये आपण हे राबविल्याच पाहीजे तर याकामी तरतूदीच्या वाढीची मागणी केलेली आहे. तर मला तरी अस वाटत की विशालभाऊ आणि मी त्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत. ते तर त्यांनी वास्तव मागणी करणारे मुद्दे मांडलेले आहेत. तर त्याला मंजुरी देण्यात येवुन आपण बजेट मंजुर करावा. आता आमचा आत्ताच्या बजेटमध्ये असा कोणताच मुद्दा नाही की ऑफीशियली हा मुद्दा रद्द

करा किंवा हा असा असुच नये अस काही हा अतिशय किरकोळ आणि ज्या आवश्यक बाबी ज्या आहेत. किंबहुना बजेट रिपेअर करण्यासाठी इन्स्ट्रुमेंटसाठी सहाय्य करणार आहे. अशाच गोष्टींची आम्ही रास्त मागणी केलेली आहे आणि त्यामुळे विशालभाऊ आणि मी भारतीय जनता पार्टीतर्फे ज्याकाही सुचना येथे मांडलेल्या आहेत. त्याची दखल घेण्यात यावी. त्याला मंजुरी देण्यात यावी आणि त्यानंतरच्या वाढीव बजेटला मंजुरी देण्यात यावी अशी आमची संपुर्ण भारतीय जनता पार्टीतर्फे मागणी आहे.

**मा.आयुक्त :-** आता काही सुचना आपण केलेल्या आहेत. त्याच्यासंदर्भामध्ये यामध्ये हा एक मुद्दा आपण सगळ्यांनी लक्षात घेण गरजेचे आहे की या महानगरपालिकेला कुठलीही फंडींग शासनाकडून नाही. कारण शासनाच्या धोरणाप्रमाणे महानगरपालिकेच्या कुठल्याही कामांमध्ये आपण प्राईजेलेशन काम देत नाह. राज्य शासनाचे जे सुध्दा काही प्रोजेक्ट आहेत आणि जे प्रकल्प आहेत. त्या कुठल्याही प्रकल्पामध्ये जे आपले डॉक्युमेंट आहेत त्याच्यामध्ये प्राईजलेशन नाही त्यामुळे निविदा काढल्यानंतर त्याच्यामध्ये आणि महानगरपालिकेमध्ये काही डिस्पुट आहे तर तो प्रकल्प सुरू होणार याची शाश्वती नाही आणि महानगरपालिकेच्या निधीमधुन आपण एखादे काम दिले पण आताच्या आपल्या महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे आपण रस्ते, गटार वगैरे ही जी त्या त्या आर्थिक वर्षामध्ये काम आहेत ही आपल्या आर्थिक वर्षामध्ये पुर्ण होतात. म्हणजे ज्या वर्षामध्ये आपण जे ईस्टीमेट केलेले आहे . त्याच्यासाठी DSR  च्या त्याकालावधी आपण हे काम पुर्ण व्हाव की जेणेकरून दरवाढीच पुन्हा महापालिकाच नाही परंतू हा मुद्दा उपस्थित होवू शकतो. त्यामुळे अशा अवस्थेमध्ये परिस्थितीमध्ये आपण बघितल तर आपल्याला या फंडींगची आवश्यकता राहणार नाही. परंतू एखाद्या ठिकाणी जर काही कारणामुळे आपल्या ईस्टीमेट पेक्षा जर रक्कम वाढली तर त्यासाठी आपण महासभेच्या मान्यतेने त्याकरीता आपण वाढीव तरतूद करतो आणि त्या लेखाशिर्षामध्ये तरतूद असल्यामुळे तो खर्च किंवा गॅप फंडिंगचा जो विषय आहे. तशी स्वतंत्र तरतूद करण्याची त्याची आवश्यकता लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २०१९ ला तशा पध्दतीच्या निविदा काढुन एजन्सी नेमलेल्या सुध्दा आहेत. परंतू मला तरी वाटत नाही की आजपावेतो त्या एजन्सी कडून काम करून घेतल आहे. आता आर्कीटेक्ट शिरीष बर्वेची २०१९ चा स्थायी समितीचा ठराव असला . तर त्याच्यासोबत करारनामा सुध्दा झालेला आहे. तर माझे मत कसे आहे की आपल्याकडे जे अभियंते निवृत्त होताहेत आणि त्याचा ताण अंदाजपत्रक बनविण्याच्या संदर्भात मोठा त्रास होत आहे. तर जे काही आपले सेवानिवृत्त झालेले अभियंते असतील आणि त्यांना मानधनावर घेण्याच्या संदर्भात जर का विचार केला तर त्याच्यातुन निश्चितपणे मार्ग निघेल. कारण हे अभियंते रिकामे आहेत आणि त्यांच्या रिटायर्डमेंट नंतर बरेचशे काम जे आहेत ते कमी झालेले आहेत आणि त्यांची जर मानसिकता असेल. तर अशा पध्दतीने आपली अंदाजपत्रक तयार करणे किंवा आपल्या दैनंदिन कामामध्ये त्यांची मदत आपल्याला होईल. अशा पध्दतीचा विचार आपण एक करावा.

**सौ. पार्वताबाई भिल :-** महापौरताई आणि आयुक्त साहेब जे आपले २६० मध्ये जी स्मशानभुमी आहे तर दादा आपण त्या स्मशानभुमी मध्ये आपण जे सांगतीले आहे ते करा. कारण की त्या जागेमध्ये आपण जर केले नाही तर त्याच्यामुळे लोकांची समस्या वाढते आहे. दुसरी गोष्ट दादा जे आपले जे आपल्या वॉर्डामध्ये ११ मध्ये काम आहेत गटारी तर त्या गटारींच्या कामाला कमीत कमी दोन तिन महिने झाले. त्याच्यामध्ये गटारींच्या कामामध्ये विषय असा आहे की गटारी पाण्याची समस्या वाढली आहे आणि ते काम बंद आहे. त्याच्यासाठी महापौरांकडे परवाच्या दिवशी १० ते २० जण आले होते साहेब , हे जे काम आहे ते बंद पडले आहे त्याची चौकशी करण्यात यावी आणि पहिल्या काळामध्ये जी कमी वस्ती होती. त्याच्यामुळे जी पाईपलाईन टाकली आहे आणि आता जी आहे त्याच्यावर नळ कनेक्शन जास्त झालेले आहेत. त्याच्यावरून पहिल्यासारखा पाणीपुरवठा होत नाहीये.पण मी हे विचारते आहे की ह्या ज्या गटारी आहे त्याच्यामुळे पाईप तुटतात. नळ कनेक्शन तुटतात. तर ते पाईप कोणी आणायचे. तर ते उत्तर मला पाहीजे आहे साहेब आपल्याकडून , आपले पाणीपुरवठ्यावले म्हणतात की आम्ही आणणार नाही. मग ते काम कोण करेल.

**मा.आयुक्त :-** आता याच्यामध्ये

**सौ. पार्वताबाई भिल :-** आजपर्यंत दोन दोन / तिन तिन वर्ष झाले.

**मा.आयुक्त :-** ताई आपले योगेश बोरोले जे आहेत  अभियंता ते आपल्या वॉर्डातील हे काम करून घेतील.

**सौ.पार्वताबाई भिल :-** साहेब आता हे काम बऱ्याच दिवसांपासुन होत नाही आणि आता सणांचे दिवस आहेत. तिथे कोणीच काही काम ऐकत नाहीये.

**मा.आयुक्त :-** ताई ज्या ठिकाणी गटारींचे काम चालत असल्यामुळे जर कोणाचे खाजगी नळ कनेक्शन तुटत असतील. तर त्याचा भुर्दंड आपण नागरीकांवर न टाकता तो दुरूस्ती करून देण्याबाबतच्या सुचना संबंधित मक्तेदाराला देण्यात आलेल्या आहेत.

**सौ.पार्वताबाई भिल :-** धन्यवाद साहेब.

**मा.उपमहापौर :-** मा.आयुक्त साहेब व सर्व सन्मा. सभागृह सर्व प्रथम तर मी ठिकाणी आताच जो महापौरांनी अर्थसंकल्प सादर केला. तो कुठल्याही पध्दतीचा करवाढ , दरवाढ आणि कुठल्याही पध्दतीचा फुगीर बजेट सादर न करता अतिशय वस्तुस्थितीवर आधारीत अर्थसंकल्प महापौरांनी या ठिकाणी सादर केला . त्यासंदर्भात मी सर्वांच्यावतीने या ठिकाणी महापौरांच अभिनंदन व्यक्त करतो. आयुक्त साहेब अर्थसंकल्पाच्या बाबतीमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी ज्या काही तरतूदींमध्ये वाढ करण्याच्या बाबतीतल्या किंवा भविष्यामध्ये त्याच्यामध्ये वाढ करण्याच्या संदर्भामध्ये ज्या काही सुचना मांडल्या. त्या खरतर या ठिकाणी रास्त आहे. परंतू जस विशालभाऊंनी सांगीतल की शौचालयाच्या बाबतीमध्ये याठिकाणी ५० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे आणि महापौरांनी सांगीतल्याप्रमाणे ५० लक्ष रूपयांची तरतूद वाढुवन १ कोटींची तरतूद या ठिकाणी करण्यात आलेली आहे आणि विशालभाऊंनी याच्यामध्ये अजुन काहीतरी ईन्क्लुड वाढ करावी अशी या ठिकाणी सुचना मांडलेली आहे. परंतू मी याठिकाणी विशालभाऊ आपल्याला सांगू ईच्छितो की आपण मागील काळात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत किंवा आपल्या वित्त आयोगाच्या माध्यमातुन असेल , स्वच्छतागृह असतील किंवा युरीनल असतील आपले त्यासाठी केंद्र शासनाकडुन निधी उपब्धतेसाठी सफाई कामासाठी तर त्या निधीमधुन किंवा १४ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातुन केंद्र शासनाकडुन किंवा राज्य शासनाकडून वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या निधीमधुन आपण या ठिकाणी काम करत असतो.त्याचप्रमाणे आपण याठिकाणी नगरसेवकांना प्रत्येक नगरसेवकांना ५० लक्ष रूपयाची याठिकाणी तरतूद करण्याच्या संदर्भात विकास कामे करण्यासाठी जी तरतद सुचवली. ती आपली सुचना अगदी योग्य आहे. तसेच शुचिताताईंनी ज्या याच्यामध्ये तरतूदींमध्ये ज्या वाढविण्याच्या ज्या काही सुचना मांडल्या त्या योग्य आहेत आणि मी काळाची गरज देखील आहे. परंतू नितीनभाऊंनी याठिकाणी अतिशय विस्तृतपणे याठिकाणी आपल्या अर्थसंकल्पाच विश्लेषण आपल्याकडे आपल्या महानगरपालिकेच्या गल्ल्यामध्ये जर समजा पैसेच जमणार नसतील. तर अशा मोठमोठ्या तरतूदी आपण भविष्यामध्ये करणार असुन ज्याचे रिपेंमेंट खरच होणार नाहीये . तर आपण आता मी आयुक्त महोदयांशी बोलत असतांना त्यांनी सांगीतल की आपल्याकडे आपल्या अपेक्षित खर्चापेक्षा जस आपण सांगीतल जर आपल्याकडे जास्त उत्पन्नाची बाजु जमा झाली. तर मग आपण या तरतूदी केल्या असत्या तर मग जस आता आयुक्त महोदयांनी सांगीतल की आपण जी उत्पन्नाच्या खर्चामध्ये जी जमा बाजु दाखवलेली आहे ती आपण म्हणजे आपल्याकडे अपेक्षित उत्पन्नाच्या खर्चापेक्षा जर जास्त जमा झाले तर आपण त्याचा ठराव करून आपण तरतूद वाढवु शकतो. तर मला याठिकाणी अस वाटत की एकदम रास्त आणि योग्य मत आयुक्त महोदयांनी मांडलेले आहे. आत्ताच घरपट्टीच्या बाबतीमध्ये याठिकाणी काही सदस्यांनी नागरीकांच्या समस्या मांडलेल्या आहेत. ही एवढीच खरी गोष्ट आहे की जळगांव शहरातील नागरीक घरपट्टी च्या बाबतीत ज्या काही समस्या या ठिकाणी मांडल्या आहेत. तर ते प्रत्येक सदस्यांकडे नागरीक बोलताहेत किंवा सांगताहेत. नागरीकांच्या ज्या काही घरपट्टया वाढल्या आहेत किंवा जी काही नागरीकांनी १५ ते १६ हजार नागरीकांनी त्याच्यामध्ये हरकती घेतल्या आहेत. परंतू ही अचानक वाढ झालेली नाही. तत्कालीन मोजमाप जे झाल होत तर त्याच्यामध्ये चुकीच मोजमाप झाल असल्याकारणाने तर ते वाढ करून याठिकाणी घरपट्टीची आकारण्या करण्यासंदर्भामध्ये नागरीकांना बिल देण्यात आले आहेत. मला अस वाटत की जळगांव शहरातील सर्व नागरीक सुज्ञ आहेत आणि जस आत कैलासआप्पांनी या ठिकाणी मांडल की शहरामध्ये रस्त्यांची झालेली दुरावस्ता आणि नागरीकांना याचा त्रास होत असल्याकारणाने त्यांचा या घरपट्टीच्या करांमध्ये रोष जरूर आहे आणि ही सत्य परिस्थती आहे. परंतू आता नितीनभाऊंनी सांगीतल की घोडा अगर घास से दोस्ती करेंगा तो खायेंगा क्या ही तेवढीच सत्य परिस्थिती असुन आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नातुन मांडलेले बजेट आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** महापालिका काही देत नाहीये.

**मा.उपमहापौर :-** परंतू एक पाच मिनिंट ईबाभाई, परंतु या सगळया गोष्टी या रास्त असल्या तरी या आपल्याला या आपल्या उत्पन्नाच्या बाजुमध्ये वेळोवेळी वाढ करायची आहे. घरपट्टया या चुकीच्या वाटल्या गेलेल्या नाहीयेत.

**श्री. सचिन पाटील:-** चुकीच्या दिलेल्या आहेत.

**मा.उपमहापौर :-** ऐका ना

**सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना नेमके कोणते सन्मा.सदस्य बोलत आहेत ते समजुन आले नाही.**

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही चुकीच्या वाटल्या आहेत अस. .

**मा.उपमहापौर :-** आप्पा जे वास्तविक

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही काही ठिकाणी ज्या झाल्या आहेत.

**मा.उपमहापौर :-** आप्पा हे वास्तविक

**श्री. सचिन पाटील:-** चुकीच्या

**मा.उपमहापौर :-** सचिनसर एक पाच मिनिंट

**सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना नेमके कोणते सन्मा.सदस्य बोलत आहेत ते समजुन आले नाही.**

**मा.उपमहापौर :-** तर या ठिकाणी मला अस वाटत की आपले जे मालमत्ता अधिक्षक असतील, आपले उपायुक्त प्रशांत पाटील साहेब असतील आपले प्रभाग अधिकारी आपले चारही आपल्या घरपट्टी विभागामध्ये जे काम करणारे आपले कर्मचारी असतील. त्या सगळयांच मी याठिकाणी अभिनंदन व्यक्त करतो. कारण की त्यांनी याठिकाणी अतिशय परिश्रम करून पराकाष्टाने परिश्रम करून या घरपट्टीच्या बाबतीमध्ये वाढ केलेली आहे. तर त्यांच याठिकाणी अभिनंदन केलच पाहीजे. आपण जे वेळोवेळी म्हणतोय आहे की आपण आपल्या खर्चामध्ये महसुली जमा बाजु ही तोकडी होत आहे आणि आपण त्यांना अश्या पध्दतीने मोरली डाऊन कराल. तर मला अस वाटत की आपण त्यांना मोरली डाऊन करण्यापेक्षा त्यांच प्रोत्साहन वाढवल तर आता येणाऱ्या काळामध्ये ज्या पध्दतीने आपण ५५ ते ६० कोटी पर्यंत आलेलो आहोत. तर या भविष्यामध्ये आता आपण तरतूद केलेली आहे ९० कोटी रूपये जमा खर्च बाजुमध्ये तर मला अस वाटत की १०० टक्के करण्याचा प्रयत्न ते याठिकाणी करतील. मी याठिकाणी महापौरांनी जस सांगीतल की आपल आमदनी अठ्ठन्नी आणि खर्चारूपय्या अस व्हायला नको. तर याठिकाणी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे. तो याठिकाणी अतिशय योग्य आहे आणि सर्व सन्मा.सदस्य असतील, अधिकारी असतील , महापौरांसह सर्वांच मी याठिकाणी अभिनंदन व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**श्री. नितीन लढ्ढा :-** आपले सन्मा.सदस्य नवनाथभाऊ आणि सचिनभाऊंच्या ज्या सुचना आहेत. मी आता त्यांना या चर्चे संदर्भात आपण आयुक्तांकडुन आश्वासन घेतलेले आहे. त्यांच म्हणण आहे की बिल वाटली गेल्यानंतर महानगरपालिका कुठलीही दाद पुकार घेणार नाही. मी त्यांना म्हंटल की तस होणार नाही.सुनावणीची प्रक्रीया ही निरंतर राहील. ती कायम राहील सुनावणी नंतर जर काहीही असेल तर आणि आपण मागणी कराल की आपल्याला आकारण्यात आलेली आकारणी ही अयोग्य पध्दतीने आणि बेकायदेशीर पध्दतीने लावली गेलेली आहे. त्या शंकाच निरसण प्रशासन आपल्याला करून देईल आणि जर त्यात प्रशासनाची चुक असेल तर प्रशासन त्यामध्ये सुधारणा करून देईल.

**श्री. सचिन पाटील:-** भाऊ हे आयुक्तांनी सांगावे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** हो ना

**श्री. सचिन पाटील:-** भाऊ हे त्यांनी सांगावे की आम्ही करून देवु .

**श्री. नितीन लढ्ढा :-** हो ना तुम्ही रेकॉर्डींग करून घ्या म्हणजे कस आहे.

**श्री. सचिन पाटील:-** आयुक्त साहेब कस आहे. घरपट्टी विभाग जो आहे त्यांनी हे चुकीच कार्य केलेल आहे. याचे प्रुफ आहे आमच्याकडे.

**मा.आयुक्त :-** मी खुलासा करतो. ज्या आकारणीच्या बाबतीत आपण यावेळी चर्चा केलेली आहे. प्रामुख्याने आपण दोन मुद्दे लक्षात घेतले पाहीजे की, लोकांच्या घरपट्टीमध्ये वाढ झालेली आहे. आपण घरपट्टीच्या दरामध्ये कुठलीही वाढ केलेली नाही. हा मुद्दा आपण हा मुद्दा सन्मा.सदस्यांनी समजुन घेण गरजेच आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब सर्व. .

**मा.आयुक्त :-** ताई एक दोन मिनिंट , आता हे करत असतांना गेल्या तिन वर्षापासुन बऱ्याच ठिकाणी याच काम चालु होत. हा जो सर्वे झालेला आहे हा सर्वे साधारणत: तिन वर्षापासुन चालला आहे. आता ही प्रक्रीया आपली २०२० च्या पुर्वी पुर्ण होण अपेक्षित होत. परंतू कोरोनाच्या काळामुळे आपल्याला एक दोन वर्ष उशिर झाला आहे अस म्हणायला हरकत नाही. आता या कालावधीमध्ये आपण जर विचार केला तर जवळपास १ लाख ७० हजार मिळकतींची एका नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत प्रत्यक्ष जावुन तपासणी केलेली आहे. आता यासाठी आपण एक कुठलीही गोष्ट आपण मान्य करतो की ज्याठिकाणी आपण मनुष्यबळाचा वापर करतो. त्याठिकाणी मनुष्य म्हणजे काही कुठली मशीन नाहीये. त्या काही ठिकाणी माणसांकडून काही चुका होत असतात आणि या मानवी चुका या अपेक्षित असतात. ज्या-ज्यावेळेला आपल्या अशा निदर्शनास येतात. त्यावेळेला आपण त्या दुरूस्ती करायची तयारी दर्शविली पाहीजे. आपला असा बिल्कुल दावा नाहीये की सन्मा.पत्रकार बंधुच्या समोर सुध्दा सत्यकथा मांडलेली आहे. या ठिकाणी सर्वेमध्ये आलेली माहिती चुकीची असण्याची शक्यता आहे आणि म्हणुन आपण नागरीकांना

त्यांच म्हणण मांडण्याची संधी देतो. त्यांच म्हणण ऐकून घेवुन सर्वेमध्ये ज्याठिकाणी आकारणी मध्ये , दरामध्ये त्यांच्या बांधकामाच्या प्रकारामध्ये ज्याठिकाणी विसंगती आढळुन येईल आणि जे नागरीक आपल्याला ते निदर्शनास आणुन देतील .त्यांची खात्री करून आपण ती विसंगती दुर करून देणार आहोत. जस आपले सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी सांगीतले त्याप्रमाणे मागच्या आठवड्यामध्ये या संदर्भामध्ये चर्चा झाली. सभागृहामधील काही प्रमुख पदाधिकाऱ्यांना मा.महापौरांनी बोलाविलेले होत आणि त्याबाबत विस्तृत चर्चा त्याठिकाणी झालेली आहे आणि त्या चर्चेमध्ये आपण हे ही मान्य केलेल आहे की जर जरी सुनावणीचा कालावधी संपुन गेलेला असला त्यावर्षीची आकारणीची अंतिम यादी आपण वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द केलेली असली. यावर्षाची अंतिम फरकाची बिले जरी आपण दिलेली असली. तरी काही कारणाने जस आता नितीनभाऊंनी सांगीतल की आपण काही कायदेशीर प्रोसीजर लक्षात घेत नाहीत. काही अपीलामध्ये कोणी जात नाही. काही जणांना दर कळत नाही. सर्वसामान्य नागरीक या ज्यांना आकारणीची माहिती नसेल तर आपण त्यांचा गैरफायदा घेणार नाहीयेत आणि ज्या-ज्यावेळेला नागरीकांना अस वाटेल की ज्यांना वाटत असेल की काही चुक झालेली आहे ती आपण तपासुन घेवु आणि जर बिल निघाल्यानंतर सुध्दा जर वाटत असेल की आकारणीमध्ये चुक झालेली आहे तर आपण आकारणी दुरूस्त करून घेवुन बिल दुरूस्त करून घेवु. म्हणजे याच्याबाबतीमध्ये नागरीकांची गैरसोय होईल अस आपण कोणत्याही कार्यपध्दती वर आपण बोट ठेवणार नाही आणि सन्मा. महापौरांच्या बैठकीमध्ये सुध्दा आपण खुलासा केला होता. तरी सुध्दा सभागृहामध्ये आपण खुलासा करतोय ज्यावेळी ज्या नागरीकांच्या बाबतीमध्ये अस निदर्शनास येईल किंवा केव्हाही निदर्शनास येईल आपण ती चुक निदशर्नास आणुन द्या. त्याची आपण दखल घेवु या संदर्भामध्ये जे नागरीक आपल्याकडे येत आहेत. मला खात्री आपले प्रभागातील प्रभाग अधिकारी आणि त्या अधिपत्याखालील कर्मचारी त्यांच समाधान करून द्यायचा प्रयत्न करतात आणि संपुर्ण शहरामधील आयएमए आणि हॉस्पीटलचे एक शिष्टमंडळ आपल्याकडे आले होते तर आपण त्यांचही समाधान करून दिलेले आहे. एमआयए च ही उद्योगांच्या संदर्भामध्येही एक शिष्टमंडळ आलेल होत. त्यांची ही बाजु आपण समजवुन दिलेली आहे. जे जे लोक आपल्या संपर्कात येताहेत आणि जे कोणी औपचारीक किंवा अनौपचारीक पध्दतीने आक्षेप घेतील आणि त्या सगळयांच समाधान करून द्यायची आपली तयारी आहे. मुद्दा असा आहे की गेल्या विस वर्षांनंतर आपण पहिल्यांदा आकारणी करतोय. आपण आता बघितल तर बऱ्याचश्या लोकांना फेरआकारणी काय आहे हे माहिती नाही. काही सन्मा सदस्यांना हा विषय त्यांच्या नगरसेवक पदाच्या कालावधीमध्ये पहिल्यांदा आलेला आहे . अशा लोकांचा आपण गैरफायदा न घेता आपण जेवढी जास्तीत जास्त मदत करता येईल तेवढी करू. पुन्हा कोणावरही घरपट्टीमध्ये अन्याय होणार नाही याची आपण काळजी निश्चितपणे घेवु.

**श्री. सचिन पाटील:-** आयुक्त साहेब मी आपल्याकडुन एक अपेक्षा व्यक्त करतो की नागरीकांना समजल पाहीजे की आपण काय करतो आहे आपल्याला बिल कोणत आलेल आहे. जस आता भाऊंनी आताच सांगीतल की बारीक अक्षरात समजत नाही ही फॅक्ट आहे.

**मा.आयुक्त :-** माझ्या माहितीप्रमाणे आपण वेळेवेळी ती माहिती देवू. बरेचशे ज्यावेळेला सन्मा. महापौरांच्या बैठकीमध्ये काही धोरणात्मक विषय होते. काही सन्मा. सदस्यांनी घरपट्टीचा भाडेकरींचा विषय असेल , पार्कींगचा विषय असेल उदाहरणार्थ काही ठिकाणी भाडेकरी नाहीयेत आणि याच्यासंदर्भामध्ये आपण जे धोरण ठरवलं होत. त्या धोरणाप्रमाणे आपण अंमलबजावणी केलेली आहे काही बाबतीमध्ये लोकांपर्यंत आपण पोहोलो नसेल पुन्हा आपण पोहचू.

**श्री. नितीन लढ्ढा :-** महापौरताई घरपट्टीच्या बाबतीत सन्मा.सभागृहात साहेबांनी घोषणा केलेली आहे. त्याचप्रमाणे अपार्टमेंटच्या नळपट्टीच्या संदर्भात सुध्दा एक घोषणा करून द्यावी .जेणेकरून त्याबाबतीतही नागरीकांचही समाधान होवून जाईल. जो निर्णय आपण त्यावेळेला घेतलेला होता.

**मा.आयुक्त :-** आता नितीनभाऊंनी यांनी काही फिल्डवर येणाऱ्या काही अडचणी किंवा पाणी पुरवठ्याच्या इजिनियर कडुन अंमलबजावणी होतांना काही वेगवेगळ्या पध्दतीने वेगवेगळे प्रॉब्लेम होण याच्यासंदर्भात सभागृहात एक मुद्दा मांडला होता. त्याला अनुसरून सन्मा.महापौर यांचे कडे या संदर्भामध्ये एक बैठक आपण घेतलेली होती. त्या बैठकीमध्ये एमजीपी चे अधिकारी काही सन्मा ज्येष्ठ पदाधिकारी आणि काही पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी आणि प्रकल्प विभागाचे अधिकारी यांची बैठक घेतलेली होती. त्याच्यानंतर त्या बैठकीनंतर काही विषयांच्या बाबतीमध्ये आपली चर्चा करण्याच ठरलं होत. त्याप्रमाणे ही बैठक सुध्दा आपण काल घेतलेली आहे. आता आपल्या या अमृत योजनेचे जे मक्तेदार आहेत. त्याचे इंजिनियर एमजीपीचे सुप्रिटेंडेट इंजिनियर आणि त्यानंतर आपले महानगरपालिकेचे प्रकल्प विभागाचे सगळे इंजिनियर आणि पाणी पुरवठ्याचे इंजिनियर याच्यामध्ये आपण म्हटल्या त्याप्रमाणे या बैठकीमध्ये काही तांत्रिक दृष्टया ज्याठिकाणी आपल्याला जे अपार्टमेंट असतील जुने

अपार्टमेंटस असतील. त्याठिकाणी पाणी साठविण्याची जी क्षमता आहे ती ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे. अशाच ठिकाणी आपण एक कनेक्शनच आपण करणार आहोत. ज्याठिकाणी जुने अपार्टमेंट आहेत की त्याठिकाणी पाणी साठविण्याची सोय नाही किंवा आता करणेही शक्य नाही. त्यवेळेला आपल अस ठरल होत की आपण नळ कनेक्शन अपवाद म्हणुन आणि लोकांची गैरसोय होवू नये म्हणून आपण त्यांना इंडिव्हिजल कनेक्शन त्यांच्या मागणी प्रमाणे हे आपण देणार आहोत. निश्चित करून निश्चितपणे सर आपण आपल्या शिव कॉलनीमधील आपण एक मुद्दा मांडला होता. अशी परिस्थिती ज्या ठिकाणी असेल त्याठिकाणी नळ कनेक्शन दिले जातील. दुसरा मुद्दा असा त्याठिकाणी सन्मा.महापौरांनी अशा सुचना दिल्या होत्या की ज्याठिकाणी पुर्वीचे जे नळ कनेक्शन आहेत. अनधिकृत आहेत आणि त्यांना नविन पाईपलाईनवर नळ कनेक्शन घ्यायला तो त्यावेळेला तयार होत नाही. त्यावेळेला आपल्या लक्षात जे नळ कनेक्शन आलेले असतील. ते जुने नळ बंद करा मात्र हे करत असतांना ज्याला कनेक्शन मागणी करायची आहे. त्या परिसरात रस्ते करण्याच्यापुर्वी कनेक्शनची मागणी करावी. अशा सुचना दिलेल्या आहेत. आपण याबाबतीमध्ये प्रत्येकाच्या मागणी प्रमाणे नळ कनेक्शन देण्यात यावे. कारण ज्याठिकाणी रस्ते झाले त्याठिकाणी आपल्याला त्याला नळ कनेक्शन देता येणार नाही. कारण त्याला निधी खर्च करायला भरायचा आहे अशा पध्दतीच्या सुचना आपण कालच्या बैठकीमध्ये दिलेल्या आहेत. अशा काही ठिकाणी आपल्याला १ इंची २ इंची ३ इंची नळ कनेक्शन देण आवश्यक असेल. त्याठिकाणी तांत्रिक अधिकाऱ्यांना घेवुन त्याठिकाणी २ इंची कनेक्शन मेन पाईपलाईन वरून काढुन देणे आणि पोहोचवा आणि त्याच रेकॉर्डही करा आणि आपण याबाबत वर्तमानपत्रामध्ये एक सुचना देवुन अशा बाबतीत पाणी पुरवठ्याच्या इंजिनियरांना या पध्दतीच्या सुचना दिलेल्या आहेत. याबाबतीतील हे नळ कनेक्शन रिसतर महानगरपालिकेकडुन परवानगी घेवुन मंजुर करून घ्याव आणि १५ दिवसांनंतर यात काही बदल झालातर याला सुध्दा महानगरपालिका जबाबदार असणार नाही. तर याच्यामध्ये लोकांना आपल्याला थोडासा फोर्स करावा लागेल तर दुसरा एक मुद्दा सन्मा. सदस्या शुचितताई त्यांनी हा मुद्दा मांडला होता की अर्ध्या इंचीला २ हजार आहे आणि १ इंचीला १२ हजार आहे आणि २ इंचीला काहीतरी २ लाख किंवा २.२५ लाख असेल. याच्या संदर्भामध्येही पाणी पुरवठा विभागाचे जे ईन्चार्ज आहेत. लुले यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. की याच्यामध्ये साधारणपणे तांत्रिकपणे बघितल तर अर्धा इंची पेक्षा १ इंची लाईनवरून चौपट पाणी पुरवठा होतो. जर अर्ध्या इंचीला २ हजार असेल तर १ इंचीला ८ हजार असावे. कारण १ इंचीवरून चौपट पाणी पुरवठा होतो आणि १ इंची पेक्षा २ इंचीला जास्त टेरीफ असाव असा आपला अंदाज आहे. पण दर जास्त असल्यामुळे तर नागरीक काय करतात की आज १ इंचीचे एवढे द्या आणि अर्ध्या इंचीचे एवढे द्या. तर त्यात २ इंचीच्या ऐवजी आम्हाला १ इंचीचे कनेक्शन द्या आणि हे बरोबर व्यवहार्य मार्ग आहेत आणि हे प्रत्येकाची ईच्छा आहे की पाण्याचे कनेक्शन द्याव. परंतू ही मागणी कमी व्हावी ही रास्त अपेक्षा आहे. नागरीकांना जादा दर लावुन जर त्यांचे नुकसान होवु नये. या पध्दतीने पाणी पुरवठा विभागाला सुचना केलेल्या आहेत आणि महासभेसमोर तुम्ही सुधारीत पणे परंतू सुधारीत असलेला सुधारीत पाणी पट्टीचा सुधारीत प्रस्ताव ठेवा आणि तो जर प्रस्ताव आपल्याला योग्य वाटला तर महासभेने त्याला मंजुरी दिली तर आपली या वर्षापासुन १ सुध्दा नव्हेच तर २ इंची सुध्दा आपले आपण त्याप्रमाणे आकारणी करू. मला सुध्दा अस वाटत की याला अमृतच्या कनेक्शनच्या बाबतीमध्ये या शंका दुर व्हाव्यात. माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की आपापल्या भागामध्ये ज्या नागरीकांनी अधिकृतपणे अमृतचे कनेक्शन घेतले नसतील. त्यांना आपण सुचना कराव्या कारण आपण आता अमृतच्या काही पाईपलाईन चालु करायच्या आणि जुन्या आपल्याला बंद करायच्या आहेत. रस्ते झाल्यानंतर पुन्हा ते खोदण्याची आपल्याला वेळ येवु नये. त्यासाठी आपल्याला ज्याला कनेक्शनची मागणी करायची आहे त्यांनी ती करून घ्यावी. अन्यथा नाईलाजाने आपल्याला पुढच्या नविन नळ कनेक्शनवर बंदी करण्यात येईल.

**श्री.कैलास सोनवणे:-** साहेब तुम्ही एवढ सांगीतल आता मी तुम्हाला सांगीतल होत कारवाईच त्याच काय झाल.

**मा.आयुक्त :-** या ही विषयावर कालच्या बैठकीमध्ये चर्चा झाली आणि त्यावेळी ज्याही लोकांचे म्हणणे आहे की आम्ही महानगरपालिकेच्या पावत्या आहेत. त्यामुळे मक्तेदाराकडुन नळ कनेक्शन दिले गेलेले नाहीत. आता आपल्या लोकांच्या कडुन काही नळ कनेक्शन दिले गेलेले आहेत का याच्याबद्दल कालच्या बैठकीमध्ये लुलेंना सुचना दिलेल्या आहेत की तुम्ही प्रत्येक ठिकाणी माहिती घ्या. याचाही खुलासा ते करतील की अमृतच्या कनेक्शनवर बोगस कनेक्शन नाहीत. परंतू सर्व सन्मा सदस्यांच्य मागणी प्रमाणे कारण आपलेच लोक आपली फसवणूक करत असतील तर त्याच्यामध्ये आपल्याला तोही आपण खुलासा करावा.

**श्री.कैलास सोनवणे:-** कुठे आहेत लुले साहेब

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा याबाबतच मला विषय मांडायचा आहे. काही आमचे प्रभागात काही जुने अपार्टमेंट आहेत. आणि काही लाकांचे कनेक्शन होते त्यावळेला ते सेप्रेट होते कारण की त्या टाक्या हजार दोन हजार लिटर च्या असतील माझ्या कडे देवराम नगर भाग आहे. तिथे जुने अपार्टमेंट आहेत आता त्यांना सांगीतल की १ इंची कनेक्शन मिळतील. आता एका अपार्टमेंटला ९ घर आहेत आहेत साहेब तर त्या लोकांची परिस्थिती नाहीये पैसे भरण्याची किंवा आम्हाला १ इंचामध्ये पाणी पुरणार नाही तर बिल कोण पे करेल.म्हणुन त्यांचा अर्ज घेवुन मी स्वत: भेटलो तायडे साहेबांना किंवा तेथे जे संबंधीत अधिकारी असतील त्यांना बोलविले, नंतर अमृत योजनेचे जे वानखेडे आहे त्यांनाही सोबत घेवुन गेलो, पण त्यांनी काय केले काही फोटो काढुन आणले अपार्टमेंटचे जेथे अमृत योजनेचे ९-९ कनेक्शन दिसत आहे. त्यांनी मला तिथले फोटो दाखविले. मी साहेबांशी ते ही बोललो की, तेथे ९-९ कनेक्शन दिलेले आहे पण ते बोलले की, तो जी.आर.सन २०१९-२० मध्ये ते कनेक्शन दिलेले आहेत. ते कनेक्शन आपण आता देऊ शकत नाही का साहेब, का देऊ शकत नाही त्याचाही खुलासा तुम्ही पेपरात द्या, कारण तेथे मी १० ते ११ वाजेपर्यंत होतो, लोकं अक्षरश: इतक घान बोलतात आणि ते ऐकाव लागत आम्हाला आता ही परिस्थिती आहे. मी त्यांनी हे ही सांगितले की, आर्धे पैसे तुम्ही पे करा आर्धे पैसे मी देतो तुम्हाला दोन कनेक्शन १-१ इंचीचे देतो, हे ही सांगुन आलो पण त्या लोकांची मनस्थिती नाही. याच्यावर काही तर मार्ग काढा साहेब आणि लवकरात लवकर काढा, कारण त्या लोकांना आता तुम्ही म्हणत आहे १५ दिवसात मनपाचे पाणी रेग्युलर होतं ते बंद करु. ती अडचण अजुन जास्त होईल म्हणुन त्याच्यावर आपल्याला काही तरी निर्णय घ्यावा लागेल,

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, तिथेही हीच परिस्थिती आहे, प्रत्येक अपार्टमेंटमध्ये ३ किंवा ४ कनेक्शन असतील आणि टाकीची पण सोय नाही. तर सगळीकडे प्रत्येक इन्डीव्हीजवली एक एक कनेक्शन द्याव असे मी आयुक्त साहेब आपल्याला सांगते. कारण एक किंवा दोन.

**मा.आयुक्त :-** आपण आताच त्याच्यावर सविस्तर चर्चा केलेली आहे. ज्या ठिकाणी भौगोलिक करायचे नाही म्हणुन आपण प्रत्येकाला कनेक्शन देणार नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** काय बोलत आहे सदस्य...

**मा.आयुक्त :-** उद्या ज्यांची पाणी बंद झाले त्याची जबाबदारी आपण घेणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** जे धोरण आपण हे ठरवितो आहे, जेथे अंडरग्राऊंडमध्ये टाकी शक्य आहे किंवा ज्यांच्याकडे अव्हेलेबल आहे त्यांनी एकच कनेक्शन घ्यावा. आणि जेथे प्रॅक्टीकली पॅसिबल नाही. त्यांना स्वतंत्र कनेक्शन देण्याची परिस्थिती बघुन निर्णय घेवु प्रशासन म्हणुन, पण माझा या धोरणालाच मुळात विरोध आहे.मुळात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन रस्ते, पाणी, गटारी हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जबाबदाऱ्या आहेत. पाणी हा प्रत्येक नागरीकाचा वैयक्तीक अधिकार आहे. जसे अपार्टमेंटला आपण कसे ट्रिट करतो, अपार्टमेंटला जी घरपट्टीचे बिले आपण देतो ते अपार्टमेंटचे देतो का महापौरताई, आपण प्रत्येक फ्लॅट निहाय बिल देतो, तसेच प्रत्येक फ्लॅट निहाय त्यांना स्वतंत्र पाणी कनेक्शन हे असलच पाहिजे. साहेब आज अशी परिस्थिती आहे. अनेक ज्या नविन कन्स्ट्रक्शन वर्क्स होत आहे. त्यामध्ये सुध्दा असे होते की, काय होत, बिल्डर काय करतो अपार्टमेंट बांधतांना त्याच्या परिचय पत्रिकेत असत की,प्रत्येक फ्लॅट धारकाला आर.ओ. बिल्डरकडुन फ्री देण्यात येणार आहे. का देतो बिल्डरकडे बोरिंग असते त्यांची तेथे.बोरिंगला पाणी असते, पण बोरिंगला आज मुबलग असलेले पाणी भविष्यात राहिलच याची शास्तवृत्ती कोणीच देवु शकत नाही. तुम्ही मी किंवा दुसरा कोणताही अभियंता याची शास्तवृत्ती देणार नाही. आज त्या अपार्टमेंटला कोणी तरी फ्लॅट घेतलेला आहे भविष्यात तो तिसऱ्या कोणाला तरी विकला जाणार आहे. त्यानंतर जर त्या बोरिंगचे पाणी आटले असेल, त्या फ्लॅटसाठी जर स्वतंत्र कनेक्शनची सोय नसणार आहे. तर जो या मानसाचा नैसर्गिक अधिकार आहे पाण्याचा, त्या अधिकाराचा आपण खंडन करत आहोत हे असे धोरण ठरवुन. त्यामुळे या धोरणाला भविष्यात सगळया नगरसेवकांचा विरोधच होणार आहे. कारण नागरीकांच्या तक्रारींचा सामना हा आपल्याला करावा लागणार आहे.हे प्रॅक्टीकली व्हीझीबल होणार नाही. आणि खरं तर नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरोधात हे धोरण होत आहे. आणि मला ऐवढ प्रशासनाने सांगाव की, ज्या इतर महापालिका आहे, इतर महापालिकांमध्ये, प्रशासनाने सगळया नगरसेवकांना सभागृहाला हे दाखवे कागदावर की, असे इम्पलीमेंटेशन झालेले आहे. अपार्टमेंटला एकच कनेक्शन, तसे होऊच शकत नाही. हा कुठेतरी संकल्पनेचा घोळ चाललेला आहे प्रशासनाचा, अधिकार आहे प्रत्येक मालमत्ता धारकाला स्वतंत्र पाणी कनेक्शनचा,

**मा.आयुक्त :-** आपण तांत्रिक बाजु न घेता केवळ आपण प्रशासनाला दोषी धरणे मला नाही वाटत योग्य वाटत, याच्या बद्दल अधिकारीही त्यावेळेला होते.या सगळयांमधुन आपण एम.जी.पी.च्या अधिकाऱ्यांशी ही चर्चा करुन कनेक्शन मान्य केलेले आहे. लोकांच पाणी मिळविणे हा निश्चित अधिकार आहे. आपण कोणलाही त्यापासुन वंचित करत नाही. परंतु मला सांगा तांत्रिक दृष्टया अव्यवहारीक असेल त्या पध्दतीने पाणी द्या.तर असा हट्ट धरणे

योग्य वाटत नाही. प्रत्येकाला पाणी देणे हा महापालिकेचा कर्तव्य आहे. प्रत्येक नागरीकाला आपण पाणी पुरविले पाहिजे हे त्याच हक्क आहे. आपण कोणालाही पाणी कनेक्शनला नाही म्हणत नाही. सन्मा.सदस्यांनी विष्णुभाऊंनी त्या दिवशी मुद्दा मांडला होता. एक कनेक्शन दिल्यावर समजा १० फ्लॉटस असतील तर त्यांची पाणी पुरवठयाची अडचण दुर होईल का ? त्याला पाणी कमी पडेल का ? याही बाबतीमध्ये तांत्रिक दृष्टया सोल्युशन एम.जी.पी.च्या अधिकाऱ्यांनी दिलेला आहे की, १० फॉमीलीमध्ये समजा ५० लोकं असतील.प्रत्येक फॉमिलीला १३५ लिटर प्रमाणे दर वेळी याप्रमाणे जर १००० लिटर लागत असेल,आणि आपण ४५ मिनीट पुरवठा करणार आहोत. तर ४५ मिनीटामध्ये १०,००० लिटर पाणी दिल जाईल या दृष्टीने तुम्हाला १ इंची, १.५ इंची, २ इंची जे काही कनेक्शन आवश्यक असेल.त्या प्रमाणात द्या. दुसरीकडे आपण कुठल्याही मोठया शहरामध्ये जाऊन बघा, आपल्याला १०० फ्लॉटस असतील तर आपल्याला १०० कनेक्शन दिसणार नाही. आपणही माहिती घ्यावी. दुसरं त्याच्यामध्ये स्थानिक परिस्थितीमध्ये एक महत्वाची अडचण जी येते ती ही समजा आपण प्रत्येकाला कनेक्शन दिल, चौथ्या मजल्याचा फ्लॉट धारक आहे त्याला निश्‍चितच तुलनेने पाणी कमी राहत.प्रेशर कमी राहतो, अश्या वेळेला नैसर्गिक टेन्डंसी काय राहते. आपण प्रत्येक वेळेला त्याला मोटर लावतो. प्रत्येक जण मोटर लावुन आर्ध्या इंचीला पाणी ओढत असतो. अश्या वेळेला त्यांच्या डाऊनस्ट्रीमला जे कनेक्शन असतील, त्याच्यावरती खुप मोठा परिणाम होणार आहे. तेच जर सगळयांचे एकाच लेव्हलला कनेक्शन असतील तर सगळया अपार्टमेंटला त्याच प्रमाणे पाणी मिळेल.कोणाला मोटर लावण्याची गरज भासणार नाही. अश्या वेळेला आपल्यालाही प्रॅक्टीकली मोटरवरती कार्यवाही करणे शक्य होत नाही. कारण प्रत्येकाने मोटर लावली, काही जणांना पाणी लवकर भेटेल,ज्यांचे सुरुवातीला कनेक्शन आहे त्यांना पाणी मिळेल, एन्डींगला जी लोकं आहे त्यांना पाणी मिळणार नाही. पुन्हा शेवटी महापालिकेने विचार केल की, या सगळयांचा विचार करुन आपण केलेले आहे. आणि मला नाही वाटत याच्यात तांत्रिक दृष्टया व्यवहारीक दृष्टया काही अडचण आहे. राहिला विषय काही जणांनी मुद्दा मांडला की, पाणीपट्‌टी कोण भरणार. ज्या वेळेला आपण एका अपार्टमेंट मध्ये फ्लॉट घेवुन राहतो. अश्या वेळेला सोसायटी स्थापन करणे अपेक्षित आहे. समजा ज्या ठिकाणी सोसायटी स्थापन नसेल.ही झाली कायदेशीर बाजु. परंतु अश्या वेळेला एका फ्लॉटमध्ये राहत असतांना काही सामाईक दृष्टयांच्या बाबतीमध्ये लोकांना एकत्र येणे गरजेचे आहे. सामाईक त्याठिकाणी शेल्टर आहे, जिना आहे, त्याचे लाईट आहे, स्वच्छता आहे. पुढे इमारतीची ढागढुगी करणे आहे. काही ठिकाणी वाचमनचा प्रश्‍न येईल काही ठिकाणी पाण्याचा प्रश्‍न येईल. काही ठिकाणी लाईटचा प्रश्‍न आहे त्यामुळे सामाईक विषयांच्या बाबतीमध्ये लोकांना एका अपार्टमेंट मध्ये राहत असेल, तर मला बंगल्याप्रमाणे इतरांच्या प्रमाणात आयसोलेटेड ट्रिट करा, ही मागणी सुध्दा घडायला नको.

**श्री.नितीन बरडे :-** काही काही अपार्टमेंटसला देवुन टाकलेले आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** तरी पाणी पुरवठयाचे अभियंतेला शहर अभियंतांनी दि.२३/०९ ला एक आदेश काढला आणि त्या आदेशामुळे हे गोंधळ झालेला आहे. त्याच्यानंतर हे कनेक्शन द्यायचे बंद पडेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय लावले आहे. केव्हाच सांगितल, तुम्ही प्रश्‍न विचारणार नाही बोगस कनेक्शन झाले तर, मला उत्तर घेवु द्या पहिले.

**श्री.मनोज चौधरी :-** अप्पा, रात्री ११-११ वाजता लोकं फोन करतात आम्हाला,

**श्री.नितीन बरडे :-** रस्ते होत नाही ते कनेक्शन देत नाही तर, रस्त्यांचे कामे चालु होत नाही त्यामुळे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळयात पहिले मांडलेले आहे त्याचे उत्तर नाही घेऊ का मी?

**श्री.मनोज चौधरी :-** रात्री ११.०० वाजता काय बोलता लोकं फोनवर तुम्हाला ऐकुन दिल मी.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला या वर्षी बोलत असतील आम्हाला तर ८ टर्म पासुन बोलत आहे. आम्हाला ८ टर्म पासुन बोलत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** अप्पा, आम्हाला पण ३ टर्म होऊन गेल्या ना हो.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो झाल ना, तुम्ही तुमचा मुद्दा मांडला ना, मला माझे उत्तर तर घेवु द्या पहिले.

**श्री.नितीन बरडे :-** १३ कनेक्शन बाकी आहे साहेब एका भागात, रस्ते चालु होत नाही त्यामुळे.

**सौ.सरिता नेरकर :-** अप्पा बोलत आहे तर बोलु द्या ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही पण मुळ विषय आहे ना ताई.उत्तर देऊ द्या.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला यांना उत्तर द्यायला सांगा पहिले, आम्हाला जबाबदार पदाधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे की, बोगस कनेक्शन आहे म्हणुन आणि तुम्ही जर याच उत्तर दिला ना की, कनेक्शन नाही आहे म्हणुन सांगा काय आहे मला, आणि जबाबदारीने सांगत जा लुले साहेब,

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** अमृत योजने अंतर्गत जी कनेक्शन दिली जात आहे. जे पुर्वीचे नळ संयोजन आहे. ज्या मिळकत धारकांकडे पाणीपट्टी टाकलेली बिले, त्यांनी दाखविल्यानंतर ती कनेक्शन मक्तेदारामार्फत अमृत योजनेत जोडली जातात.पुर्वी जुने जे आपले कनेक्शन होते,त्या रेग्युलर कनेक्शनच्या पावत्या, ३ प्रतिंमध्ये घेवुन एक मक्तेदाराकडे राहते, एक त्यांचा संबंधीत जो कॅन्ट्रॅक्टर असतो त्याच्याकडे असते, आणि एक बिल्डींगला दिली जाते. आणि नविन कनेक्शन जो दिला जातो, त्याच्याही पावत्या दिले जातात.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळ रितसर आहे का ?

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** हो सगळ रितसर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिल्कुल कन्फर्म

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** हो सगळ रितसर आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा मी फक्त अपार्टमेंट बद्दल बोलतोय फक्त

**श्री.कैलास सोनवणे :-** मनोजभाऊ विषय दुसरा आहे ना , याच्यामध्ये पावत्या नसतांना , तुम्ही जो आपले इंजिनियरांचे नांव सांगतो मी पिंप्राळ्याचा इंजिनियर

**श्री. मनोज चौधरी :-** निमखेडी , निमखेडी

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही निमखेडीचा विषय वेगळा आहे हा , हे १००० बोगस नळ कनेक्शन आहे तिथे.

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा कुठले अमृत योजनेचे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही जुन जे आहेत तिथे बोगस कनेक्शन आहेत. भाऊ हा आपले विषयांतर होतो आहे. तुमचा तायडे इंजिनियर त्यांनी केलेल आहे मला माहिती पडलेल आहे. मला जबाबदार लोकांनी सांगीतलेल आहे. तुम्ही परत हे करून ते तपासा. मी तुम्हाला सांगतो दोन दिवस अजुन मला काही ऐवढी घाई नाहीये. तुम्ही दोन दिवसांत हे करा आणि नसेल होत दोन दिवसांत तर मी तुम्हाला डायरेक्ट नांव देईल. साहेब यांच्यावर डायरेक्ट कारवाई करावी लागेल तुम्हाला म्हणजे हे जे मी सांगीतले आहे. तुम्हाला आणखी दोन दिवस आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर साहेब , आयुक्त साहेब

**सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड आवाजामुळे व सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत असल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.**

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर साहेब , आयुक्त साहेबांनी आता सांगीतले की १५ दिवसांमध्ये जुने जे नळ कनेक्शन आहेत. त्या पाईपलाईन आता बंद केल्या जाईल. परंतू आता १५ दिवसांमध्ये आपले अमृतचे कनेक्शन दिले जातील का ? जळगांव मध्ये अमृतचे बरेच कनेक्शन बाकी आहेत. तर मी बोलुन बोलुन थकलो आपल्याशी तर हे कनेक्शन १५ दिवसांत दिले जाईल का ?

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये विषय असा आहे की, ज्या परिसरात आपण अमृतच्या लाईन वरून पाणी पुरवठा सुरू करतोय. एकावेळेला मात्र आपण काही करणार नाही. तर जे आपले एक एक झोन पुर्ण होतील. तर त्या ठिकाणी पुर्ण होवुन जाईल तर त्या ठिकाणी आपण त्याठिकाणी सुरू करू आणि जुनी लाईन आपण बंद करून टाकु. आपल्या ज्या ठिकाणी जुन्या लाईन ज्या आहेत. ती आपण सुरू ठेवु.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** साहेब याच्यामध्ये काय होत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ढेकळे साहेब थांबा थोड

**श्री.विशाल त्रिपाठी :-** साहेब आपल जे धोरण आहे की जिथे पाण्याची टाकी सम खाली करू शकत नाही. तिथे इंडिव्हिजल नळ कनेक्शन द्यावे. पण आपला जो आदेश होता तर याच्याआधी काय तर तो फक्त ८ फ्लॅट पुरता आहे.

**मा.आयुक्त :-** तो चुकीचा आहे आपण त्याच्यामध्ये काल बदल करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता दुसर नळ कनेक्शनचा मुद्दा असा आहे माझा की जिथे १५फ्लॅट आहेत. २५ फ्लॅट आहेत. त्याला आपण तेवढ्या माणसांच्या हिशोबाने त्यांना तितके पाणी मिळेल. कॅलक्युलेशनच्या हिशोबाने आपण त्यांना पाईप लाईन तेवढी काढुन देणार. त्याच्या जागी रेसिडेंशिलचे जेवढे फ्लॅट धारक आहे त्याप्रमाणे आकारणी आपण ती रु.२०००/- आहे त्याप्रमाणे आपण घेणार. पण मुळात आपली डिस्ट्रीब्युशन लाईन जी आहे. सगळयात महत्वाची.ती जर शहराच डिस्ट्रीब्युशन करायच विचार केला तर ती ४ इंचीच आहे. आता जर ४ इंची वरुन ५० फ्लॉटला ४ इंची कनेक्शन द्यावे लागत असेल. तर पुढचा पाणी पुरवठा होणार कसा? एकतर तेथे व्हॉल बसवावा लागेल. नाही तर ते सगळ्यापेक्षा कस होईल साहेब, आज याचा सोल्युशन मला नाही वाटत की आपण काही काढलेला आहे. किंवा ४ इंची वरुन कमी फ्लॉट असतील तर २ इंची करायची, २ इंची म्हणजे फक्त निम्य पाणी पुढच्या राहणाऱ्याला पुरवठा कमी होईल. हा एक लक्ष घालुन देण्यासारख आहे सभागृहापुढे,माझ प्रश्न आहे.

**मा.आयुक्त :-** जर दिले ५० कनेक्शन, किंवा ५० आर्धा इंचीला पर्यायी म्हणुन १ इंची कनेक्शन दिल, याचा मुळ पाणी पुरवठयावरती परिणाम होत नाही. उलट जेवढया ठिकाणी तुम्ही ते पंक्चर काढाल तेवढा प्रेशर ड्रॉप होतो. ही टेक्नीकल बाजु आहे त्याची.त्यामुळे आपण कमीत कमी ज्या ठिकाणी पाईप लाईन पंक्चर करायची वेळ जरी आली. या दृष्टीने आपण नंबर ऑफ कनेक्शन कमी करायचे, परंतु नागरीकांना पुरेसा पाणी पुरवठा होईल हेच आपण करणार आहोत. आणि याच पध्दतीने सगळया ठिकाणी केल जात.मला नाही वाटत की, टेक्नीकल काही अडचण येईल. त्या त्या गल्लीतली लोक संख्या विचारात घेवुनच ३ इंची ४ इंची कनेक्शन टाकलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, पाणी कनेक्शन पुर्ण झाल्याचे पत्र कधी भेटेल तुमच्या अधिकाऱ्याकडुन, मी तिन महिने झाले पाठीमागे लागला आहे. तेथील रस्ते सुरु करायचे आहे. कधी भेटेल तुमच्या पाणी पुरवठा अधिकाऱ्याकडुन, सांगुन द्यावा, एक दिवस जरी गेले का त्यांनी सांगुन द्यावे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** साहेब माझ्या वार्डात रस्त्यांचे काम.

**श्री.नितीन बरडे :-** एक मिनीट थांबा हो ईबा भाई थांबा, पुढे या पुढे, साहेब काम चालु करायचे आहे. १३ कनेक्शन बाकी आहे फक्त, रस्ता चालु कराचा आहे. यांना पत्र कधी देत आहे सांगा मला,

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** संबंधीत मक्तेदाराला काम करण्यासाठी सुचना देऊन बरेच कनेक्शन झाले आहे आता १५ एक कनेक्शन बाकी होते.

**श्री.नितीन बरडे :-** १३ कनेक्शन बाकी आहे तिथले,

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** कालच्या दिवशीच मी आढावा घेतलेला आहे. तर २-४ दिवसांमध्ये ते पुर्ण करु.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब तुमची रिटायरमेंटची तारीख काय आहे.

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** ३१ मे २०२२

**श्री.प्रशांत नाईक :-** मग तर काही खरं नाही.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, किती दिवसात देतील पत्र तुम्ही विचारा.

**मा.आयुक्त :-** प्रशांत भाऊ प्रत्येकाच्या तारखा लिहुन घेत आहात का ?

**श्री.नितीन बरडे :-** अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला नितीन भाऊ, तुमचा टाईम झाल ना. चला,

**मा.उपमहापौर :-** महापौरांनी सुचविलेल्या

**श्री.कैलास सोनवणे :-** आहो, नितीन भाऊ टाईम झाल तुमचा बरोबर.

**मा.महापौर :-** सभागृहामध्ये मी सुचविलेल्या सर्व सुचनांच या मध्ये समाविष्ट करुन घ्यायच आणि त्या पध्दतीने अर्थसंकल्पामध्ये फेरबदल करुन सर्वानुमते अर्थसंकल्प हा मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आम्ही ज्या सुचना दिलेल्या आहे त्याच उत्तर हव आहे.सर्वानुमते नाही.

**श्री.नितीन बरडे :-** तेच तर सांगितले मॅडमांनी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही, सर्वानुमते बोलले ते,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आम्ही सुचविलेल्या फेरबदल केलेले आहेत का ?

**मा.आयुक्त :-** विशाल भाऊ, अर्थसंकल्प नामंजुर असे म्हणता येत नसतो, ज्या सूचना आहे त्यांच प्रॅक्टीकली ज्यांच अंतरभाव करणे शक्य नसेल, बाकीच्या सुचना त्यांना आपण अंमलबजावणी मध्ये आणु ना.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** अर्थसंकल्प सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/११४२/२०२२ दि.०८/०३/२०२२ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेंत आलेले आहेत. दि.२४/०३/२०२२ रोजी सकाळी- ११ वाजता घेण्यात आलेली विशेष महासभा अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी

तहकूब करणेत आली होती. सदर तहकूब विशेष महासभा दि.३१/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली.

दरम्यानच्या काळात मा.आयुक्त यांनी सादर केलेल्या माहितीचा सर्व सन्मा.म.न.पा.सदस्यांनी सखोल अभ्यास केला असता मालमत्ता करामध्ये वाढ सुचवुन ५ कोटी रुपये जमा बाजूमध्ये वाढ करुन खर्च बाजूमध्ये पूढीलप्रमाणे तरतूदी करण्यात येत आहे. १) अदयावत प्रसुतीगृह रुपये - ५० लक्ष, २) महानगरपालिकेच्या शाळा डिजीटल करणे रुपये - ७५ लक्ष, ३) क्रीडा स्पर्धा व योग प्रशिक्षण अभियान रुपये - २५ लक्ष, ४) नविन बगीचा रुपये - ५० लक्ष, ५) नविन गटारी रुपये - ०१ कोटी, ६) नविन संडास मुताऱ्या रुपये - ५० लक्ष याप्रमाणे वाढ करुन सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने उपरोक्त प्रमाणे अंदाजपत्रकात बदल करणेबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

प्रशासनाने जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक अपेक्षित योग्य त्या दुरुस्त्यांसह परिपुर्ण अंदाजपत्रकाची प्रत अदयावत करुन सर्व सन्मा.सदस्यांना तसेच सर्व संबंधित विभागांना वितरीत करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर अंदाजपत्रकाच्या छपाईसाठी येणाऱ्या खर्चासही याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही/-**

**(महाजन जयश्री सुनिल)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**